# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र

# आरक्षण धोरण आणि राजकारण

## (Reservation Policy and Politics)

सत्र ४ : पेपर E-40

(शैक्षणिक वर्ष २०१९–२० पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२२

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर E-40 (ऐच्छिक)

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-40-6

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र

अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. प्रकाश पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अ‍ॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अमिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या ऐच्छिक पेपर क्रमांक E-40 सत्र चार साठी 'आरक्षण धोरण आणि राजकारण' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

आरक्षण धोरण आणि राजकारण यामध्ये सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान, स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आरक्षण, भारतीय संविधान आणि आरक्षण, आरक्षण आणि इतर मागासवर्गीयांसंबंधी धोरणे या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा प्रा. डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. रविंद्र भणगे, डॉ. प्रकाश पवार, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानते.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी, विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. केशव हरेल**<br>वाय. पी. पोवार नगर, कोल्हापूर | १ |
| **डॉ. सूर्यकांत लक्कप्पा गायकवाड**<br>सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. आनंदा कांबळे**<br>भोगावती महाविद्यालय, कुरुकली, ता. करवीर, जि. कोल्हापूर | २ |
| **प्रा. डॉ. रविंद्र भणगे**<br>विभागप्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. झाकीरहुसेन हाकीम संदे**<br>क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल, ता. पलूस, जि. सांगली | ४ |

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान | १ |
| २. | स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आरक्षण | ३४ |
| ३. | भारतीय संविधान आणि आरक्षण | ७३ |
| ४. | आरक्षण आणि इतर मागासवर्गीयांसंबंधी धोरणे | ९९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

---

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र–४ : घटक–१

# सकारात्मक भेदभावाचे तत्वज्ञान

# (Philosophy of Positive Discrimination)

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ सकारात्मक भेदभाव व भारतीय राज्यघटना

१.२.२ महात्मा फुले आणि राजर्षि शाहू महाराज यांचे आरक्षणविषयक विचार

१.२.३ राजकीय आरक्षण आणि नोकरी व शिक्षणातील आरक्षण

१.२.४ माँटेग्यू–चेम्सफोर्ड सुधारणा आणि आरक्षण

१.२.५ कोल्हापूर संस्थानातील आरक्षणाचे धोरण

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये

भारतामध्ये आरक्षणावरून आजही राजकारण होताना दिसते. या आरक्षणाची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व कालखंडात झालेली आहे. महात्मा फुले, छ. शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी विचारवंतांनी आरक्षणासंदर्भात विचार मांडले आहेत. त्याचबरोबर माँटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणेमधील आरक्षणाचे धोरण, कोल्हापूर संस्थानांतर्गत आरक्षणाचे धोरण इत्यादी गोष्टीचा अभ्यास करण्याचे आवश्यक आहे. ते प्रस्तुत प्रकरणामध्ये करण्याचे उद्दिष्ट्ये आहे.

## १.१ प्रस्तावना

आर्य हिंदुस्थानात आल्यानंतर समाजामध्ये चार वर्ण निर्माण झाले. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र

असे वर्ण असून त्यातील शूद्र लोकांना अस्पृश्य म्हणून अन्याय करीत राहिले. त्यासाठी ब्रिटीश भारतात आल्यानंतर शिक्षणाची सुरुवात झाली. शिक्षणामुळे समाजातील वाईट रूढी, प्रथा, परंपरा दूर करण्याची जाणीव येथील शिक्षित वर्गाला होऊ लागली. राजाराम मोहनरॉय यांनी १८२८ साली ब्राम्हो समाजाची स्थापना करून समाजसुधारणेची चळवळ उभी केली. बाबू शशिपाद बंडोपाध्याय यांनी १८६६ साली ब्राम्हो समाजाची विचारधारा स्विकारली. गरीब मजूरांकरिता रात्रीच्या व दिवसाच्या शाळा सुरू केल्या. मुंबईमध्येही अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शाळा स्थापन केल्या होत्या परंतु अनुकूल परिस्थिती नसल्यामुळे त्या बंद पडल्या. महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुणे येथे १८४८ साली मुलींची पहिली शाळा सुरू केली होती. १८५२ साली अस्पृश्यांसाठी पहिली शाळा फुलेनी स्थापन केली. ही शाळा भारतामधील पहिले अस्पृश्यासाठी सुरू केलेली शाळा होय. भारतातील अस्पृश्यता निवारणासाठी अनेक विचारवंतांनी प्रयत्न केला आहे. विठ्ठल रामजी शिंदे, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी विचारवंतांनी आपल्या विचारातून आणि कृतीतून अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले आहे. तसेच थिऑसॉफीकल सोसायटीचे अध्यक्ष कर्नल ऑल्कॉट यानी अस्पृश्यता निवारणासाठी मद्रास शहरामध्ये १८९४ साली पहिली शाळा सुरू केली व एकूण चार शाळा सुरू केल्या. मंगळूर येथे के. रंगराव यांनी १८९७ साली पहिली शाळा सुरू केली. इंग्रज सरकारने सक्तीचे शिक्षण दिले. आर्य समाज, ब्राम्हो समाज यांनी अस्पृश्यता निवारणासाठी अनेक प्रयत्न केले. त्यातून अस्पृश्यांनीसुध्दा आत्मोद्धाराची चळवळ उभी केली. त्याचे उदाहरण म्हणजे लष्करी पेन्शनर संदर्भात पुण्याचे शिवराम जानबा काळे यांनी केलेली चळवळ होय. १९०३ ते १९१० पर्यंत त्यांनी ही चळवळ चालवली.

समाजामध्ये अनेक ठिकाणी अस्पृश्यांवर अन्याय होत होता, त्यांना माणुसकीची वागणूक मिळत नव्हती, त्यांना जनावरांच्या पलीकडे अन्यायाला बळी पाडले जात होते. त्यामुळे १९व्या शतकातील अनेक विचारवंतांनी, संस्थानानी त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण देण्याची तरतूद केली. ती तरतूद आर्थिक, सामाजिक व राजकीय या तिन्ही क्षेत्रामध्ये समानता निर्माण करण्यासाठी आवश्यक होती. एकीकडे समानतेचे तत्त्व प्रस्थापित करीत असताना दुसरीकडे गरीब अस्पृश्य लोकांना विशेष तरतूद करून सकारात्मक तत्त्वज्ञानाचे स्विकारलेले आरक्षण धोरण हे समानतेचे तत्त्वामध्ये सकारात्मक भेदभाव आहे. समाजातील अस्पृश्य घटकाला मुख्य प्रवाहात आणणे, हा आरक्षणाचा उद्देश आहे. यासंदर्भात महात्मा फुले, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

## १.२ विषय विवेचन

महात्मा फुले व छ. शाहू महाराज यांचे आरक्षणविषयक विचार हे महत्त्वाचे आहेत. त्याचबरोबर राजकीय, शिक्षण, सेवा इत्यादी ठिकाणी आरक्षण मिळणे गरजेचे आहे. कारण अस्पृश्य समाजाला मुख्य प्रवाहात आणणेसाठी आणि सर्वांगीण प्रगती होऊन त्यांचे जीवन हे मानवी जीवनासारखे होणे आवश्यक

आहे. समाजातील दबलेले अन्यायी जीवन कित्येक वर्षे जगले असल्यामुळे त्यांच्यासाठी सकारात्मक भेदभाव करणे महत्त्वाचे आहे, तसा निर्णय शाहू महाराज व सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संस्थानात घेतला. तसेच ब्रिटीश शासनानी त्यांच्या अनेक सुधारणा कायद्यामध्ये याचा उल्लेख केला. त्यातील महत्त्वाचा मॉंटेग्यू चेम्सफोर्ड सुधारणा कायदा अभ्यासणे आवश्यक आहे. अशा प्रकारे प्रस्तुत प्रकरणात चर्चा करणार आहोत.

## १.२.१ सकारात्मक भेदभाव व भारतीय राज्यघटना

भारतीय समाज हा विषमतेनी विभागलेला आहे. कोट्यावधी अस्पृश्यांना वर्षानुवर्षे दास्यत्व व सामाजिक विषमतेची वागणूक दिली जात होती, त्यामुळे सामाजिक विषमता दूर करण्यासाठी सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान उदयास आले. त्याचा वापर भारतीय राज्यघटनेमध्ये करण्यात आला असून त्याद्वारे आरक्षणाचे धोरण स्विकारले आहे.

### ❑ सकारात्मक भेदभाव म्हणजे काय?

ज्या समाजात विषमता असते, समाजात जातीची, वंशांची उतरंड असते अशा समाजात समतेचे तत्व जसेच्या तसे लागू केल्यास उतरंडीच्या तळाशी असणाऱ्या समाज घटकांवर अन्याय होतो. अशा वंचित, उपेक्षित, सामाजिक, शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांना इतर समाजाच्या बरोबर आणायचे असेल तर त्यांना विशेष मदतीचा हात द्यावा लागतो, विशेष संधी द्यावी लागते, म्हणजेच त्यांच्याबाबत सकारात्मक भेदभाव करावा लागतो, ज्यायोगे इतर समाजाच्या बरोबरीने तो मागासलेला समाज येऊ शकेल. आरक्षण धोरणाचे प्रणेते छत्रपती शाहू महाराज यांनी याबाबतचे अतिशय बोलके उदाहरण दिले आहे. जर घोड्यांची स्पर्धा घेतली, त्यात सर्व घोडे सशक्त आहेत, पण एक घोडा मात्र दुबळा/लंगडा आहे असे असेल तर तो दुबळा घोडा इतरांशी स्पर्धा करूच शकणार नाही. त्यासाठी त्याला १०० मिटर पुढे उभे केले तर तो स्पर्धा न्याय्य होईल हे उदाहरण देऊनच छ.शाहूंनी आपल्या राज्यात आरक्षणाचे धोरण सुरू केले. हे सकारात्मक भेदभावाचे तत्वज्ञान स्वतंत्र भारतानेही स्विकारले.

एखाद्या समूहाला जाणीवपूर्वक जात, धर्म, लिंग आणि स्थानिक परिस्थितीच्या आधारावर मागास जातीला किंवा समाजाला विशेष संधी देणे म्हणजे सकारात्मक भेदभाव होय. समाजाने ज्या समुदायाला तुच्छ ठरवून दूर ठेवले, त्याचे शोषण केले आणि त्याचे रास्त हक्क नाकारले, त्याच्या मागासलेपणाची जबाबदारी संपूर्ण समाजावरती असते हे समाजाने मान्य केले पाहिजे. सामाजिक समतेला खरेखुरे अस्तित्व येण्याच्या दृष्टीने व्यक्तीच्या हक्काबरोबरच अशा उपेक्षित समुदायाचे हक्कही सुरक्षित झाले पाहिजेत. हा सकारात्मक भेदभावाचा हेतू असतो. मार्क गॅलन्टर याच्यामते, समतातत्व आणि सकारात्मक भेदभाव यांच्याकडे पाहण्याचा आडवा दृष्टीकोन ज्यामध्ये व्यक्तीना संधीची समानता मिळणे त्यात पुरेसे मानले

जाते. तर उभा दृष्टीकोणामध्ये वर्तमानाचा विचार विषमताप्रधान भूतकाळ आणि सकारात्मक क्षमतेवर आधारित भविष्यकाळ या दोहोंना जोडणारी कडी या दृष्टीकोनाचा समावेश होतो. सकारात्मक भेदभाव केवळ मागास घटकाना स्पर्धेत टिकता यावे किंवा त्याचे हक्क इतर वरचढ वर्गाच्या अतिक्रमणापासून सुरक्षित रहावेत एवढ्या मर्यादित हेतूनी केलेला नसतो किंवा सकारात्मक भेदभाव आर्थिक आधारावर केला जात नाही, तर गरिबीच्या जोडीला वंश, जात किंवा तत्सम एखादा घटक त्या भेदभावासाठी कारणीभूत असावाच लागतो. म्हणून सकारात्मक भेदभाव हेच मागासवर्गीयांसाठी किंवा वर्षानुवर्षे मुख्य प्रवाहातून बाजूला फेकलेल्या समाजासाठी योग्य असते. इतिहासक्रमात साचत असलेल्या विषमतांचा निचरा करण्याचे साधन म्हणून सकारात्मक भेदभावाचे समर्थन केलेले असते. तो भेदभाव समता तत्त्वाला मारक ठरत नाही. एकूणच सकारात्मक भेदभावाचे अंतिम ध्येय हे समाजातील खुल्या स्पर्धेत सर्व समाजघटकांना सहभागी होता येईल आणि स्पर्धकांच्या यशाच्या आड येणारे अडथळे सर्वांसाठी सारखेच असतील अशी परिस्थिती निर्माण करणे हेच असते. त्यासाठी आरक्षण देणे आवश्यक आहे. आरक्षण हा सकारात्मक भेदभावाच्या कार्यक्रमाचा केवळ एक भाग आहे. सकारात्मक भेदभावाच्या सर्वसमावेशक कार्यक्रमात अनेक विकासयोजनांचा अंतर्भाव केला जाऊ शकतो. त्यामध्ये गरीबी निर्मूलन, रोजगारनिर्मिती सक्तीचे व सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण, मूलभूत आरोग्य सुविधा इत्यादी अनेक विकास कार्यक्रमाचा समावेश होतो.

सकारात्मक भेदभावाची कल्पना ही पूर्वीपासून आलेली आहे, कारण आरक्षण हा सकारात्मक भेदभावाचा एक भाग आहे, त्यामुळे आरक्षणाची सुरूवात ब्रिटीशकाळापासून झाल्याची उदाहरणे आहेत. १८७४ साली म्हैसूर प्रांत, १९०३ साली कोल्हापूर संस्थान, १९०९ च्या कायद्यामध्ये मुस्लीमांना स्वतंत्र मतदारसंघाची तरतूद, १९१७ साली मद्रास प्रांत, १९२४ साली मुंबई प्रांत, १९२१ साली दलितांना राखीव जागा इत्यादी प्रांतामध्ये आरक्षणाची तरतूद करण्यात आली होती. हे सर्व निर्णय हे सकारात्मक भेदभावाच्या आधारावर झाल्याचे म्हटले तरी योग्य ठरते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर मात्र भारतीय राज्यघटनेमध्ये आरक्षणाच्या धोरणाची तरतूद करताना सकारात्मक भेदभावाची कल्पना स्विकारलेली आहे. हे तत्त्वज्ञान स्विकारून मागास जाती जमाती नोकरी व राजकारणामध्ये आरक्षण देण्यात आले आहे. अन्य मागासवर्गीयांसाठी विशेष आरक्षण देण्याची गरज भासल्यास राज्यसंस्था ते करू शकेल अशी संविधान कार्याची तरतूद केली आहे. त्यानुसार मंडल आयोगाची निर्मिती झाली आणि ओबीसीना आरक्षण मिळाले, त्यानंतर सध्या अनेक राज्यामध्ये वेगवेगळ्या जाती जमातींनी आरक्षणाची मागणी करीत आहेत, परंतु सकारात्मक भेदभावाचा मुख्य उद्देश हा मागास जातींना विशेष संधी देऊन मुख्य प्रवाहात आणणे हा आहे. आज मात्र आरक्षण मागणी वेगवेगळ्या समूहातून होती आहे परंतु आरक्षण ही कायमची नसून तात्पुरता केलेला उपाय आहे. आज आरक्षण हेच आपल्या विकासाला गरजेचे आहे अशी भूमिका अनेक नेत्यांकडून मांडताना दिसत आहेत. राज्यघटनेत आरक्षणाची मर्यादा ५०% ची

असल्यामुळे अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. एकूणच भारतीय राज्यघटनेमध्ये सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान मांडलेले आहे.

## ❑ भारतीय राज्यघटनेतील सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान

भारतीय राज्यघटनेमध्ये कलम १४ नुसार कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. कोणतीही व्यक्ती कायद्यापेक्षा श्रेष्ठ नसते. कायद्यासमोर धर्म, वंश, जात, स्त्री-पुरुष, श्रीमंत-गरीब असा कोणताही भेदभाव केला जाणार नाही. कायद्याच्या समान संरक्षणापासून कोणालाही वंचित केले जाणार नाही. सर्वांना समान संधी म्हणजेच समाजातील सर्व घटकांतील व स्तरातील नागरिकांना संधीचा समान पध्दतीने लाभ घेता येणे. कलम १५ नुसार राज्य केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल. अशाप्रकारे भेदभाव करणार नाही अशी तरतूद करण्यात आली आहे. १५व्या कलमाच्या पोटकलम ४ मध्ये अशी व्यवस्था केलेली आहे की, जर कोणी एक समाज घटक किंवा समूह हा सामाजिकदृष्ट्या किंवा शैक्षणिकदृष्ट्या मागासलेला असेल किंवा अनुसूचित जाती, मागासवर्गीय किंवा आदिवासी असेल तर त्याच्यासाठी विशेष आरक्षण दिले जाऊ शकेल, अशी तरतूद करण्यात आली आहे. कारण प्राचीनकाळी भारतीय समाजामध्ये कोणत्याही आधारावर समतेचे तत्त्व स्विकारले नव्हते. मद्रास राज्यामध्ये ब्राम्हणांना केवळ ब्राम्हण आहेत म्हणून वैद्यकीय महाविद्यालयात जागा देऊ नयेत असा हूकूम काढला होता. त्या हुकूमान्वये एक मुलीला जागा नाकारली होती. तिने न्यायालयामध्ये घटनात्मक अर्ज केला व तो हुकूम न्यायालयाने अवैध ठरविला. मागासलेल्या जाती व हरिजन यांच्यासाठी राखीव जागा ठेवणे वेगळे आणि ब्राम्हणांना ब्राम्हण म्हणून बंदी घालणे वेगळे. न्यायालयाने हा धार्मिक भेदाभेद अवैध ठरविला, परंतु स्त्रिया, मुले हरिजन मागासलेल्या जाती यांना अधिक संरक्षण व सवलती दिल्या तर ते अवैध ठरत नाहीत अशी भूमिका न्यायालयाने घेतली.

१६व्या कलमानुसार राज्याच्या कोणत्याही पदावर नियुक्ती होण्याची समान संधी सर्वच नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान वा वास्तव्य या कारणासाठी कोणीही नागरिक राज्यातील नोकरीसाठी भेदभाव केला जाणार नाही, परंतु एखाद्या मागासवर्गाचे पुरेसे प्रतिनिधीत्व नाही असे राज्याला वाटल्यास अशा वर्गासाठी नोकऱ्या व जागा राखीव ठेवल्यास या कलमाने प्रतिबंध करता येणार नाही.

अशा प्रकारे भारतयी राज्यघटनेच्या कलम १५(४) व १६(४) मध्ये सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान स्विकारले आहे. जरी १६व्या कलमामध्ये सर्वजण कायद्यापुढे समान असले तरी मागास जाती जमातीना विशेष संधी उपलब्ध करून आरक्षण दिले आहे. नोकरीमध्ये राखीव जागा देण्ठयात आल्या

आहेत, परंतु राखीव जागांमुळे खरी समता स्थापन होणार नाही त्यासाठी समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रावर उच्च वर्गाची असलेली पकड सोडवणाऱ्या विविध उपायांचा शोध घ्यावा लागेल. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता निर्माण करण्यासाठी मागासवर्गीयांकडे राज्यकारभाराची सूत्रे असली पाहिजेत. अशी भूमिका मांडली आहे. एकूणच भारतीय राज्यघटनेमध्ये सकारात्मक भेदभाव, तत्त्वज्ञान स्विकारून स्त्रियांना, मागास जातींना आरक्षण दिले. त्याचबरोबर अनेक ठिकाणी संधी देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याचबरोबर समाजातील विषमता त्याचबरोबर अस्पृश्यता दूर करण्यासाठी अनेक कायदे केले आहेत. अनेक योजना राबविल्या आहेत, तरीही भारतामधील विषमता नष्ट झाली नाही. आर्थिक दरी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान लोकांना पूर्णपणे मान्य झाले नाही किंवा अंमलबजावणी काटेकोरपणे झाली नाही असे दिसते. व्यक्तींना संधीची नुसती समानता देवून भागणार नाही, तर त्या संधी पदरात पाडून घेण्यासाठी लागणाऱ्या क्षमताबाबतही समानता समाजात निर्माण होणे गरजेचे असेल. त्यामुळे संविधानकारांना समाजातील भेदभावांना आधारभूत ठरणाऱ्या सामाजिक विभिन्नतेवर मात करण्याचा उपाय शोधणे भाग पडले. सामाजिक पक्षपाताची कारणे शोधून ती नष्ट केली तरच सामाजिक समतेचा ठोस अस्तित्व लागू राहिल अशी त्याची खात्री झाल्यामुळेच त्या पक्षपातापायी मागास राहिलेल्या समाजघटकांच्या बाजूने सकारात्मक भेदभाव करण्याच्या निर्णयावर संविधानकर्त्यांनी आले आहेत आणि त्यानुसार भारतीय राज्यघटनेत सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान प्रस्थापित केले आहेत.

## १.२.२ महात्मा फुले आणि राजर्षि शाहू महाराज यांचे आरक्षणविषयक विचार

महात्मा फुले यांनी प्रत्यक्ष जीवनामध्ये जगताना अस्पृश्यासाठी अनेक कार्य केले आहे. शाहू महाराज संस्थानाचे राजे असल्यामुळे त्यांनीही आरक्षणाचे विचार मांडून थांबले नाहीत तर त्यांनी त्यासंदर्भात कायदे, त्यांची अंमलबजावणी केली आहे. प्रथम महात्मा फुले यांच्या विचारांची चर्चा करणार आहोत.

### ❍ महात्मा फुले यांचे आरक्षणविषयक विचार

महात्मा फुले यांनी आरक्षणविषयक विचारांची स्वतंत्र अशी मांडणी केली नाही, परंतु त्यांनी जे ग्रंथ लिहिले आहेत, त्या माध्यमातून आरक्षणाची भूमिका स्पष्ट केली आहे, ती भूमिका सकारात्मक भेदभावाचा आधार होती. कारण महात्मा फुले यांची विचार परंपरा व कार्य हे महाराष्ट्रातील सामाजिक बदलाचा एक नवा प्रवाह होता. हा प्रवाह जातिभेद, वर्गभेद, स्त्री-पुरुष भेद नष्ट करण्यासाठी आणि मानवतेचे पुरस्कार करण्यासाठी प्रेरीत झाला होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि लोकशाही या

तत्त्वाच्या आदर्श चिंतनातून नवा समाज निर्माण करण्यासाठी फुलेंचा विचार महत्त्वाचा होता. व्यक्तीस्वातंत्र्य व विवेकनिष्ठा यांचा आग्रह धरणाऱ्या महात्मा फुलेनी शेतकऱ्यांचा शोषणासंदर्भात शेतकऱ्यांचा आसूड आणि ब्राम्हणाचे कसब असे दोन्ही पुस्तके लिहिली.

या दोन्ही पुस्तकांत जोतीरावांनी ब्राम्हण हे शेतकऱ्यांचे धार्मिक शोषण कसे करतात याचे मार्मिक विवेचन केले आहे. मुळात शेतकरी हा धार्मिक वृत्तीचा असून त्याच्या धार्मिक वृत्तीत अंधश्रध्दा दडलेली आहे. या अंधश्रध्देचा व देवभोळेपणाचा उपयोग करून ब्राम्हणांनी त्यांच्यामगे वेगवेगळ्या व्रताचे व विधीचे शुक्लकाष्ठ लावून दिले आहे. या सर्व व्रतांचा आणि विधींचा मुख्य उद्देश म्हणजे गरीब शुद्रांकडून दक्षिणा लुबाडून घेणे हा आहे. रोख दक्षिणा, धान्य, सुपारी, बदाम, कपडे इत्यादी अनेक बाबीं शुद्र शेतकऱ्यांकडून धर्माच्या नावाने ब्राम्हण लुबाडतात. ब्राम्हण खास विधी करून व सणांच्या मुहूर्तावर शेतकऱ्यांना सातत्याने लुबाडतात.

म. फुले यांनी ध्येयदृष्टी शासन व शोषण यापासून मुक्त असे 'बळीचे राज्य' स्थापन करण्याची होती, त्यास कधी-कधी ते 'निर्मिकाचे राज्य' असेही म्हणतात. 'निर्मिकाचे राज्य' तेव्हाच स्थापन होईल जेव्हा सर्वांना न्यायाने व समानतेने वागवणारी, सर्वधर्मसहिष्णुता व सर्वसमावेशक, विश्वकुटुंबात्मक अशी कष्टकऱ्यांची आदर्श समाजरचना स्थापन करण्यात येईल. त्यात प्रत्येकजण भावा-बहिणींप्रमाणे (पती-पत्नीचे नाते वगळता) राहील. प्रत्येक जण वस्तूंचा श्रमाप्रमाणे उपभोग घेईल. प्रत्येकजण सत्यधर्माप्रमाणे वागेल. या राज्यात शिपाई, पोलीस, न्यायाधीश व तुरुंग यांना फारसे स्थान असणार नाही.

जोतीरावांच्या राजकीय तत्त्वज्ञानाचे मूळ स्वरूप अतिशय क्रांतिकारक होते आणि ते विचार बनवित असताना त्यांनी जगातील बहुतेक प्रागतिक घटनांची नोंद घेतलेली आहे. उदा. त्यांनी आपले गुलामगिरी हे पुस्तक अमेरिकन गुलामांच्या मुक्तीसाठी झगडणाऱ्या लोकांना अर्पण केले आहे त्यांनी असे मत व्यक्त केले आहे की, मानवी स्वातंत्र्य हा मानवाचा नैसर्गिक अधिकार आहे आणि तो प्राप्त केल्याशिवाय त्याचे हित होत नाही व त्यास सुख मिळत नाही. म्हणून अशा स्वातंत्र्याला प्रस्थापित करणारी लोकतंत्रात्मक राजवट हीच खरी राजवट आहे, असे म. फुलेंचे मत होते. बळीचे राज्य हे शेतकऱ्यांचे व काबाडकष्ट करणाऱ्यांचे राज्य आहे. फुलेंनी संपूर्ण वैदिक परंपरेला व तिच्या राजकीय तत्त्वज्ञानाला झुगारून दिले आहे. वर्णजातीवर आधारलेली, राजाला देव मानणारी, शूद्रांशी कपट करणारी आर्यांची परंपरा त्यांना अमान्य होती.

शूद्रांनी विद्या संपादन करून वर्णजातीभेदावर उभी असलेली ब्राम्हणशाही सरंजामशाही रचना पूर्णपणे मोडून टाकावी असे त्यांचे मत होते. त्यांची आदर्श राज्याची कल्पना त्यांच्या सार्वजनिक मूल्यांच्या कल्पनेवर आधारलेली आहे. त्यात त्यांनी सर्व जातींना मूठमाती देणारी, सर्वधर्मसमावेशक, विश्वकुटुंबात्मक कष्टकऱ्यांची लोकसत्ताक आदर्श रचना घडविण्याचा प्रस्ताव मांडला. त्यामध्ये सर्व

स्त्री-पुरुषांना निर्मिकाने दिलेले सर्व हक्क, स्वातंत्र्य व अधिकार असतील. सर्व जग धर्म, जाती, प्रदेश असे संकुचित भेद न मानता बहीण, भावंडाप्रमाणे विश्वकुटुंबात राहतील. कोणीही कोणावर बळजबरी करणार नाही. देशाभिमानाचे खूळ माजविणार नाही. सर्व वस्तूंचा यथेच्छ उपभोग घ्यावयास मिळेल. एक पत्नी, एक पती व्रतांचे आचरण असेल, न्यायदानाचे काम नि:पक्षपातीपणे होईल. कष्ट करणाऱ्यांचा आदरसत्कार होईल. चांभारालापण प्रतिष्ठा येईल. धार्मिक भेदभाव व ढोंगीपणा असणार नाही अशी भूमिका मांडली. ते पुढे असे म्हणतात की, विद्या घेतल्याशिवाय शूद्रांचा उध्दार होणार नाही. इंग्रजी ज्ञानाशिवाय मनूच्या मताचे खंडन होणार नाही. म्हणून सरकारने सर्वांना सक्तीचे शिक्षण द्यावे. ब्राम्हणांच्या उपयोगी पडणाऱ्या उच्च शिक्षणावर जास्त खर्च न करता शुद्र बहुजनांच्या प्राथमिक शिक्षणावर जास्त खर्च करावा. शेतकऱ्यांकडून शिक्षण कर वसूल केला जातो, पण त्यास शिक्षण दिले जात नाही. अशी भूमिका महात्मा फुलेंनी मांडली आहे.

स्त्री-भ्रूणहत्येची घटना म. फुले यांनी जवळून पाहिली होती, त्यामुळे त्यांचे ह्दय हेलावले. म्हणून त्यांनी १८६३ मध्ये विधवांना गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि आपली मुले तिथे ठेवण्यासाठी एक 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना केली. स्वत:च्या राहत्या घरी त्यांनी विधवांसाठीचा हा आश्रम उघडला होता, त्या दोघा पतीपत्नीने व्यक्तिगत स्वार्थ न ठेवता विलक्षण समर्पणभावाने विधवांसाठी कार्य केले.

ताराबाई शिंदे यांच्या स्त्री-पुरुष तुलना या ग्रंथामुळे व रमाबाईंच्या व्यवहारी ज्ञानामुळे पुरुषसत्तेला हादरे बसले. सनातनी गटाने त्यांच्यावर टिका केली, पण फुले यांनी या दोन्ही स्त्रियांची बाजू घेऊन 'सत्सार' मध्ये लिहिले. स्त्रीच्या पोटी जन्म घेऊन स्त्रीनिंदा करणाऱ्यांची त्यांनी निर्भत्सना केली. 'सत्सार दोन' व अन्य लेखनामधून त्यांनी स्त्रीमुक्तीचे मूलगामी तत्त्वमंथन घडवले. आई म्हणून स्त्री करत असलेले श्रम, त्याग व चांगुलपणाशी पुरुषांची तुलना केली, तर स्त्री हीच पुरुषापेक्षा श्रेष्ठ ठरते, अशी भूमिका फुलेंनी मांडली.

महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य हे महत्त्वाचे आहे. फुलेनी मुलीची पहिली शाळा उघडली. अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातीच्याही मुलीनाही शाळेत प्रवेश दिला. त्यांनी मुलीसाठी आणखीही काही शाळा उघडल्या. महारमांगाच्या मुलामुलीसाठी सहशिक्षणाच्या शाळा काढल्या. विद्यार्थ्यांसाठी वाचनालय उघडले. स्त्री-शिक्षणाचा कृतिशील प्रचारक म्हणून जोतीरावांचा लौकिक पसरला. शाळांच्या सरकारी पर्यवेक्षकांनी त्याच्या उपक्रमांची तोंड भरून कौतुक केले. सरकार दरबारीही त्याच्या कार्याची नोंद झाली. सरकारने त्यांचा व त्यांच्या पत्नीचा शालजोडी देऊन सन्मान केला. बॉम्बे गार्डीयन पूना ऑब्झर्वर, ज्ञानप्रकाश, ज्ञानोदय इत्यादी वृत्तपत्रांनी त्याच्या शिक्षणविषयक कार्याची प्रशंसा केली.

भारतीय समाज हा समानतेवर आधारित नसून ती उतरंडीवजा आहे. त्यामुळे येथे वरिष्ठवर्ग कनिष्ठांच्या शिक्षणाबद्दल उदासीन तर आहेतच त्याशिवाय त्याला या शोषित वर्गाबद्दल घृणा व तुच्छता वाटते. केवळ मूठभरांना ज्ञानसंपन्न करून उर्वरित समाजाला अज्ञानात ठेवल्यास शिक्षणाची मानवी उद्दिष्ट्ये आणि सामाजिक साध्ये कधीच पदरात पडू शकत नाही याची जाणीव जोतीरावानी राज्यकर्त्यांना करून दिली. स्त्री व शुद्रादिशूद्रांच्या प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी शासनाने अग्रक्रमाने स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले. पण केवळ शासनाला आवाहन करूनच ते थांबले नाहीत तर स्वत:च मुलीसाठी व महारमांगासाठी शाळा काढून त्या स्तरांत जाणीवजागृती करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले होते. कारण शिक्षणाच्या अभावी माणूस नैतिक, बौध्दिक आणि व्यावहारिक क्षेत्रांत प्रगती होऊ शकत नाही. ज्यांना शिक्षण मिळत नाही, ते स्वत: विचार करू शकत नाही, त्यांचा आत्मविश्वास, ध्येयवाद, पुढाकारवृत्ती, आत्मनिर्भरता व चिकित्सावृत्ती त्यांना सोडून जाते आणि हे शिक्षित उच्चवर्णियांच्या पथ्यावर पडते. धार्मिक कर्मकांडे, आर्थिक शोषण आणि सामाजिक उपेक्षा अशिक्षित कष्टकऱ्यांच्या डोक्यावर ते खुशाल लादू शकतात. शिक्षणातून भोवतालच्या परिस्थितीचे यथार्थ आकलन व्हावे, भ्रामक समजूती व अंधश्रध्दा यांचे निराकरण व्हावे, दारिद्र्य-दु:खादी अरिष्टांची खरी कारणे समजून त्यांचे निराकरण करण्यास त्यांनी प्रवृत्त व्हावे, त्यांना आत्मविश्वास आणि आत्मभान यावे, अशी जोतीरावांची अपेक्षा होती. त्यामुळे प्रत्येकाला शिक्षण मिळायलाच पाहिले अशी शिफारस फुलेंनी केली आहे.

ब्रिटिशांनी सुरू केलेली शिक्षणव्यवस्थेमध्ये महसूल हे रयतेकडून गोळा करून उच्चवर्णियांनाच शिक्षण दिले जाते, त्यामुळे प्रशासनातील सर्व वरिष्ठ पदे, उच्चविद्याविभूषित ब्राम्हण समाजालाच मिळतात असे असमाधानकारक मत जोतीरावांनी मांडले. या शिक्षण व्यवस्थेमध्ये शुद्रादिशुद्राच्या मुलामुलींची अक्षम्य आबाळ होते असाही एक आरोप जोतीरावांनी केला आहे. पंतोजींची निवड हे कसोशीने केलेली नसते, ते प्रामुख्याने उच्चवर्णीय असल्यामुळे शूद्रादिशूद्र वर्गाबद्दल त्याच्या मनामध्ये तुच्छतेची भावना निर्माण होते आणि चांगले प्रशिक्षित ही नसतात. त्यामुळे कनिष्ठ जातीमधूनच प्रशिक्षित पंतोजी निर्माण केल्यास ते स्वजातीय मुलांना शिकण्याची गोडी लावतील आणि वेळ व्यर्थ वाया न घालवता शरीर श्रमाची कामे करण्याबरोबर मुलांना जीवनाबद्दल शिक्षणही देतील. अशा सूचना जोतीरावांनी केल्या आहेत. शिक्षणाची गोडी असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यापेक्षा जेथे शिक्षण प्रसार न झालेल्या वर्गातल्या विद्यार्थ्यांना शासनाने शिष्यवृत्ती द्याव्यात अशी भूमिका जोतीरावांनी मांडली आहे. हंटर आयोगाला सादर केलेल्या आपल्या निवेदनामध्ये जोतीरावांनी मुंबई प्रांतामध्ये प्राथमिक शाळांची संख्या वाढली असली तरी गरजेपेक्षा कमीच आहेत. दर दहापैकी नऊ खेडी प्राथमिक शिक्षणाच्या कोणत्याही सोयीवाचून आहेत हे जोतीरावांनी नमूद केले आहेत. प्राथमिक शिक्षण विशिष्ट वयापर्यंत सक्तीचे करावे, शिष्यवृत्ती द्याव्यात. अस्पृश्य मानल्या गेलेल्या वर्गाच्या मुलामुलींसाठी त्याच्या वस्त्यामध्ये स्वतंत्र शाळा काढाव्यात, शिक्षकांना पुरेसे वेतन, प्रशिक्षण व प्रोत्साहन द्यावे. नेहमीच्या विषयाबरोबरच

शेतकीचे प्राथमिक ज्ञान आणि नैतिक आरोग्यविषयक ज्ञानही विद्यार्थ्यांना मिळेल असे अभ्यासक्रम राबविले जावेत. स्त्रिया व शुद्र व अतिशूद्र या वर्गाच्या शिक्षणाकडे शासनाने विशेष लक्ष पुरवावे, असा त्यांचा कटाक्ष होता. शिक्षणकाळात जर त्याना विशेष सोयी सवलती द्याव्यातच पण शिक्षण पूर्ण होताच अग्रक्रमाने सरकारी नोकऱ्याही द्याव्यात असे जोतिरावांनी सुचविले होते. अशारीतीने शिक्षणामध्ये अस्पृश्य समाजाला सवलती मिळाव्यात अशा भूमिका जोतिरावांनी मांडल्या आहेत.

## ❍ राजर्षि शाहू महाराज यांचे आरक्षणविषयक विचार

शाहू महाराजांनी वेदोक्त प्रकरणाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या समाजजीवनामध्ये बंड उभारले. त्याच्या पाठीमागे स्वत:च्या अपमानाच्या भावनेपेक्षा सामाजिक आणि सांस्कृतिक अन्यायाची चीड होती. मानवी मूल्यांची जाणीव ठेवणारे शाहू महाराजांनी अमानवी प्रवृत्तीविरुध्द आयुष्यभर लढा दिला. समाजातील अस्पृश्य जातीना न्याय देणे आणि लोकशाही समाजाची बांधणी करणे यासंदर्भात केवळ विचार मांडले नाहीत तर हातात असलेल्या राजसत्तेचा वापर करून जाणीवपूर्वक आणि तितक्याच निर्धाराने सामाजिक व आर्थिक न्यायासाठी अनेक निर्णय घेतले. शाहू महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी अनेक विचार मांडले आणि कृतीही केली आहे. शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी एक जाहीरनामा प्रसिध्द केला, तो खालीलप्रमाणे,

''सध्या कोल्हापूर संस्थानातील सर्व वर्गाच्या लोकांना शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. परंतु त्यात अपेक्षेप्रमाणे यश आले नाही ही परिस्थिती दूर करण्यासाठी व संस्थानातील लोकांना उच्च शिक्षण मिळविण्यासाटी व उत्तेजन देण्यासाठी या वर्गाकरिता आजपर्यंतच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा राखून ठेवणे योग्य ठरेल, असे सरकारने ठरविले आहे. या धोरणाला अनुसरून या हुकूमाच्या तारखेपासून ज्या जागा मोकळ्या पडतील, त्यापैकी शेकडा ५०% जागा मागासलेल्या वर्गातील लोकांना देण्यात येतील. ज्या ऑफीसमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा ५० टक्क्यांपेक्षा कमी असेल तर पुढची नेमणूक ह्या वर्गातील व्यक्तीची करावी. प्रत्येक खात्याच्या मुख्यांनी या जाहिरनाम्याच्या प्रसिध्दीनंतर भरण्यात आलेल्या जागांचे तिमाही अहवाल सादर केला पाहिजे.'' असा आदेश जारी केला.

स्वराज्य मागणीच्यावेळी मागास जातींनी सत्तेत आपला योग्य वाटा मिळविण्यासाठी राखीव जागांची मागणी करावी असे रा. शाहू महाराजांचे मत होते. आपल्या संस्थानात त्यांनी मागास जातींसाठी शे. ५० टक्के जागा राखीव ठेवल्या होत्या. लोकशाहीचे तत्त्व व स्वराज्याची मागणी (सिध्दांतेत) योग्य असली तरी सत्तेचे योग्य वाटप करण्यासाठी ते एका पुढारलेल्या जातीच्या हाती सत्ता जाऊ नये असे त्यांचे म्हणणे होते. आम्ही स्वराज्यास पात्र झाले पाहिजे आणि ज्या कारणामुळे आमचे स्वराज्य गेले त्या कारणांचा तिरस्कार केला पाहिजे, भारतात जातिसंस्था पूर्णत: नष्ट केल्याशिवाय येथे खरे स्वराज्य

नांदणार नाही, असे त्यांचे मत होते. म्हणून ते म्हणतात, ''सत्ता केवळ अल्पसंख्यांक उच्चवर्गीयांच्या हातात जाण्याचे स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान १० वर्षे तरी आम्हाला प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत, याचे आम्हाला शिक्षण मिळेल. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्यामुळे आमच्या म्युनिसिपालटीचा शोचनीय अनुभव आमच्या पुढे आहे.'' ब्राह्मणाच्या हाती जर आपणास स्वराज्याची सत्ता जाऊ द्यायची नसेल तर आपल्या अधिकाराबाबत जागृत व्हा, असे त्यांचे म्हणणे होते. शाहू महाराज म्हणतात, सर्व जातीतील लोक पुढे येऊन त्यांना सामाजिक, औद्योगिक, शिक्षण, सरकारी नोकरी वगैरे बाबतीत आपआपली जबाबदारी पूर्ण करण्याचे सामर्थ्य येणे यास मी जातवार प्रतिनिधीत्व म्हणतो. यात कोणाचाही द्वेष अपेक्षित नसून याद्वारा मागास जाती स्वत:च्या ताकदीवर पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्यांना कडेवर घेऊन जाऊ नका, पण उत्तेजन द्या, प्रतिबंध करू नका कारण आमची धडपड आमच्या अंगी शक्ती येण्यासाठी आहे. राजर्षि शाहू महाराजांनी यासाठी जातवार प्रतिनिधित्वाची मागणी केली. मद्रासमध्ये काँग्रेस पक्षाविरुध्द जस्टिस पार्टीचे जे राजकारण होते ते मुंबई इलाख्यात सुरू करण्याचा त्यांचा विचार होता. त्यामुळे ब्राह्मणेत्तरांची परिषद भरवून ही सत्ता वाटपाची चळवळ चिकाटीने चालवा असे त्यांचे सांगणे होते. लॉर्ड विलिंग्डन यांना पत्र लिहून त्यांनी भारताच्या नव्या घटनेत मागास वर्गापासून खालपर्यंत स्वतंत्र मतदारसंघ दिले पाहिजेत असे मत मांडले, कारण त्यामुळे लोकशाहीचा पाया व्यापक होईल असे त्यांना वाटत होते.

ब्राह्मणेतर जातींची आणि दलित जातींची जागृती अधिकारांच्या पायावर व्हावी, असे रा. शाहू महाराजांना वाटत होते. त्यांच्या मते, मानवी समता, उन्नतीबाबतची आकांक्षा इत्यादी माणसांचे जन्मसिध्द हक्क आहेत आणि या हक्कांच्या प्राप्तीसाठी आपण प्रयत्न केला पाहिजे.

मागास जातीनी शिक्षणाचा लाभ घ्यावा आणि नव्या बदलांना तोंड देण्यास सज्ज व्हावे, त्यासाठी त्यांनी आपला काँग्रेसपेक्षा वेगळा पक्ष स्थापन करून आपल्या अधिकाराची मागणी करावी, असे रा. शाहू महाराजांची भूमिका होती. त्यासाठी त्यांनी लोकांना प्रोत्साहन दिले, यातूनच १९१६ साली निपाणी येथे सत्यशोधक समाजाच्या परिषदेच्या वेळी डेक्कन रयत असोसिएशन स्थापन करण्यात आली. १९१७ साली या असोसिएशनचे सहचिटणीस वालचंद कोठारी यांनी जातवार प्रतिनिधीत्वाची मागणी केली. सरकारने ब्राह्मणेतरांची मागणी फेटाळली, पण मराठा जातीसाठी मुंबई विधीमंडळात सात जागा राखून ठेवल्या.

शाहू महाराजांच्या मते, मागास जातीना जागृत करून त्यांना त्याचे हक्काबाबत शिक्षण देणे आणि त्याच्या शिक्षणाची व विकासाची संधी उपलब्ध करून देणे, ब्राम्हणाच्या बनावटी धर्मास व पुरोहितशाहीस आव्हान देऊन धार्मिक व्यवहार वेदोक्तप्रमाणे आपण स्वत: करणे आणि ब्राम्हणेतरांचे

राजकीय संघटन करून त्यांची राजकीय जमवाजमव करणे त्यांना सत्ते योग्य वाटा देणे, अशी भूमिका मांडली होती. शाहू महाराजांनी मागास जातीच्या चळवळी या नैसर्गिक अधिष्ठानावर उभ्या करून त्याच्यासाठी राजकीय स्थान निर्माण केले. या चळवळीना सत्यशोधक समाज व आर्य समाज याचाही पाठिंबा होता. शाहू महाराजांची ही चळवळ आक्रमक असली तरी हिंसक होऊ नये तर ते शहाणपणाने प्रेमाने व दृढ आग्रहाने नैसर्गिक हक्क प्राप्त केले पाहिजेत असे विचार शाहू महाराजांनी मांडले आहेत.

शाहू महाराजांनी अस्पृश्य व मागास लोकांच्या उन्नतीसाठी, त्याच्यामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आणि आरक्षण धोरणाच्यासंबंधी अनेक कार्ये केली आहेत, ती खालीलप्रमाणे :-

### १. अस्पृश्यांसाठी निर्माण केलेल्या शाळा :-

शाहू महाराजांनी आपल्या संस्थानातील सर्वच मागासलेल्या जातींच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह स्थापन केली. राज्यारोहणाच्या समयी (सन १८९४) संस्थानात अस्पृश्यांसाठी फक्त ५ शाळा होत्या व त्यामधील विद्यार्थ्यांची संख्या १६८ होती. १९०७-०८ साली अस्पृश्य शाळांची संख्या १६ व विद्यार्थ्यांची संख्या ४१६ झाली. महाराजांच्या अथक प्रयत्नांनी शाळांची संख्या उत्तरोत्तर वाढत गेली. अवघ्या चार वर्षात १९१२ साली अस्पृश्य शाळांची संख्या २७ व विद्यार्थ्यांची संख्या ६३६ इतकी झाली. महाराजांच्या अथक प्रयत्नांनी शाळांची आणि विद्यार्थ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढतच गेली.

### २. हजेरी व वेठवरळा पध्दतीचे निर्मूलन :-

अस्पृश्यांवर लावणीच्या अमानुष अशा हजेरीच्या पध्दतीचे निर्मूलन १९१८ साली करण्यात आले. अस्पृश्यांच्या विशेषत: महार समाजाच्या माथ्यावर वेळवरळा ही अमानुष पध्दत लादली गेली होती. वेठवरळा पध्दतीखाली, पाटील-कुलकर्णी हे गावकामगार अथवा सरकारी अधिकारी महाराज अनेक प्रकारची कामे सांगून मोबदला न देताच काम करून घेत होते. हा प्रकारचा वतन घेता हे वतनच खालसा करून महाराज या गुलामगिरीतून मुक्त करावे असा विचार शाहू महाराज करीत होते.

### ३. महार वतन खालसा :-

महार वतनाबरोबर येणारी, वतनाची सरकार दरबारची म्हणून जी कामे होती, ती वतनदार म्हणून महारांना करावीच लागणार होती. त्यासाठी त्यांच्याकडे आऱ्या दोन आऱ्याच्या का होईना, पण वतनी जमिनी होत्या. या वतनी जमिनीच्या हक्कावरच महार स्वत:ला वतनदार म्हणवून घेत होते. पण हे वतन म्हणजे मागे सांगितल्याप्रमाणे एक प्रकारची गुलामगिरीच होती. ही गुलामगिरीही नष्ट करण्यासाठी महाराजांनी निर्णय घेतला आणि मे १९२१ मध्ये तातडीने कार्यवाही करून, त्या-त्या गावचे महार वतन खालसा करून टाकले. याबाबत महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सल्ला घेतला होता.

## ४. अस्पृश्यांची वेगवेगळ्या क्षेत्रातील नियुक्ती :-

शाहू महाराजांनी कुलकर्णीचे वतन खालसा करून त्याऐवजी तलाठी नेमण्याची पध्दती स्विकारली. या तलाठ्याच्या जागावर मागासलेल्या वर्गातील, विशेषत: अस्पृश्य वर्गातील, लोकांची वर्णी लागावी, यासाठी तलाठी वर्ग सुरू करून त्यात अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्त्या देऊन प्रशिक्षित केले गेले. अशा प्रशिक्षित अस्पृश्यांना, अग्रक्रमाने तलाठी म्हणून नेमले जावे, यासाठी महाराजांनी विशेष प्रयत्न केले आणि हुकूम जारी केला होता. त्याचबरोबर म्युनिसिपालटीच्या चेअरमनपदी अस्पृश्य नेमला गेला. अस्पृश्यांना शिक्षणात प्रसार फारसा झाला नसल्यामुळे शिकलेली माणसे मिळणे अशक्य होते. पण महाराजांनी शिक्षणाचा विचार न करता अस्पृश्यांना आपल्या अनेक खात्यात सामावून घेतले. सरकारी पागेत, पील खात्यात, शिकारी खात्यात, टपाल खात्यात. आता सर्वत्र अस्पृश्य मंडळी, सरकारी सेवक म्हणून वावरताना दिसू लागली. महाराजांनी काहीना माहूत बनविले तर काहीना आपल्या राजपरिवारांचे कोचमन, ड्रायव्हर बनविले. अस्पृश्य समाजातील लोकांना पैलवान म्हणून तयार कताना महारांना जाट, चांभारांना सरदार व भंग्याना पंडित अशी नावे देऊन इतर जातीतील लोकांबरोबर कुसत्या खेळण्यास प्रवृत्त करत असे आणि त्याची जात कळू नये म्हणून अशी योजना महाराजांनी करीत असे. पोलीस खातयातही पोलीस म्हणून नेमणूका केलेल्या दिसतात.

## ५. अस्पृश्यता निवारणासाठी महाराजाच्या अनेक उपाययोजना :-

माणगावच्या अस्पृश्य परिषदेत भाषण करताना भर सभेत शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकराना सोनतळी कॅम्पवर आपल्याबरोबर भोजनास यावे अशी विनंती केली. मे १९२० मध्ये नागपूरला अखिल भारतीय बहिष्कृत परिषदेच्या अध्यक्षपदाचा मान महाराजांना दिला गेला. परिषदेच्या कार्यक्रमात आणि नाशिक येथील अस्पृश्य विद्यार्थी वसतिगृहाच्या पायाभरणी समारंभास जाणीवपूर्वक शाहू महाराजांनी एका अस्पृश्याच्या हातचा चहा घेतला. गंगाराम कांबळे याना सत्यसुधारक हॉटेल सुरू करण्यास मदत करून महाराज स्वत: चहा घेत असत. अस्पृश्यांच्या हातचे अन्नोदक जाहीरपणे घेण्याच्या कार्यक्रमात काहीवेळा महाराजांनी सामील होत असे. अशाप्रकारे शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. कारण अस्पृश्य समाजाच्या ऐहिक गुलामगिरीबरोबर त्यांची मानसिक गुलामगिरीही नष्ट व्हायला हवी आणि त्यासाठी त्यांच्या ठिकाणी प्रथम आत्मविश्वास निर्माण करावयास हवा, असे शाहू महाराजांना वाटत होते. असा आत्मविश्वास निर्माण करण्याची संधी त्यांनी सभा-परिषदांमुळे केलेल्या अनेक भाषणांतून घेतलेली दिसते. नागपूरच्या परिषदेत अस्पृश्यांचा आत्मविश्वास व स्वाभिमान फुलवित असताना म्हणतात, ''अस्पृश्य हा शब्द कोणत्याही माणसाला लावणे फार निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाही. तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकांपेक्षा जास्त बुध्दिवान, जास्त पराक्रमी, जास्त सुविचारी, जास्त स्वार्थत्यागी असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटक आहात. मी तुम्हाला अस्पृश्य

समजत नाही. आपण निदान बरोबरीची भावंडे आहोत, आपले हक्क समसमान तरी खास आहेतच, अशी भावना धरून आपणांस पुढील कामास लागले पाहिजे.'' अशी भूमिका शाहू महाराजांनी मांडली आहे.

## १.२.३ राजकीय आरक्षण आणि नोकरी व शिक्षणातील आरक्षण

इंग्रजी राजवटीत शूद्रांना प्रथम शिक्षण घेण्याची संधी मिळाली असली तरी संधीची समानता असल्याखेरीज दारिद्र्यामुळे शूद्रातिशूद्रांमध्ये शिक्षणाचा प्रसार होणार नाही, असे म. फुले यांची खात्री झाली होती. शिक्षणाचा लाभ खेडेगांवच्या मुलास प्राप्त व्हावा, या उद्देशाने हडपसर येथे दरमहा १० रुपये खर्च करण्याइतकीही सत्यशोधक समाजाची तसेच गांवकऱ्यांची ऐपत नसल्यामुळे बंद करावी लागली होती. शाळांतून गरीब लोकांची मुले शेकडा ५ मोफत घेण्याचा हुकूम शिक्षण संचालक चॅटफील्ड यांनी काढल्याबद्दल त्यांचे सत्यशोधक समाजाने आभार मानले. शूद्रातिशूद्रांना शिक्षणाचा अधिकार द्यावा, तसेच त्यांच्या संस्थेच्या प्रमाणात अधिकारपदांवर नेमणूका कराव्यात असा म. फुल्यांनी आयुष्यभर जसा आग्रह धरला तसा १९व्या शतकातील भारतातल्या अन्य समाजसुधारकाने आग्रह धरलेला दिसत नाही.

महाराजा सयाजीराव गायकवाड (बडोदे) आणि कोल्हापूर रा. शाहू महाराज या दोन्ही संस्थानच्या महाराजांनी आपल्या संस्थानच्या हद्दीत शूद्रातिशूद्रांना शिक्षण घेण्याची संधी मिळावी म्हणून शाळा सुरू केल्या व त्या समाजातील होतकरू व बुध्दिमान विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठात प्रवेश मिळवून उच्च शिक्षण घेता यावे यासाठी शिष्यवृत्त्या दिल्या. या दोन्ही महाराजांनी डॉ. आंबेडकर यांना शिक्षणासाठी साहाय्य केले आहे हे सर्वज्ञात आहे. शूद्र समजल्या जाणाऱ्या जातीत जन्मलेल्या सुशिक्षित तरुणांची वरिष्ठ अधिकारी म्हणून नेमणूक करण्याचे धोरण शाहू महाराजांनी अवलंबिले. त्यांनी आपल्या संस्थानात ५०% राखीव जागा मागासवर्गीयांसाठी भराव्यात असा हुकूम २६ जुलै १९०२ ला काढला. तसेच म्हैसूर संस्थान, मद्रास प्रांत, मावळाकोट, बडोदा, मुंबई इत्यादी अनेक सरकारमध्ये आरक्षणाचे धोरण स्विकारण्यात आले होते. त्या सर्व गोष्टीची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

### १. म्हैसूर संस्थानातील आरक्षणाचे धोरण

म्हैसूर संस्थानमध्ये ब्राम्हण लोकांचे वर्चस्व होते, त्यामुळे ब्राम्हणेतर चळवळीमुळे आपल्या हक्कासंबंधी जागृती झालेल्या इतर जातीच्या लोकांनी १८७४ मध्ये नोकरीमध्ये आरक्षणाची मागणी करण्यास सुरूवात केली, त्यानुसार म्हैसूर संस्थानामध्ये १८७४ साली मध्यम व खालच्या स्तरातील (पोलीस विभागातील) २०% जागा ब्राम्हणासाठी व ८०% जागा या मुस्लीम व ब्राम्हणेतर हिंदु व ख्रिश्चनासाठी राखीव ठेवण्यात आल्या होत्या. १८८६ ते १९१० पर्यंत म्हैसूरचे दिवाण म्हणून मद्रास

प्रांतातील इंग्रजी शिक्षण घेतलेल्या ब्राम्हणाची नेमणूक केली जात असे. तसेच नोकरीमध्ये ब्राम्हणांचेच वर्चस्व प्रस्थापित झाल्यामुळे त्या विरोधात ब्राम्हणेतर जाती त्यामध्ये प्रामुख्याने ओक्कलिंगा व लिंगायत संघटनांनी ब्राम्हण वर्चस्वाला विरोध केला आणि सरकारी नोकरीमध्ये व शिक्षणामध्ये स्थानिक लोकांना घेण्यात यावे अशी मागणी केली. त्यामुळे म्हैसूरच्या महाराजांनी सरन्यायाधीश सर लेस्सी मिलर यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची २३ ऑगस्ट १९१८ रोजी एक समिती नेमली. या समितीने १९१९ साली आपला अहवाल सादर केला, त्यामध्ये त्यांनी ब्राम्हणेतर व मागासवर्गीयांसाठी ५०% जागा राखीव ठेवाव्यात, अशी शिफारस केली. ती १६ मे १९२१ रोजी महाराजांनी स्विकारली. १९२१ नंतर ७ वर्षाच्या कालावधीत आरक्षणाचे धोरण अंमलात आणले जाईल. ते सरकारी कर्मचाऱ्यांची भरती करताना लागू केले जाईल. मात्र बढत्या देताना ते लागू केले जाणार नाही असे म्हैसूर सरकारने जाहीर केले. मूलर समितीच्या ७ सदस्यांपैी २ ब्राम्हण सदस्य होते. सी. अलेक्झांडर अय्यर आणि एम.सी. रंगा अय्यंगार या दोघा ब्राम्हण सदस्यांनी समितीच्या अहवालास भिन्न मतपत्रिका जोडल्या होत्या. मागासवर्गीयांपैकी काही समाज आरक्षणाचे फायदे अन्य मागासवर्गीयांना मिळू न देता आपणच सगळे लाटतील असा धोका असल्याचे मत अय्यर यांनी व्यक्त केले आणि धोका टाळण्याचा उपाय म्हणून मागास जातीपैकी प्रत्येक जातीसाठी तिच्या संख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवाव्यात अशी त्यांनी सूचना केली. मिलर समितीने शैक्षणिक पात्रतेखेरीज कार्यक्षमतेच्या अन्य कसोट्याही विशद केल्या. कार्यक्षमता हे प्रशासनाचे साध्य नसून महत्त्वाचे साधन आहे. याचे मिलर समितीने भान ठेवले होते, मिलर समितीने समाजाचे तीन गटांमध्ये विभाजन केले. १) ब्राह्मण, २) अन्य सवर्ण हिंदू, मुसलमान व भारतीय ख्रिस्ती, ३) निराश्रित किंवा बहिष्कृत वर्ग (डिप्रेस्ड क्लासेस) ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशी विभागणी त्या काळात केली जात असे. ब्राह्मणेतरांमध्ये ब्राम्हण वगळता अन्य सर्व जातीचा समावेश केला जात होता.

## २. मद्रास प्रांतातील आरक्षण धोरण

आजच्या आंध्र प्रदेशातील तेलंगण वगळता उर्वरित तेलगू भाषकांचा प्रदेश आणि त्रावणकोर–कोचीन वगळता मल्याळम् भाषकांचा मुलूख स्वातंत्र्यपूर्व काळात मद्रास प्रांतात समाविष्ट केलेला होता. डॉ. टी. एम. नायर व पी. त्यागराज चेट्टी यांनी ब्राम्हणेतराचा जाहीरनामा प्रसिध्द केला. (डिसेंबर १९१६) १९१७ च्या ऑगस्टमध्ये साऊथ इंडियन लिबरल फेडरेशनची स्थापना केली. 'जस्टिस' नावाचे साप्ताहिक तिचे मुखपत्र होते. त्यामुळे 'जस्टिस पार्टी' या नावाने ब्राम्हणेतरांचा पक्ष मद्रास प्रांतात निवडणूका लढवू लागला. ब्राम्हणेतरांसाठी स्वतंत्र मतदारसंघ न मिळाल्यास विधीमंडळात, शिक्षणसंस्थांमध्ये तसेच सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा असावी, अशी जस्टिस पार्टीने मागणी केली. जस्टिस पार्टीने जातवार प्रतिनिधीत्व या विषयावर प्रसिध्द केलेले निवेदन 'मद्रास मेल' या वृत्तपत्राने २४ नोव्हेंबर १९१७ च्या अंकात पुनर्मुद्रित केले. 'प्रशासन प्रातिनिधीक स्वरूपाचे असण्यासाठी ब्राम्हणांमधील तसेच

ब्राह्मणेतरांमधील प्रत्येक जातीचे प्रतिनिधी कायदे मंडळात आणि सरकारी सेवेत असणे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. हिंदी लोकांचे केवळ ब्राम्हण आणि ब्राह्मणेतर असे ढोबळ वर्गीकरण करणे चुकीचे आहे. त्यामुळे ब्राह्मणांमधील तसेच ब्राह्मणेतरांमधील काही जाती मागासलेल्या असतात.

१९१९ च्या कायद्यानुसार १९२० साली पार पडलेला मद्रास प्रांताच्या कायदेमंडळाच्या निवडणुकीत जस्टिस पार्टीने ८१ जागा जिंकल्यामुळे तो कायदेमंडळातील सर्वात मोठा पक्ष बनला. इंग्रजी शिकलेल्या तमिळ भाषक ब्राह्मणांचे प्रमाण १९ व्या शतकाच्या अखेरीस १७.९% होते, तर इंग्रजी शिक्षण घेतलेल्या वेल्लाळ या ब्राह्मणेतर जातीचे प्रमाण १% इतकेही नव्हते. वेल्लाळापैकी मुदलियार या पोटजातीचे लोक इंग्रजी शिक्षण घेण्यात अन्य ब्राम्हणेतर जातींच्या तुलनेने पुढारलेले होते.

१९२१ साली मद्रास प्रांताचे मुख्यमंत्री आकाराम सुब्बरायलू रेड्डी यांनी आरक्षणासंदर्भात सरकारचे आदेश तयार केले, परंतु त्यास स्थगिती मिळाली, त्यामुळे सामाजिक सुधारक पेरीयार रामस्वामी नायकर यांनी आरक्षणाच्या मुद्दयावर सरकारवर दबाव टाकीत राहिले. शेवटी १९२७ साली पी. सुब्बराय यांनी कम्युनल गव्हेंमेंट ऑर्डरची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला. या आदेशानुसार ब्राम्हणेतर हिंदूना ४४%, ब्राम्हण मुस्लिम व ख्रिश्चन यांना प्रत्येकी १६% व अनुसूचित जातीसाठी ८% जागा राखीव ठेवण्यात आल्या. अशारीतीने ब्राम्हणेतर चळवळीच्या नेत्यांनी आरक्षणाचा धोरण स्विकारण्यास भाग पाडले. मुंबईत भरलेल्या पहिल्या अखिल भारतीय ब्राम्हणेतर काँग्रेसच्या सभेत सभेचे अध्यक्ष ए. रामस्वामी मुदलीयार यांनी ब्राम्हणेत्तर चळवळ म्हणजे डेमॉक्रसी असल्याचे जाहीर केले. शाहू महाराजांनी ही या चळवळीला पाठिंबा दिला होता. ब्राम्हणेतर चळवळीमुळे ब्राम्हणेतर समाजास ९८ लोकनियुक्त जागापैकी २८ जागा मिळाल्या होत्या.

## ३. मुंबई प्रांतातील आरक्षणाचे धोरण

मुंबई प्रांतामध्ये महात्मा फुले यांनी हंटर आयोगासमोर साक्ष देताना प्राथमिक शाळांची संख्या वाढली असली तरी गरजेपेक्षा कमीच आहे, ते वाढले पाहिजे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे, शिष्यवृत्ती द्याव्यात, अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजासाठी त्याच्या वाड्यावस्त्यांमध्ये स्वतंत्र शाळा सुरू कराव्यात इत्यादी अनेक मागण्या केल्या होत्या. महाराष्ट्रामध्ये ब्राम्हणेतर चळवळीला १९१६ पासून सुरुवात झाली, कारण त्याचसाली मागासलेल्या वर्गाच्या हक्काचे व हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी प्रो. अण्णासाहेब लठ्ठे, मुकुंदराव पाटील, वालचंद कोठारी, सी. के. बोले इत्यादी नेत्यांनी डेक्कन रयत असोसिएशनची स्थापना केली होती. याच संघटनेमार्फत डेक्कन रयत नावाचे वृत्तपत्रही सुरू करण्यात आले होते. हिंदुस्थानच्या कायदेमंडळात ब्राम्हण प्रतिनिधीचे वर्चस्व न राहता ब्राम्हणेतर समाजाला त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात स्थान मिळावे, यासाठी या ब्राम्हणेतर नेत्यांनी लोकजागृतीची मोहीम सुरू केली. यातूनच मराठा, जैन, लिंगायत आदी ब्राम्हणेतर जातीना स्वतंत्र प्रतिनिधीत्व मिळावे, अशी मागणी

करण्यात आली. ब्राम्हणेतर समाजाने आपल्या हिताच्या संरक्षणासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली, त्याला ब्राम्हणांनी विरोध केला त्यामुळे ब्राह्मण-ब्राम्हणेतर वाद निर्माण झाला. त्याचा परिणाम म्हणून मुंबई प्रांतातील एकूण ८६ लोकनियुक्त जागांपैकी ३५ जागा ग्रामीण भागातील प्रतिनिधीसाठी दिल्या गेल्या व या ३५ जागांपैकी ७ जागा ब्राम्हणेतरांसाठी (मराठे व तत्सम जाती) राखीव ठेवल्या गेल्या. अस्पृश्य वर्गास दोन जागा मिळाल्या, त्यावरील प्रतिनिधींची नेमणूक गव्हर्नर करणार होता.

मुंबई प्रांतातील शाहू महाराजांनी मागणी केल्याप्रमाणे मराठा व तमाम जातींना व अस्पृश्य वर्गास कायदेमंडळाचे स्वतंत्र मतदारसंघ मिळाले नाही, परंतु राखीव जागा मिळाल्यामुळे त्या राखीव मतदारसंघातून व मिश्र मतदारसंघातून ब्राम्हणेतर पक्षाचे अनेक उमेदवार निवडून आले, त्यामध्ये सी.के.बोले, आनंदराव सुर्वे, कीर्तीवानराव निंबाळकर, गणाजी काळभो, पांडुरंग जाधव, दाजीराव विचारे इत्यादी ब्राम्हणेतर मंडळी, मुंबई कायदेमंडळात गेली, तर आण्णासाहेब लठ्ठे व केशवराव बागडे हे केंद्रीय कायदे मंडळावर निवडून आले. ज्ञानदेव ध्रुवनाथ घोलप या अस्पृश्य मुलाला शाहू महाराजांनी शिक्षणाच्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. १९२४ साली मुंबई प्रांताच्या कायदेमंडळात अस्पृश्याचा पहिला प्रतिनिधी म्हणून निवडून गेला. तर कृष्णाजी मोरे या मांगाच्या मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी शाहू महाराजांनी स्वीकारली होती. तो पुढे लोकसभेचा दोनवेळा सदस्य म्हणून निवडून आला.

इंग्रजांनी मुंबई प्रांतात अनेक शाळा स्थापन करून अस्पृश्य समाजाला शिक्षणाची दारे खुली करून दिली. त्याचबरोबर त्याना नोकरीतही सामावून घेतले होते. ब्रिटीश राजवटीत मुंबई प्रांतामध्ये शिक्षण प्रसारास सुरुवात होऊन आमुलाग्र बदल घडवून आणले. यामुळे सर्व जातीधर्माच्या लोकांना शिक्षणाची दारे खुली झाल्याचे दिसते.

ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अनेक ठिकाणी अनेक अडचणीवर मात करून शाळा सुरू करून शिक्षण देण्यास सुरूवात केली होती. मुंबई इलाख्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी १८०५ मध्ये मुंबई येथे 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' या संस्थेची स्थापना झाली. कंपनीच्या नियंत्रणाखालील प्रदेशात राहणाऱ्या गरीब लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. याकामी एल्फिन्स्टन याने पुढाकार घेतला होता. देशी भाषेतून ग्रंथनिर्मिती करण्यासाठी एल्फिन्स्टन यांच्या प्रेरणेतूनच १८२० साली 'दि नेटिव्ह स्कूल अॅन्ड स्कूल बुक कमिटी' ही संस्था स्थापन झाली. या संस्थेतर्फे मुंबईत अनेक शाळा सुरू झाल्या. तसेच गुजराथी व मराठी भाषेत इंग्रजी पुस्तकांची भाषांतरे झाली. मुंबई येथे १८२४ मध्ये इंग्रजी शाळेची स्थापना झाली. त्या शाळेला पुढे 'एल्फिन्स्टन हायस्कूल' असे नांव देण्यात आले. दरम्यान १८२३ साली जगन्नाथ शंकरशेठ यांनी 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' ही संस्था स्थापन केली. या संस्थेने मुंबई व मुंबईबाहेर अनेक शाळा सुरू केल्या. त्यामुळे शिक्षण प्रसाराला चालना मिळाली. १८३४ मध्ये मुंबईत 'एल्फिन्स्टन कॉलेज' सुरू झाले.

पुण्यात संस्कृत कॉलेजची स्थापना सन १८१८ मध्ये झाली. १८५१ मध्ये संस्कृतऐवजी इंग्रजी भाषेला प्राधान्य देण्यात आले. मेकॉले यांनी पाश्चात्त्य नइंग्रजी भाषेतून शिक्षण द्यावे असा आग्रह धरला. सर चार्लस वूडच्या शिक्षणविषयक खलीतानुसार १८५७ साली मुंबई, मद्रास व कलकत्ता विद्यापीठाची स्थापना झाली. १८८२ मध्ये सर हंटर याच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची स्थापना केली. या आयोगाने खाजगी शिक्षण संस्थांना शैक्षणिक कार्यात प्रोत्साहन द्यावे, त्याना अनुदान द्यावे, शिक्षणावरील सरकारी नियंत्रणे कमी करावे, महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य करावे. प्रांतिक सरकारनी आपल्या उत्पन्नापैकी ठराविक हिस्सा शिक्षणासाठी राखून ठेवावा इत्यादी शिफारशी केल्या. त्याचबरोबर मुस्लीमांच्या शिक्षण प्रसारासाठी खास तरतूद करावी अशीही शिफारस केली. पुढे भारतीय विद्यापीठ कायदा १९०४ संमत करण्यात आला.

## ४. त्रावणकोर संस्थानातील आरक्षणाचे धोरण

या संस्थानामध्ये बहुसंख्य असलेल्या नायर समाजाला असे वाटत होते की, तामिळ ब्राम्हणांनी येथील शिक्षण, व्यापार व शास्त्रीय क्षेत्रात वर्चस्व स्थापन केले असून आम्हाला वगळले आहे, त्याचप्रमाणे उत्तर त्रावणकोर संस्थानातील प्रतिष्ठित व संपन्न सिरीयन ख्रिश्चन यांनीही एझवा समाजातील लोकांना बहिष्कृत केले आहेत. नबुंद्री ब्राम्हणाच्याकडून होणाऱ्या अन्याय वा अपमानास्पद वागणुकीमुळे नायर समाजातील लोकांनी १८९१ मध्ये मल्याळी मेमोरियल ही ब्राम्हणविरोधी संघटना स्थापन केली. नायर जमातीच्या या संघटनेने संस्थानात ब्राम्हणांनी सरकारी नोकऱ्या बळकावल्या होत्या, त्याविरुध्द मोहीम उघडली होती. मल्याळी मेमोरियल या संघटनेमध्ये ख्रिश्चन आणि एझवा जातीचे लोकही समाविष्ट झाले होते, पुढे १९०० नंतर के. रामकृष्ण पिल्लाई आणि मन्नथ पद्मनाभन पिल्लाई या उत्साही नेतृत्वाच्या गटात मल्याळी मेमोरियल ही नायराची संघटना विलीन करण्यात आली. नायर समाजातील अंतर्गत सुधारणा घडवून आणण्यासाठी मन्नथ पद्मनाभन पिल्लाई यांनी १९१४ साली नायर सर्व्हिस सोसायटी स्थापन केली, ती आजही कार्यरत आहे. के. रामकृष्ण पिल्लाई यांनी स्वदेशाभिमानी या वृत्तपत्राचे १९०६ ते १९१० या काळात संपादक म्हणून कार्यरत असताना संस्थानाच्या दरबारावर कठोर टिका केली आणि राजकीय हक्काची मागणी केली, तेव्हा सरकारने त्याना त्रावणकोर संस्थानाबाहेर हद्दपार केले. त्याचा १९१६ साली अकाली मृत्यू झाला.

१९३२ साली स्थानिक प्रश्नासंबंधी सामाजिक ध्रुवीकरणाची सुरुवात झाली. एझवा, मुस्लीम, ख्रिश्चनमधील काही घटक यांनी कायदेमंडळामध्ये व सरकारी नोकरीमध्ये प्रतिनिधीत्वाची मागणी करीत होते. त्याचा आधार लोकसंख्या असावे अशी भूमिका होती. पुढे १४ जून १९३६ रोजी त्याच्या लोकसंख्येनुसार सामाजिक आरक्षण त्रावणकोर संस्थानामध्ये देण्यात आले.

## ५. बडोदा संस्थानातील आरक्षणाचे धोरण

सयाजीरावाचा जन्म ११ मार्च १८६३ रोजी कलवण, जिल्हा नाशिक येथे झाला. २८ डिसेंबर १८८१ रोजी सयाजीराव हे बडोदा संस्थानचे राजे झाले. त्याना दिवाण सर टी. माधवराव यांनी राज्यकारभाराचे शिक्षण दिले. ते अत्यंत पुरोगामी विचारांचे व कर्तृत्ववान राजे होते. प्रशासकीय जबाबदारीची विभागणी करून राज्ययंत्रणेत सुरळीतपणा आणला आणि सल्लागार नेमून अनेक कल्याणकारी योजना अंमलात आणल्या. सयाजीरावांनी प्रथमत: सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना सुरू करून अल्पावधीतच ती सर्व राज्यभर लागूकेली. गरीब गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देवून उच्चशिक्षणाची सोय केली.

१८९१-९२ साली बडोदा, अमरेली, पाटणा आणि नवसारी येथे प्रत्येक ठिकाणी अस्पृश्य मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहे काढून त्यांच्या जेवण्याची व राहण्याची सोय केली गेली. कपडेलत्ते, पाट्यापेन्सिली वगैरेही पुरविली. ह्यानंतर कित्येक वर्षे ह्या प्रयोगाला दुष्काळ व प्लेग ही विघ्ने आली. मुलांना शाळेत पाठविण्याला या कंगाल लोकांना त्राण उरेना. हिंदू अधिकाऱ्यांच्या सहानुभूतीच्या अभावाचीही त्यात भर पडली. शेवटी ह्यातील काही वसतिगृहे बंद ठेवावी लागली. तरीदेखील महाराजांनी खर्चात बचत न करता बडोदे भागात रु. ४० च्या व इतर भागात रु. २५ च्या शिष्यवृत्त्या ठेवल्या व कसेही करून १९०० सालापासून पुढे काही वर्षे शाळांतून विद्यार्थ्यांची संख्या १०० पासून १५०० पर्यंत राहील असे केले. श्रीमंत महाराजांनी राज्यात सक्तीच्या शिक्षणाचा कायदा पास करून राष्ट्रीय शिक्षणाचा धडा इतर लहान-मोठ्या संस्थानांनाच नव्हे तर प्रत्यक्ष इंग्रज सरकारलाही घालून दिला. बडोद्यात सक्तीच्या शिक्षणाची सुरुवातीबरोबरच अस्पृश्य शाळांची संख्या १८ ची २४७ आणि विद्यार्थ्यांची संख्या ५००० ची ९२६९ झाली. बंद केलेल्या वसतिगृहांची पुन्हा गरज भासू लागली. लवकरच अस्पृश्यांच्या सुदैवाने आर्यसमाजी पं. आत्माराम ह्या तरबेज आणि स्वत:स वाहून घेतलेल्या कार्यवाहकांची जोड मिळाली. १९०७-०८ च्या सुमारास महाराजांनी न्यायमंदिराच्या भव्य दिवाणखान्यात एक जंगी दरबारवजा जाहीर सभा बोलावून स्वत:च्या अध्यक्षतेखाली 'अस्पृश्योद्धार' ह्या विषयावर व्याख्यान ठेवले. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम बडोद्याच्या कार्यावर होऊन पं. आत्मारामाच्या देखरेखीखाली अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यक्रमाला जोर आला.

बडोदे शहरातील चार वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना शिक्षण देऊनच न थांबता त्याच्या धार्मिक शिक्षणाचीही उत्तम सोय करण्यात आली आहे. गुजराथेतील अंत्यजवर्ग आपापली धार्मिक गृहकृत्ये आपल्याच जातीच्या पुरोहितांकडून करवून घेत असतात, त्यांना 'गरोडा' म्हणतात. या गरोड्यांकडून धर्मकृत्ये योग्य रितीने व्हावीत म्हणून त्यांच्यासाठी एक संस्कृत शाळा काढण्यात आली आणि त्यात २५ गरोडा विद्यार्थ्यांना दरमहा ८ रु. स्कॉलरशिप देवून तयार करण्यात आले. वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांना वेदमंत्रासह नित्याची उपासना करण्यास शिकविण्यात आले. शिवाय त्यांची दोन बालवीरपथके आहेत.

१९१८ साली आपल्या भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळीची मुंबईस एक खास अखिल भारतीय अस्पृश्यता निवारक परिषद भरली होती. त्याच्या अध्यक्षीय भाषण करताना महाराज म्हणाले, ''मला या कामी अनेक अडचणीशी झगडावे लागले, कितीही मोठ्या पगाराचे आमिष दाखविले तरी कित्येक वर्षे हिंदू शिक्षकच मिळेनात. मुसलमानांकडून व नंतर आर्यसमाजिस्टांकडून हे काम करवून घ्यावे लागले.'' ह्या कठीण कार्याबद्दल १९२१ साली 'परोपकारी सभा' या नावाच्या सभेने महारांना 'पतितपावन' अशी पदवी दिली, त्यावेळी महाराज म्हणाले, ''या पदवीला मी पात्र आहे असे मला तरी वाटत नाही. राज्याच्या काळजीमुळे व परिस्थितीमुळे ह्या कामी मला जितके करावयाचे होते, तितके घडले नाही. माझे अधिकारी मला जे सांगतात त्यावरच मला निमूटपणे अवलंबून राहावे लागते आणि ते जे करतात त्यावरच तृप्त राहावे लागते. मानवी प्रयत्नाला मर्यादा असतात. विशेषतः हिंदुस्थानातील राजेलोकांना ते सर्वाधिकारी असूनही ह्या मर्यादा अधिकच भोवतात.''

पुढे दुमदुमत राहिलेल्या मंदिरप्रवेशाच्या दंगलीतही ह्या पतितपावन महाराजांनी आघाडी मारून सरशी मिळविली आहे. मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू होण्यापूर्वीच महाराजांनी आपले खंडेराव-मंदिर अस्पृश्यांस खुले केले आणि ही चळवळ सुरू झाल्यावर १९३२ च्या ऑक्टोबर महिन्यात सर्व हिंदुधर्मीयास जातगोत मनात न आणता सरकारी देवळात प्रवेश करू द्यावा व तसे करण्यास खाजगी देवळांच्या मालकांची मने वळवावी. अशा आशयाचा महाराजांनी युरोपातील लोझानहून तारेने हुकूम पाठविला. महाराजांनी असे केले म्हणूनच त्यांना अपूर्व यश लाभले आहे.

सयाजीराव महाराजांनी असे अनेक अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले आहे, त्याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकराना संस्थानामध्ये नोकरीही दिली. रामचंद्र विठोबा धामणस्कर याची बडोद्याचे दिवाण म्हणून नेमणूक केली. अशाप्रकारे अस्पृश्य लोकांना नोकरी देण्याची व्यवस्थाही महाराजांनी केली होती.

अशाप्रकारे दक्षिण भारतातील अनेक संस्थानामध्ये राजकीय आरक्षण, नोकरी व शिक्षणामध्ये आरक्षण दिले होते, परंतु उत्तर भारतामध्ये ब्राम्हणाचे वर्चस्व असल्यामुळे तेथे फारसे आरक्षणाचे धोरणासंबंधी कार्य दिसत नाही. एकूणच भारतातील या सर्व संस्थान व प्रांतामध्ये राजकीय आरक्षण व शिक्षणासंबंधी सोयीसुविधा करून अस्पृश्य गरीब जनतेला मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले आहे.

## १.२.४ माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा आणि आरक्षण

ब्रिटीश राजवट भारतात स्थापन झाल्यानंतर भारतीय शिक्षणपध्दतीमध्ये आमूलाग्र बदल झाले. भारतातील शिक्षण व्यवस्था ही एक नव्या समाजाची निर्मिती करणारी व्यवस्था बनली. इंग्रजाने अनेक शाळा महाविद्यालये, विद्यापीठे सुरूकेली, त्याचबरोबर अनेक खाजगी शाळा, महाविद्यालये सुरू झाली.

या सर्व गोष्टीचा परिणाम म्हणून समाजात अनेक लोक शिक्षित बनले, त्यांना आपल्या हक्काची, अधिकाराची जाणीव झाली. आपल्यावर अन्याय होतो आहे याची जाणीव झाली, त्यामुळे महात्मा फुले, शाहू महाराज, मद्रासमधील अनेक ब्राम्हणेतर चळवळीतील नेते इत्यादींनी राजकीय सत्तेत सभागी करून घेण्यासाठी आंदोलन करीत होते. दुसऱ्या बाजूने १८८५ साली राष्ट्रीय सभेची स्थापना झाली आणि स्वातंत्र्य चळवळीचे कार्य करीत होते. अनेक संस्थानामध्ये नोकरी, शिक्षण इत्यादीमधये काही प्रमाणात आरक्षणही देण्यात आले होते. १९०५ साली लॉर्ड कर्झन यांनी बंगालच्या फाळणीचा निर्णय घेतला. ही प्रशासकीय सोयीसाठी करीत आहोत असे सांगितले असले तरी यामध्ये हिंदू-मुस्लिम भेदभाव निर्माण केला होता. फाळणी होताच पूर्व बंगालमधील मुस्लिमांनी बंगालच्या फाळणीला पाठिंबा देण्याच्या पार्श्वभूमीवर ३० डिसेंबर १९०६ रोजी ढाक्का येथे मुस्लीम नेत्यांची बैठक घेऊन त्यामध्ये ऑफ इंडिया मुस्लिम लीगची स्थापना करण्यात आली.

दुसऱ्या बाजूने राष्ट्रीय काँग्रेसच्या वाराणसी येथील १९०५ सालच्या अधिवेशनात बंगालच्या फाळणी विरोधात व कर्झनच्या प्रतिगामी धोरणांचा निषेध करण्यात आला आणि स्वदेशी बहिष्कार चळवळीस पाठिंबा जाहीर झाला. परंतु ही चळवळ बंगालपुरती मर्यादित ठेवावी की देशभर वाढवावी या प्रश्नावरून नेमस्त व जहाल यांच्यात मतभेद झाले आणि १९०७ च्या सूरत अधिवेशनात काँग्रेसमध्ये फूट पडली. या काँग्रेसच्या फुटीचा फायदा ब्रिटिशांनी घेतला. नेमस्त नेत्यानी इंडियन कौन्सिल ॲक्ट १८९२ अन्वये आपल्या मागण्याची पूर्तता समाधानकारकपणे झाली नाही अशी तक्रार ब्रिटीश सरकारकडे करीत होते, त्यामुळे त्या मागण्या थोड्याफार पूर्ण करण्यासाठी ब्रिटीश सरकारने इंडियन कौन्सिल ॲक्ट १९०९ मंजूर केला. तसेच १९०७-०८ मध्ये मुस्लीम लीगने मुस्लिमांना स्वतंत्र मतदार संघ व त्यांचे राजकीय हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचे प्रयत्न करीत होते. १९०८ मध्ये मुस्लीम लीगच्या लाहोर अधिवेशनात मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी करण्यात आली. या सर्व पार्श्वभूमीवर मोर्ले-मेंटो सुधारणा कायदा १९०९ ब्रिटीश सरकारने मंजूर केला.

## ❍ मोर्ले-मेंटो सुधारणा कायदा १९०९ :-

मिंटो हे भारताचे गव्हर्नर जनरल होते आणि जॉन मोर्ले हे इंग्लडच्या मंत्रिमंडळात भारतमंत्री होते. भज्ञाषरीतीत ैसल राजकीय असंतोषावर उपाय करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आणि हिंदुस्थानातील कायदे मंडळात सुधारणा करणारे बिल ब्रिटीश संसदेने १९०९ मध्ये संमत केले व इंडियन कौन्सिल ॲक्ट १९०९ अस्तित्वात आला. यालाच मोर्ले-मेंटो सुधारणा कायदा असे म्हणतात.

### कायद्यातील प्रमुख तरतुदी :-

१. केंद्रीय व प्रांतिक कायदेमंडळाची सभासद संख्या वाढविण्यात आली.

२. केंद्रीय कायदेमंडळात्रील सभासद संख्या ६८ करण्यात आली. यापैकी ३६ सरकारी आणि ३२ बिनसरकारी असावेत.

३. प्रांतिक कायदेमंडळात बिनसरकारी सभासदाचे बहुमत करण्यात आले. यापैकी २८ बिनसरकारी + १८ सरकारी एकूण ४६ परंतु हे खरे नव्हते कारण २८ मधील ७ सरकारनियुक्त म्हणजे १८+७=२५ बहुमत होत होता.

४. बंगाल, मद्रास व मुंबई कायदे मंडळातील सभासद संख्या २० च्या ऐवजी ५० तर पंजाब, ब्रम्हदेश व आसामच्या कायदे मंडळातील सभासद संख्या २० करण्यात आली.

५. मुस्लीमांना स्वतंत्र मतदार संघ देण्यात आले. मुस्लीमांचे राजकीय महत्त्व पाहून लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधीत्व देण्यात आले.

६. निवडणुकीचे तत्त्व स्वीकारण्यात आले, मात्र सर्वच सभासद प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे घेतले जात नसत.

या सुधारणा कायद्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुस्लीमांना जातीच्या, धर्माच्या आधारावर वेगळा मतदारसंघ देण्यात आला. मुस्लीम प्रतिनिधीची निवड फक्त मुस्लीम मतदारच करतील अशी तरतूद कायद्यात करण्यात आली. याचा अर्थ मुस्लीमांना हिंदूंपासून विभक्त करण्यात आले. सुधारणा कायद्यातील तरतुदीमुळे काँग्रेसला समाधान मिळाले नाही. त्यावर कडक टीका करण्यात आली. त्याचे काँग्रेस नेत्याने स्वागत केले नाही. अशा वातावरणात बंगालच्या फाळणी विरोधात बंगाली जनतेनी तीव्र विरोध केला, त्याची दखल घेऊन बंगालची फाळणी रद्द करण्यात आली. मात्र पूर्वीसारखा विशाल बंगाल न ठेवता बंगाली भाषिकांचा सिल्हेट जिल्हा वगळता बंगाल निर्माण करण्यात आला. त्याचबरोबर बिहार व ओरीसा हे प्रांत बंगालमधून वेगळे करण्यात आले. सिल्हेट जिल्ह्याचा समावेश करून आसाम हा नवा प्रांत निर्माण करण्यात आला.

१९०९ च्या सुधारणा कायद्याने मुस्लीमांना स्वतंत्र मतदार संघ मिळाल्यामुळे शीख, ॲग्लो इंडियन, हरिजन, ख्रिश्चन इत्यादी लोकांनी स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीसाठी प्रयत्न सुरू ठेवले. १९१६ साली लखनौ येथे राष्ट्रीय काँग्रेस व मुस्लीम लीग यांची स्वतंत्रपणे अधिवेशने एकाच दिवशी घेण्यात आली. दोन्ही संघटनांनी समान कार्यक्रमावर आधारित राजकीय मागण्याचे संयुक्त निवेदन करण्यासंबंधीचे ठराव मंजूर झाले. त्या ठरावानुसार राष्ट्रीय काँग्रेस आणि मुस्लीम लीग याच्यात करार झाला, त्याला लखनौ करार असे म्हटले जाते. या लखनौ करारामुळे काँग्रेसने मुस्लीमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ ठेवण्याच्या निर्णयाला औपचारिकपणे मान्यता दिली. यातून जातीयवादी राजकारणाचा उदय झाला. याचवर्षी (१९१६) लोकमान्य टिळक आणि डॉ. ॲनी बेझंट यांनी होमरूल लीगची चळवळ सुरू केली. ब्रिटीश सरकारने होमरूल चळवळ दडपून टाकण्यासाठी भाषणाबद्दलच्या आरोपावरून टिळकांवर खटला दाखल

केला. या खटल्याचा काही परिणाम झाला नाही, त्यामुळे ब्रिटीश सरकारला आपल्या धोरणात बदल करावा लागला. त्यासाठी त्यांनी माँटेग्यूच्या ऑगस्ट डिक्लेरेशन जाहीर केले, यानंतर ॲनी बेझंट यांनी होमरूल चळवळीतून माघार घेतली, पण टिळकांनी आपले कार्य चालूच ठेवले होते.

## ❍ माँटेग्यू डिक्लेरेशन (ऑगस्ट १९१७) :-

पहिल्या महायुद्धातील इंग्लंडचा सहभाग, क्रांतिकारी दशहतवाद्यांचे दडपण आणि होमरूल लीग चळवळीची लोकप्रियता यांचा ब्रिटीश-सरकारवर परिणाम म्हणून एडविन माँटेग्यू भारतमंत्रीपदी आल्यानंतर २० ऑगस्ट, १९१७ रोजी ब्रिटीश पार्लमेंटच्या कॉमन्स सभागृहात, हिंदी लोकांना प्रशासनाच्या सर्व विभागात सहभाग व 'जबाबदार राज्यपध्दती' (Responsible Government) देण्याच्यादृष्टीने स्वयंशासित संस्थांचा विकास घडवून आणण्याचे आश्वासन देणारे 'माँटेग्यू डिक्लेरेशन' जाहीर केले. या जाहीरनाम्याच्या अनुरोधाने माँटेग्यूने नोव्हेंबर, १९१७ मध्ये हिंदुस्थानला भेट देऊन सर्व थरांतील नेत्यांशी चर्चा करून हिंदुस्थानला घटनात्मक सुधारणा देणारा अहवाल जुलै, १९१८ ला प्रकाशित केला. हाच अहवाल 'माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा' १९१९ चा आधार ठरला.

## ❍ माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायदा-१९१९

भारतमंत्री माँटेग्यूच्या १९१७ च्या 'ऑगस्ट डिक्लेरेशन' नुसार ब्रिटीश पार्लमेंटने २२ डिसेंबर, १९१९ रोजी 'गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट-१९१९' कायदा मंजूर केला. या कायद्यासत्रास 'माँटेफोर्ड सुधारणा कायदा' असेही संबोधले जाते. या कायद्यातील प्रमुख तरतुदी अशा आहेत.

**प्रांतिक सरकार :-**

१) प्रांतिक सरकारमध्ये सरकार नियुक्त मंत्री व लोकनियुक्त मंत्री अशी गव्हर्नरच्या कार्यकारी मडळाची द्रिस्तरीय नियुक्ती करण्यात आली.

२) प्रांतिक खात्यामध्ये राखीव (Reserved) आणि सोपीव (Transferred) अशी विभागणी करण्यात आली.

३) राखीव खात्यांचा कारभार गव्हर्नरकडे व सोपीव खात्याचा कारभार लोकप्रतिनिधीच्या मंत्र्याकडे सोपविण्यात आला. यालाच द्विदल राजपध्दती असे म्हटले जाते.

४) प्रांतिक कायदे मंडळातील सभासदांची संख्या वाढविण्यात येऊन त्यापैकी ७० टक्के सभासद निवडणुकीने घेण्याची तरतूद करण्यात आली.

५) जातवार मतदारसंघ निश्चित करण्यात आले.

६) कायदेमंडळात सभासदांना विधेयके मांडण्याचा अधिकार देण्यात आला. परंतु ती नाकारण्याचाही अधिकार गव्हर्नरला देण्यात आला.

७) कायदेमंडळात भाषण करण्याचा अधिकार देण्यात आला.

**केंद्रीय सरकार :-**

१) गव्हर्नर जनरल हाच कार्यकारी मंडळाचा सर्वोच्च अधिकारी होता.

२) राज्यकारभारात केंद्रीय व प्रांतीय अशी खात्यांची विभागणी करण्यात येऊन केंद्रीय खात्याबरोबर काही प्रांतीक खातीही केंद्रीय कार्यकारी मंडळाकडे देण्यात आली.

३) केंद्रीय कार्यकारी मंडळातील ८ पैकी ३ मंत्री हिंदी ठेवण्यात आले.

४) गव्हर्नर जनरलला, कायदेमंडळाने आर्थिक विधेयकात अनुदान कपात केल्यास ते नामंजूर करण्याचा अधिकार होता.

५) केंद्रीय कनिष्ठ कायदेमंडळात एकूण १४४ सभासद (४१ सरकारनियुक्त + १०३ निर्वाचित- ५३ सर्वसाधारण + ३० मुस्लीम + २ शीख + २० विशेष वर्गीय मतदाराकडून असे आरक्षण देण्यात आले) घेण्यात आले.

६) केंद्रीय वरिष्ठ कायदेमंडळात एकूण ६० सभासद (२६ सरकारनियुक्त + ३४ निर्वाचित- २० सर्वसाधारण + १० मुस्लीम + ३ युरोपीयन + १ शीख असे आरक्षण देण्यात आले) घेण्यात आले.

७) कनिष्ठ कायदेमंडळाची मुदत ३ वर्षे व वरीष्ठ कायदेमंडळाची मुदत ५ वर्षे होती.

८) कायदेमंडळातील सदस्य सभागृहात प्रश्न विचारू शकत होते. स्थगन प्रस्ताव मांडू शकत होते आणि अंदाजपत्रकातील फक्त २५ टक्के बाबींवर मतदान करू शकत होते. ७० टक्के बाबीवर ते मतदान करू शकत नव्हते.

अशाप्रकारे १९१९ च्या कायद्यामध्ये तरतूदी करण्यात आल्या. एकूणच माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यामध्ये मुस्लीमांना वेगळा मतदार संघ १९०९ च्या कायद्यानुसार देण्यात आला होता, त्यात वाढ करण्यात आली, त्याचबरोबर पंजाबमधील शीख व मद्रासमधील ब्राम्हणेतरांनाही वेगळे मतदार संघ देण्यात आले. त्याचबरोबर युरोपीयन लोकानाही वेगळे मतदार संघ देण्यात आले, एकूणच या सुधारणा कायद्याद्वारे आरक्षणाचे धोरण हे विस्तारले गेले. जातवार धर्माच्या आधारावर आरक्षण देण्याचे तत्व स्विकारण्यात आले, त्यामुळे हरिजन, ख्रिश्चन, ॲग्लोइंडियन लोकांनीही स्वतंत्र मतदार संघाची मागणी करू लागले.

ते नंतरच्या काळामध्ये पूर्णही झाले, परंतु खऱ्या अर्थाने हा सुधारणा कायद्याद्वारे आरक्षण देण्याचे तत्त्व निश्चित झाले.

## १.२.५ कोल्हापूर संस्थानातील आरक्षणाचे धोरण

शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून महाराठ्यामध्ये अस्मिता व स्वातंत्र्यप्रेम निर्माण केले, त्याच्या निधनानंतर ज्येष्ठ पुत्र संभाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याचे रक्षण केले, परंतु औरंगजेब मराठी राज्यावर चाल करून आला, त्याच्याशी लढताना संभाजी महाराजांना कैद केले आणि त्याना ठार केले, त्यांची राणी येसूबाई व मुलगा शाहूराजे यांनाही कैद केले. अशा परिस्थितीत शिवछत्रपतींचे धाकटे पुत्र राजाराम महाराज यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्याची बादशहाशी जिद्दीने संघर्ष सुरू ठेवला, परंतु १७०० साली त्यांचे अकाली निधन झाले त्यामुळे स्वराज्याचा कारभार करणे आणि संरक्षण करण्याची जबाबदारी राणी ताराबाई यांच्यावर पडले. वयाच्या पंचवीसाव्या वर्षी आलेल्या वैधव्याचे दु:ख बाजूस ठेवून औरंगजेबाशी सतत ७ वर्षे लढा दिला. अखेर १७०७ ला औरंगजेब मृत्यू पावला. त्यावेळी छ. संभाजीपुत्र शाहूराजे यांना मांडलिकत्व स्विकारण्याच्या अटीवर सुटका करण्यात आली. मोंगलांच्या मांडलिकत्वावरून ताराबाई व शाहूराजे यांच्यात संघर्ष झाला, त्याचे रूपांतर यादवी युध्दात झाले. ताराबाईचा सेनापतीच शाहूराजांना मिळाल्यामुळे ताराबाईचा पराभव झाला. परंतु पूर्णपणे ताराबाईना पराभव करता आला नाही, शेवटी ताराबाईंनी पन्हाळ्यावर १७१४ साली सवतीचे पुत्र संभाजी महाराज कोल्हापूरच्या गादीवर आणले. तिकडे शाहूराजे साताऱ्यात आपली राजधानी केली अशी स्वराज्याचे दोन संस्थाने झाली.

कोल्हापूर संस्थानातील संभाजी महाराजांची राणी जिजाबाई या मोठ्या कर्तबगार होत्या, त्याच्याच कारकिर्दीत ब्रिटीशांनी सिंधुदुर्ग किल्ला जिंकून कोल्हापूर संस्थानात प्रवेश केला तो किल्ला जिजाबाईंनी परत मिळविला, परंतु ब्रिटिशांना वखारी उघडण्याची परवानगी मिळाली. पुढे गादीवर आलेल्या दुसरे शिवाजी महाराज यांच्याशी ब्रिटीशांनी १८१२ साली सहकार्याचा करार केला. त्याद्वारे कोल्हापूर लष्करावर मर्यादा घातल्या. १८२९ साली आणखी एक करार करून त्याद्वारे संस्थानाचे कारभार कंपनीच्या बहादूराच्या हाती गेली. १८४४ साली कोल्हापूर राज्याच्या कारभारावर ब्रिटीशांनी आपल्यावतीने दाजी कृष्ण पंडीत याची प्रमुख कारभारी म्हणून नेमणूक केली. यावेळी छत्रपती बाबासाहेब महाराज अल्पवयीन होते, त्यामुळे कोल्हापूरचा कारभार मेजर ग्रॅहॅम या पोलिटिकल सुपरीटेंटच्या हाती गेला. पुढे बाबासाहेब दोन वर्षे सत्ता उपभोगली असेल तोच त्यांचे निधन झाले. राजाराम महाराज गादीवर आले, त्यांचाही फ्लॉरेन्स शहरात १८७० मध्ये मृत्यू झाला. पुढे चौथे शिवाजी महाराज गादीवर आले, त्यांचे वय केवळ ९ वर्षे होते. त्यामुळे ब्रिटीशांनी नेमलेल्या कारभाऱ्यामार्फत चालू राहिला. माधवराव बर्वे नावाच्या ब्राम्हण दिवाणानी छत्रपतीना मनोरुग्ण ठरवून त्यांना अहमदनगर किल्ल्यात डांबून ठेवले,

तेथेच त्यांचा मृत्यू झाला (१८८३), त्याच्यापूर्वी १८८२ मध्ये रीजन्सी कौन्सील स्थापन करून बाबासाहेब महाराजांचे भाचे व प्लॉरेन्समध्ये निधन पावलेल्या राजाराम महाराजांचे मावसबंधू व कागलच्या थोरल्या पातीचे जहागीरदार जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे यांचे थोरले पुत्र यशवंतराव हे १७ मार्च १८८४ रोजी शाहू छत्रपती महाराज म्हणून कोल्हापूरच्या गादीवर आले. २ एप्रिल १८९४ रोजी त्यांनी कोल्हापूर संस्थानच्या कारभाराची अधिकारसूत्रे हाती घेतली.

शाहू महाराजांनी अधिकार प्राप्त केल्यानंतर कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक सामाजिक हिताचे निर्णय घेतले आहेत, त्यामध्ये शिक्षण आरक्षण, अस्पृश्य निवारण, स्त्रीयांच्या हिताचे असे अनेक निर्णय घेतले आहेत, त्यासंबंधी धोरणे ठरविलेले आहेत तरआपण आरक्षणासंदर्भातील धोरणाची चर्चा खालील मुद्याच्या आधारे करणार आहोत.

## १. नोकरीमधील ५०% आरक्षण :-

२६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानामध्ये एक आदेश जारी करण्यात आला. त्या आदेशाद्वारे आदेशजारी झालेल्या तारखेपासून रिकामे झालेल्या जागापैकी शेकडा ५०% जागा मागासलेल्या लोकांस भराव्या. ज्या ऑफीसामध्ये मागासलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा ५०% पेक्षा कमी असेल तर पुढीची नेमणूक ह्या वर्गातील व्यक्तीची करावी. त्या हुकूमाच्या प्रसिध्दीनंतर केलेल्या सर्व नेमणूकांचे तिमाही पत्रक प्रत्येक खात्याच्या मुखियानी सरकारांकडे पाठवावे. *(सूचना : मागासलेल्या वर्णाचा अर्थ ब्राम्हण, परसू, शेणवी व पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ग खेरीज करून सर्व वर्ग असा समजावा.)*

## २. अस्पृश्यासाठीचे शैक्षणिक धोरण :-

अस्पृश्यांना समाजात बरोबरीने स्थान मिळावे म्हणून छ. शाहूंनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले होते. त्याच धोरणाचा अवलंब करून राजारामांनी अस्पृश्यांना अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या. इलाखा पंचायतीच्या शाळांमध्ये अस्पृश्यांची विद्यार्थी संख्या २३४९ होती. त्यांना फी माफ केली होती. मोफत पाटी-पुस्तके उपलब्ध करून दिली होती. शिवाय त्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून त्यांच्यासाठी खास शिकवणी वर्गाची सोय केली होती. इलाखा पंचायतीच्या सेवेत २५ अस्पृश्यांना गुरूजन म्हणून नियुक्त केले होते. शिक्षणा शिवाय अस्पृश्यांचा विकास होणार नाही, यासाठी राजाराम महाराजानी अस्पृश्यांच्या शिक्षण सुधारणेकडे खास लक्ष दिले. शाळेतील इतर मुलाबरोबर फिरण्याची त्यांच्यात मिसळण्याची मुभा होती. अस्पृश्यांसाठी वेगळ्या शाळा भरत नव्हत्या. खेड्यातील बहुतेक शाळा देवळात भरत होत्या. त्या ठिकाणी अस्पृश्य विद्यार्थ्यांना पूर्ण स्वातंत्र्य होते.

छ. राजाराम महाराजांनी दलित विद्यार्थ्यांच्या शिक्षण सुधारणेसाठी उत्तेजनार्थ वेगवेगळ्या प्रकारच्या

शिष्यवृत्त्या सुरू केल्या. हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळत होता. शिष्यवृत्त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत होती. (कॉ.) प्रिन्स शिवाजी महाराज यांचे स्मरणार्थ करवीर इलाख्यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सन १९२४ मध्ये पुढील शिष्यवृत्त्या ठेवण्यात आल्या होत्या.

१) आयर्विन हायस्कूलमध्ये शिकणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांस इंग्रजी ५ वी ते मॅट्रीकपर्यंत ५ रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती.

२) करवीर इलाख्यात इंग्रजी तिसरी शिकणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांस इंग्रजी ५ वी ते मॅट्रीकपर्यंत ५ रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती.

३) करवीर इलाख्यात शिकणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थ्यांत दरमहा ८ रुपये प्रमाणे शिष्यवृत्ती.

४) मॅट्रीक पास होऊन कॉलेज शिकणाऱ्या अस्पृश्य विद्यार्थिनीस कॉलेज पूर्ण होईपर्यंत रुपये १० प्रमाणे शिष्यवृत्ती.

शाहू महाराजांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन केली, त्यामध्ये जातवार वसतिगृहे स्थापन करण्यात आली. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग, मुस्लीम बोर्डिंग, प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग, इंदुमती वसतिगृह, मिस क्लार्क होस्टेल (अस्पृश्य), चांभार व ढोर या दोन जातीसाठी स्वतंत्र वसतिगृह १९१९ साली स्थापन केले. अशाप्रकारे शाहू महाराजांनी शिक्षण देण्यासाठी जातवार वसतिगृहे काढली आणि शिक्षण हे सर्वांना मिळावे यासाठी अनेक कायदे, आदेश काढले.

## ३. अस्पृश्यांसाठी नोकरीमधील आरक्षणाचे धोरण :-

संस्थानच्या लष्करी सेवेत मराठा व तत्सम जातींचे लोक प्रामुख्याने असत. ही सर्व मंडळी अस्पृश्यता पाळणारी होती. शाहू महाराजांनी १९१७ साली आपल्या 'लष्करी फडात' चार अस्पृश्यांची नेमणूक केली. त्यापैकी दोघे महार होते तर दोघे मांग होते. अन्य सरकारी सेवेतही अस्पृश्यांच्या नेमणूका केल्या जाव्यात, यासाठी रा. शाहूंनी ५ ऑगस्ट १९१८ रोजी खास हुकूम काढला की, ''अस्पृश्य जातीचे लोकानां तलाठी नेमण्याबद्दल अलाहिदा हुकूम देण्यात आलेला आहे. सदर लोकांपैकी जे लोक आपले कर्तबगारीने व बुध्दीने पुढे येतील त्यांस भाग कारकून अशा प्रकारच्या जागा देण्यात याव्यात.

अस्पृश्यांसाठी तलाठी वर्ग सुरू केले, त्यात अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्त्या देऊन प्रशिक्षित केले गेले. अशा प्रशिक्षित अस्पृश्यांना अग्रक्रमाने तलाठी नेमले जावे यासाठी महाराजांनी खास हुकूम जारी केला. त्यात म्हटले होते, ''हल्ली तलाठ्यांच्या नेमणूका चालल्या आहेत, त्यात अस्पृश्य जातीच्या लोकांस प्राधान्य देण्यात यावे व तसेच त्या जातीतील लोकांस योग्य ती योग्यता असल्यास

दरबारातील काणत्याही योग्यतेच्या जाग्यावर म्हणजे रेव्हन्यू, ज्युडिशियल, पोलीस व जनरल आदी कोणत्याही विभागाच्या मुख्याच्या जाग्यावरही नेमण्यात येईल. इतस्त: त्यांच्या अस्पृश्यत्वाची सबब सरकारी नोकरीच्या बाबतीत (ऐकून) घेतली जाणार नाही म्हणून जाहीर करण्यात यावे. (८ ऑगस्ट १९१८) अशाच आशयाचा एक हुकूम आणखी वर्षभराने काढला गेला, त्यात म्हटले होते की, ज्या जातीची लोकवस्ती जास्त असेल त्या जातीचे होता होईल तो तलाठी नेमावा. महार, मांग, चांभार वगैरे अस्पृश्य जातीच्या लोकांना होईल तितका प्राधान्यक्रम द्यावा. प्रत्येक पेट्यास ५ व प्रत्येक महालास निदान तीन तरी अस्पृश्य असावेत. (२६ ऑगस्ट १९१९).

शाहू महाराजांनी अस्पृश्यांपैकी काहींच्या मुलकी खात्यात 'दप्तरबंद' म्हणून तर काहींच्या पोलीस खात्यात 'पोलीस' म्हणून नेमणूका केलेल्या दिसतात. १९२० साली शहरातील पोलीस गेटावर १६ महारांची नेमणूक करताना महाराजांनी म्हटले आहे की, या लोकांचा समाजात दर्जा वाढावा, म्हणून आपण हे करीत आहोत.

## ४. अस्पृश्यता निवारणासाठीचे जाहीरनामे :-

आपल्या संस्थानातून अस्पृश्येतेचे उच्चाटन करण्याच्या इराद्याने १९१९ च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस दोन जाहीरनामे मंजूर केले. त्यातील पहिला महसूल, न्याय इत्यादी खात्यासंबंधी होता. त्यात म्हटले होते, ''कोल्हापूर इलाख्यातील रेव्हिन्यू, ज्युडिशियल आदिकरून सर्व अधिकाऱ्यांनी आमच्या संस्थानात जे अस्पृश्य नोकरी धरतील त्यांना प्रेमाने व समतेने वागविले पाहिजे. जर कोणा अधिकाऱ्यांची वरीलप्रमाणे अस्पृश्यांना वागविण्याची इच्छा नसेल त्याने हा हुकूम पोहोचल्यापासून सहा आठवड्यांच्या आत नोटीस देवून राजीनामा द्यावा, त्याला पेन्शन मिळणार नाही.'' आमची अशी इच्छा आहे की, ''आमच्या राज्यातील कोणाही इसमाला जनावरांप्रमाणे न वागविता मनुष्य प्राण्यांप्रमाणे वागवावे.... आमच्या अधिकाऱ्यांनी मिशनरी, आर्य समाजिस्ट, रेल्वे व गव्हर्नमेंट अधिकाऱ्यांचे ह्या बाबतीत अनुकरण करावे.''

शिक्षण खात्यासाठी काढेलला हुकूमनाम्यात शाहू महाराज म्हणतात, ''हुजूरांच्या असे पाहण्यात आले की, अस्पृश्यांना व स्पृश्यांना शाळा खात्यात निरनिराळ्या तऱ्हेने वागविले जाते व अस्पृश्यांना शाळा खात्याच्या इमारतीच्या कंपाऊंडच्या आत येऊ दिले जात नाही. सरकारी इमारती खाजगी उपयोगसााठी दिलेल्या नसल्यामुळे अस्पृश्यांना तुच्छतेने वागविण्याचा कोणालाही हक्क नसून अस्पृश्यांचा प्रत्येक तऱ्हेने काळजी घेतली पाहिजे. शिक्षणसंस्था गरीब लोकांकरिता असून गरीबातील गरीब जे अस्पृश्य, त्यांना समतेच्या पायावर वागविणे योग्य आहे. ते कर देतात तर मग त्यांना वाईट रीतीने का वागवावे? हुजूरांची अंत:करणपूर्वक इच्छा आहे की, शाळा खात्यातील ज्या खाजगी किंवा सरकारी संस्थांना ग्रँट किंवा इमारती किंवा प्ले ग्राऊंड वगैरे रूपाने मदत मिळते, त्यांनी

अस्पृश्यवर्गांपेक्षा अस्पृशांना जास्त ममतेने व आदराने वागवावे. कारण स्पृश्य लोक कोणत्याही प्रकारे शिक्षणात आपला मार्ग काढू शकतात, परंतु अस्पृश्यांना ते असाध्य असल्यामुळे कोणताही मार्ग नाही. जर अस्पृशांना समतेने वागविले नाही तर मग तो प्रिन्सीपॉल अगर खालच्या दर्जाचा शिक्षक असो, त्याला जाब द्यावा लागेल, आणि खाजगी संस्थांना जी मदत मिळते ती काढून घेण्यात येईल.''

यानंतर पुढच्याच महिन्यात शाहू महाराजांनी ''सर्व सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाऊस, सरकारी अन्नछत्रे वगैरे ठिकाणी व नदीचे पाणवठे, सार्वजनिक विहिरी येथे कोणत्याही मनुष्यप्राण्याचा विटाळ मानण्याचा नाही.'' म्हणून एक तमाम जनतेसाठी अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा काढला. (६ सप्टेंबर १९१९) रोजी काढला.

## ५. मंदीर प्रवेशाचा जाहीरनामा :-

छ. शाहू महाराजांच्या कारकिर्दीत जुन्या राजवाड्यातील कुलस्वामिनी अंबिकेचे दर्शन बहिष्कृत वर्गाला झाले नव्हते. परंतु छ. राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत ते दर्शन त्यांना प्रत्यक्ष घेता येऊ लागले. १९३० साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू केली. याचा परिणाम महाराष्ट्रात काही ठिकाणी चळवळ उभी राहिली. कोल्हापूर संस्थानही या चळवळीत मागे राहिले नाही. २५ सप्टेंबर १९३२ रोजी कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवालयात 'मुक्तद्वार भोजन समारंभ' आयोजित केला आणि महालक्ष्मी देवालय दलितांना खुले झाले.

## ६. सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा (३० मार्च १९३९) :-

महार वतनाचा कायदा, सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना प्रवेश, वेळवरळा प्रतिबंधक कायदा, देवदासी, मुरळी कायदा असे अनेक समाजसुधारक कायदे रा.शाहू महाराजांनी केले होते. जोपर्यंत समाजाचे सामाजिक व मानसिक परिवर्तन होत नाही, तोपर्यंत कायदे करूनही त्याचा फारसा उपयोग होत नसतो. वरील सर्व कायदे असूनसुध्दा अस्पृश्यावरील अन्याय, अत्याचार थांबले नाहीत. अस्पृश्य वर्गाच्या आर्थिक नाड्या स्पृश्य समाजाच्या हातात होत्या. वरिष्ठ जातीतील लोक सनातनी व कर्मठ असल्याने अस्पृश्यांतील सामाजिक अत्याचार सुरूच होते. दलितांनी सार्वजनिक ठिकाणी प्रवेश केला. सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरले. अथवा जुन्या परंपरा नाकारल्या की लगेच सवर्ण समाज संघटितपणे दलितावर सामाजिक बहिष्कार घालत असे. त्यामुळे दलितांचा आर्थिक कोंडमारा होई. सामाजिक बहिष्कार प्रतिबंध कायदा १९३९ ला पास केला. या कायद्यानुसार सहा महिन्यांची शिक्षा किंवा ५०० रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा एकदम भोगाव्या लागतील अशी तरतूद केली. हा कायदा अजामीनपात्र होता.

## ७. अस्पृश्यांना खास निमंत्रण :–

छ. राजाराम महाराज खास निमंत्रण देऊन काही कार्यक्रम नव्या राजवाड्यावर आयोजित करीत. अशा कार्यक्रमांना मुद्दाम अस्पृश्यांना निमंत्रित करीत व अस्पृश्यांना पाहुण्यांच्या स्वागताची जबाबदारी छ. शाहूनी सोपविली होती. याची फार मोठी चर्चा त्याकाळात झाली. छ. राजाराम महाराजांनी अस्पृश्य बांधवांना खास कार्यक्रमासाठी निमंत्रित करून पुढची पायरी गाठली. अशा प्रकारच्या कार्यक्रमांमुळे समाज जीवनाच्या प्रवाहात आत्मविश्वास वाढला आणि त्यातून सामाजिक विषमतेची दरी कमी होण्यास मदत झाली.

## ८. अस्पृश्यांना राजकीय आरक्षण :–

कोल्हापूर म्युनिसिपाल्टीच्या कार्यालयातही प्रथमच एक अस्पृश्य नेमला गेला. एवढेच नव्हे तर म्युनिसिपाल्टीच्या चेअरमनपदी प्रथमच एका अस्पृश्याची–दत्तोबा पवार यांची रा. शाहूंच्या प्रेरणेने नेमणूक झाली. त्याचबरोबर म्युनिसिपाल्टीत एक व्हटकर नावाचा क्लार्क वीस रुपये पगारावर अस्पृश्य जातीतील आहे, शिवाय हिरा मदार भंगी यास लोकनियुक्त कमिटीवर म्युनिसिपल मेंबर म्हणून नेमल्याची एक नोंद मिळते. कोल्हापूर संस्थानात १९२० साली १०० टक्के जातवार प्रतिनिधीत्व असणारी नगरपालिका अस्तित्वात आली होती. पण तिच्यातील अपूर्णत: लक्षात घेऊन राजारामांनी नवीन नगरपालिका कायदा पास केला. या कायद्यामध्ये अस्पृश्यांसाठी दोन जागा वगळता जातवार प्रतिनिधीत्व रद्द करण्यात आले. छ. राजाराम महाराजांचे हे योगदान नमूद करणे आवश्यक आहे.

## ९. अस्पृश्यांसाठीचे सहभोजन :–

शाहू सत्यशोधक समाजातर्फे दि. ३०–१२–१९२८ रोजी सहभोजन आयोजित करण्यात आले. या सहभोजनास कोल्हापूरमधील प्रतिष्ठित लोक उपस्थित होते. या सहभोजनासाठी उपस्थित असलेल्या लोकांची जातवार संख्या पुढीलप्रमाणे होती. मराठा–८९, ख्रिश्चन–४, जैन–२, महार–१४, मुसलमान–६, न्हावी–४, चांभार–५, ढोर–७, शिंपी–४, तांबट–१, भंगी–१, ब्राह्मण–३, करजगार–२, मांग–२, जिनगर–२ व मराठा जातीच्या दोन स्त्रिया. ५ ऑक्टोबर १९३२ रोजी नवी बुधवार पेठ म्हणजे सध्याची शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे सहभोजनाचे आयोजन केले होते. ३५० लोकांनी भाग घेतला होता. असे अनेकवेळा सहभोजनाचे आयोजन केले होते, यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी प्रोत्साहन दिले व सहभाग घेतला.

## १०. मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा :–

शाहू महाराजांनी शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वाचे निर्णय घेतलेले होते. कोल्हापूर संस्थानातील जनतेला प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे. यासंदर्भात २४ जुलै १९१७ रोजी असे जाहीर केले

की, येत्या गणेश चतुर्थीपासून (३० सप्टेंबर) करवीर इलाख्यात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचे आहे. सध्या असलेल्या सर्व प्राथमिक शाळांतील फी सदर दिवसापासून माफ करण्यात येत आहे. या संदर्भात नियमावली तयार करण्यासाठी करमळकर, मराठे व प्रो. पंडीतराव अशा तीन ब्राम्हण शिक्षणतज्ञांची समिती नेमली. या सक्तीच्या शिक्षणासाठी १ लाख रुपये खर्च करण्याचे जाहीर केले, त्यापैकी ८० हजार रुपये दरबार खजिन्यातून तर २० हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च होणार होते. २१ सप्टेंबर १९१७ रोजी शिक्षणतज्ञांनी तयार केलेल्या नियमावलीवर आधारीत सक्तीच्या शिक्षणाचा कायदा जाहीर केला. या कायद्याद्वारे शिक्षणास योग्य वयाची मुले शाळेत पाठविण्याची आईबापांवर सक्ती करण्यात आली. त्यांनी तशी पाठविली नाहीत तर त्याना प्रत्येक एक रुपया महिना दंड करण्याची तरतूद करण्यात आली. या कायद्याची अंमलबजावणी कसोशीने केली गेली. साधारणपणे ५०० ते १००० लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिकशाळा सुरू केली गेली. वर्षभरात संस्थानातील खेडड्यापाड्यामध्ये ९६ नव्या शाळा सुरू झाल्या. अशा पहिल्या सक्तीच्या शाळेचे उद्‌घाटन सोहळा चिखली गावी शाहू महाराजांच्या हस्ते ४ मार्च १९१८ रोजी संपन्न झाला. या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याद्वारे स्वतंत्र खाते निर्माण केले व ते खाते खुद्द महाराजांच्या नजरेखाली राहील असे जाहीर केले.

अशाप्रकारे सक्तीचे व मोफत शिक्षण देणयचा कायदा करून एक आदर्श समाज निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर स्त्री शिक्षण, अस्पृश्य शिक्षण, अस्पृश्यांना व्यवसायासाठी कर्ज देणे, संस्था स्थापण्यास मदत करणे इत्यादी अनेक धोरण कोल्हापूर संस्थानातील विशेषत: शाहू महाराज व नंतरचे छ. राजाराम महाराजांनी केले आहेत. एकूणच कोल्हापूर संस्थानामध्ये नोकरी, शिक्षण व राजकीय आरक्षण देण्याचे काम केले आहे. त्यामुळे शाहू महाराज हे आरक्षण धोरणाचे जनक म्हणून ओळखले जातात.

## १.३ सारांश

भारतीय राजकारणामध्ये आरक्षणाचे धोरण आजही वादग्रस्त ठरले आहे. समाजातील अनेक जातीचे लोक आरक्षणासाठीची आंदोलने करीत आहेत. त्यामुळे सुप्रीम कोर्टाला निर्णय देताना अनेक अडचणी येतात. आरक्षण म्हणजे हे एक सकारात्मक भेदभावाचे तत्वज्ञान आहे, हे तत्त्वज्ञान भारतामध्ये महात्मा फुलेंच्या विचारातून निर्माण झाले असून त्याचा विकास कालांतराने शाहू महाराज, भारतातील अनेक संस्थाने, ब्रिटीश शासनाचे सुधारणा कायदे, वेगवेगळ्या आदेशाद्वारे देऊन ते भारतीय राज्यघटनेत समाविष्ठ होईपर्यंत झालेला आहे, यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका ही महत्त्वाची आहे. सयाजीराव गायकवाड आणि शाहू महाराज या दोघांनी डॉ. बाबासाहेबांना शैक्षणिक कार्यासाठी आर्थिक मदत केली आहे, त्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव आंबेडकरांवर होता.

महात्मा फुले व शाहू महाराज यांनी सकारात्मक भेदभावाच्या तत्त्वज्ञानावर आधारित विचार मांडले व शाहूराजांनी प्रत्यक्षात आपल्या संस्थानमध्ये ५०% आरक्षण दिले. तसेच मद्रास, म्हैसूर, ग्वाल्हेर इत्यादी संस्थांनामध्ये अस्पृश्यांच्या उध्दारासाठी विशेष तरतूदी करून प्रयत्न करण्यात आले. त्याचबरोबर मोर्ले-मेंटो सुधारणा कयादा, १९०९ व माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा, १९१९ नुसार मुस्लीम, शीख, युरोपीयन, ॲग्लोइंडियन इत्यादी लोकांना राजकीय आरक्षण देऊन स्वतंत्र मतदार संघाची तरतूद करण्यात आली. तसेच कोल्हापूर संस्थानामध्ये आरक्षण व सकारात्मक भेदभावाच्या तत्वज्ञानाच्या आधारावर अनेक कायदे व जाहीरनामे निर्माण करण्यात आले. या सर्व गोष्टींद्वारे भारतीय राजकारणामध्ये सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान विकसित झाल्याचे दिसून येते. या सर्व माध्यमातून आधुनिक भारताच्या इतिहासामध्ये सकारात्मक भेदभाव होऊन आरक्षणाचे तत्त्व स्विकारण्यात आले आणि याचे श्रेय शाहू महाराज व त्याचे कोल्हापूर संस्थानास जाते. अशा पध्दतीने आरक्षणाचे धोरण हे सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **अस्पृश्य** : जे गरीब व ज्या लोकांना शिवल्याने माणूस विटाळ होतो, यासाठी खालच्या जातीना वापरण्यात येणारा शब्द.

२. **ब्राम्हणेत्तर** : ब्राम्हण सोडून सर्व इतर जाती.

३. **आरक्षण** : एखाद्या जातीच्या किंवा धर्माच्या लोकांना विशेष अशी सेवा देण्याची तरतूद करणे.

४. **जातवार प्रतिनिधीत्व** : प्रत्येक जातीला देण्यात येणारी संधी.

## १.५ सरावासाठी स्वाध्याय

१. महात्मा फुले यांचे आरक्षणविषयक विचार स्पष्ट करा.

२. शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक कार्याची चर्चा करा.

३. भारतातील वेगवेगळ्या संस्थानातील आरक्षणविषयक धोरण स्पष्ट करा.

४. माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा कायद्यातील आरक्षण धोरण स्पष्ट करा.

५. कोल्हापूर संस्थानातील आरक्षणविषयक धोरणाची चर्चा करा.

## १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके/संदर्भ ग्रंथ


१. **पवार जयसिंगराव** *(२०१४)* : *'राजर्षि शाहू महाराज : जीवनकार्य'*, ताराराणी बुक सर्व्हिस, कोल्हापूर.

२. **भोळे भास्कर** *(२०१७)* : *'महात्मा जोतीराव फुले'*, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

३. **ग्रोवर बी.एल.** *(२००३)* (अनुवादक : बेलेकर एन.के.) : *'आधुनिक भारताचा इतिहास'*, एस. चंद्रा आणि कंपनी प्रा. लि., नवी दिल्ली.

४. **कदम य. ना.** (२०१३) : *'आधुनिक भारताचा इतिहास'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.


❍❍❍

# स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आरक्षण

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील राजर्षि शाहू महाराजांचे आरक्षण धोरण

२.२.२ डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा आरक्षण धोरणासंबंधीचा दृष्टीकोन

२.२.३ गोलमेज परिषद आणि जातीय निवाडा

२.२.४ पुणे करार

२.२.५ पुणे कराराचा आरक्षणाच्या राजकारणावरील परिणाम

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

१. स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील आरक्षण धोरणाच्या निर्मितीचा मागोवा घेता येईल.

२. आरक्षणासंबंधीचा डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा दृष्टीकोन समजून घेता येईल.

३. गोलमेज परिषदेतील कार्याचे फलीत म्हणून जाहीर झालेल्या जातीय निवाड्याचे आकलन करून घेता येईल.

४. जातीय निवाड्याच्या प्रतिकाराच्या अनुषंगाने महात्मा गांधीजींची भूमिका व त्यातून झालेल्या पुणे कराराचे विश्लेषण करता येईल.

५. पुणे कराराने स्थापित झालेल्या आरक्षणाच्या राजकारणाची चिकित्सा करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

भारतीय समाज वर्ण आणि जाणिवांच्या विषमतेवर आधारलेला समाज आहे. येथील माणसाची ओळख वर्ण आणि जातीच्या परिघात करण्याची व्यवस्था अस्तित्वात होती व आजही अशी सुप्त व्यवस्था कार्यरत आहे. प्रत्येक जातीला उच्च-नीचतेचे संदर्भ असल्याने उच्च जाती आपला सामाजिक दर्जा किंवा श्रेष्ठत्व टिकविण्याची इच्छा बाळगून असतात. त्या इच्छेवर आधारितच समाजात परस्पर संबंध निर्माण केले जातात. त्यामुळे उच्च जाती आपली जात गर्वाने सांगते तर कनिष्ठ जातींना आपली जात सांगणे अपमानास्पद ठरते.

भारतीय समाजात उच्च जातींना मिळालेले श्रेष्ठत्व हे केवळ काल्पनिक नाही. तर त्या जात श्रेष्ठत्वाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात प्रतिष्ठा मिळविण्यासाठी त्यांनी त्याचा वापर केला. पर्यायाने ह्या उच्च जातींच्या हातात समाजातील सर्व क्षेत्रांचे नियंत्रण आले. तर दुसऱ्या बाजूला अल्पसंख्यांक, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींवर धर्माने कडक निर्बंध घालून, त्यांचे शारीरिक, मानसिक व आर्थिक अध:पतन मोठ्या प्रमाणावर केले.

या सर्व प्रकारच्या अस्पृश्यतेच्या बेड्या तोडण्यासाठी आरक्षण धोरणाची नीती तयार झालेली दिसते. आरक्षण धोरणाचे जनक महात्मा जोतिराव फुले, राजर्षि शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आरक्षणाच्या विचारांच्या व कार्याच्या प्रकाशातच आरक्षणाचा विचार करणे आवश्यक आहे. कारण आरक्षणाचे समर्थन व विरोध याच्या संघर्षात आरक्षणाच्या सिध्दांताच्या प्रत्येक पैलूचा कस लागतो आहे. डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असणारे आरक्षण धोरण भारतातील अल्पसंख्यांकांना प्राप्त झाले नाही. पुणे कराराने मिळालेल्या आरक्षणाचा अस्पृश्यांच्या किंवा अल्पसंख्यांकांच्या उन्नतीमध्ये काय उपयोग झाला? या आरक्षित प्रतिनिधींनी खरोखरच अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करताना त्यांच्याशी निष्ठा व प्रामाणिकपणा जोपासला का? जोपासला नसेल तर का जोपासला नाही? याची ही चिकित्सा आरक्षण धोरणावर वादविवाद करताना झाली पाहिजे. प्रत्येक अल्पसंख्यांक समूहाला स्वराज्यात प्रतिनिधित्व देण्याचा सैध्दांतिक पाया आरक्षणाच्या धोरणामागे आहे याचे विश्लेषण केल्यास आरक्षणाची आवश्यकता ही स्पष्ट होते.

डॉ. आंबेडकरांनी आरक्षणाची मागणी करताना भारतातील सर्व अल्पसंख्यांक समूहाला राजकीय हक्क प्रतीनिधित्वाद्वारे मिळण्यासाठी प्रयत्न केले. गोलमेज परिषदेतील चर्चेचा परिपाक म्हणून जातीय निवाडा जाहीर झाला. त्याला आमरण उपोषणाने म. गांधींनी विरोध केला. ज्यातून पुणे कराराचा जन्म झाला. या पुणे कराराने दिलेल्या आरक्षित जागांवर निवडून आलेल्या प्रतिनिधींनी अस्पृश्यांशी एकनिष्ठ

न राहता, स्पृश्य जातींची मते मिळविण्यासाठी प्रस्थापित जातींशी मिळते-जुळते घेतले. ज्यामुळे आरक्षणाचा मूळ हेतू यशस्वी होतो का? हा महत्त्वाचा प्रश्न आज निर्माण झाला आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील राजर्षि शाहू महाराजांचे आरक्षण धोरण

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आरक्षणाची भूमिका स्विकारून ती अंमलबजावणीमध्ये आणण्याचे काम राजर्षि शाहू महारांजी केले. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानामध्ये प्रथम राजर्षि शाहू महाराजांनी मागासलेल्या वर्णाना आरक्षण देण्याची भूमिका स्विकारली व तसा आदेश आपल्या संस्थामध्ये दिला.

कोल्हापूर संस्थानातील सर्व वर्णाच्या प्रजेस शिक्षण देण्याचा प्रयत्न राजर्षि शाहू महाराजांनी केला आहे. पण शिक्षण देऊनही मागासलेल्या वर्गाच्या लोकांच्या स्थितीमध्ये महाराजांना पाहिजे होती, तशी सुधारणा होत नव्हती. म्हणून मागासलेल्या वर्गानी उच्च प्रतीच्या शिक्षणापर्यंत जावे व त्यांच्यात सर्वांगीण सुधारणा व्हावी. या हेतूने संस्थानाच्या नोकऱ्यांमध्ये राखीव जागांचे धोरण स्विकारले. जुलै १९०२ च्या हुकूमानंतर सरकारी नोकऱ्यांमध्ये शेकडा पन्नास जागा (५०%) मागासलेल्या वर्गाचा अर्थ ब्राम्हण, परभू, शेणवी, पारशी व दुसरे पुढे गेलेले वर्ग सोडून, सर्व वर्णाना ह्या राखीव जागा देण्यात याव्यात असे स्पष्ट केले. सदर हुकूमाच्या अंमलबजावणीचे तिमाही पत्रक सर्व खात्यांच्या प्रमुखानी सरकारकडे पाठविण्याची सक्ती केली.

कोल्हापूरच्या संस्थानाचे राजे राजर्षी शाहू महाराज यांनी सर्व मागासलेल्या वर्णाच्या लोकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये ५०% आरक्षण देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासाची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये केली. असा क्रांतिकारी निर्णय हिंदुस्तानच्या इतिहासात कोणत्याही राजाने घेतला नव्हता. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी महाराजांचे वर्णन 'नवीन युगाच्या आगमनाची घोषणा देणारा अग्रदूत' या शब्दात केले आहे.

राजर्षी शाहू महाराजांच्या मते, मागासलेल्या जातीतील उच्च शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना संस्थानातील सरकारी नोकऱ्यांच्या रूपाने त्यांच्या उच्च शिक्षणासाठी पारितोषिक विस्तृत रीतीने विभागून दिले गेले नाही, तर त्यांच्या उच्च शिक्षण घेण्याच्या आकांक्षा व उमेद नष्ट होईल. अशा मागास वर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांच्या शिक्षणाची सोय तर करायला हवी. पण त्याबरोबरच शिकून तयार झालेल्या लोकांना सामाजिक समतेच्या तत्त्वानुसार योग्य संधीही उपलब्ध करून द्यायला हवी. त्यासाठी महाराजांनी मागासलेल्या लोकांच्यासाठी नोकऱ्यांमध्ये ५०% आरक्षणाची तरतूद केली. प्रशासनातील नोकरी किंवा

अधिकार ही एका बाजूने राज्यसत्तेच्या उपभोगातील वाटणीच असते. आतापर्यंत हा उपयोग फक्त उच्च वर्गातील लोकच घेत होते. पण त्या हुकूमाने सत्तेतील योग्य वाटणी बहुजन समाजाच्या पदरात टाकण्याचे महाराजांनी ठरविले होते. सामाजिक, आर्थिक व मानसिक दृष्टीकोनातून मागासलेल्या वर्गाचा विकास होण्यास चालना मिळेल असे आरक्षणाचे क्रांतीकारी पाऊल राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात उचलले होते.

## २.२.२ डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा आरक्षण धोरणासंबंधीचा दृष्टीकोन

महात्मा जोतीबा फुल्यांनी शूद्रातिशूद्र बहुजन समाजाच्या समानतेच्या हक्काची भूमिका मानव अधिकाराचा हक्क म्हणून प्रस्थापित केली. तर कोल्हापूर संस्थानात राजर्षी शाहू महाराजांनी १९०२ मध्ये संस्थानातील नोकऱ्यांमध्ये ५०% आरक्षणाचा कायदा करून बहुजन समाजाला नोकऱ्यांमध्ये प्रवेश दिला. ह्या समता प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नांना म्हणजेच आरक्षण धोरणाला सैध्दांतिक व संविधानात्मक स्वरूप देण्याचे काम डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी केले. कारण आरक्षणाचा उद्देशच समता प्रस्थापित करणे हा आहे. डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजातील मागासलेल्या वर्गाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शिक्षण, सरकारी नोकऱ्या व राजकीय आरक्षण मिळविण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न केले. आरक्षणाने देशाच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीमध्ये बदल घडवून आणले.

या आरक्षण धोरणाची मांडणी डॉ. आंबेडकरांनी साऊथ बरो कमिशन (१९१९), मुंबई विधानमंडळाचे सदस्य (१९२७), सायमन कमिशनला दिलेली साक्ष (१९२८), १९३०-३१ च्या काळातील गोलमेज परिषदेमधील त्यांची मागास जातींच्याबाबतची भूमिका यामधून झालेली दिसते. तसेच जातीय निवाड्याचा प्रसिध्द 'पुणे करार' व संविधान निर्मितीचा काळ या कालखंडात आरक्षणाची अनिवार्यता पटविणारे लिखाण, भाषणे व शासकीय पातळीवरील मांडणी त्यांनी केली. १९४२ च्या व्हाईसरॉयच्या मंत्रिमंडळात मजूर मंत्री असताना सरकारी नोकऱ्यांमध्ये दलितांना आरक्षण देण्याची तरतूद केली. तसेच संविधानात आरक्षणाबाबतची मांडणी करून स्वातंत्र्यानंतर आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकारची निश्चित करण्यात आली.

### ❍ जातीच्या सामाजिक दर्जाचा-प्रतिनिधित्वावरील परिणाम :-

स्वराज्यात प्रातिनिधीक राज्य असेल तर त्याचे सुराज्य करण्यासाठी मतदानाचा अधिकार व्यापक करून त्या प्रातिनिधीक सभागृहात जातवार प्रतिनिधी देणे आवश्यक आहे, असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. त्याच्या पुढे जाऊन जातवार वाट्यास येणारे प्रतिनिधित्व किती? आणि कोणत्या पध्दतीचे मिळणार? हे निश्चित झाल्याशिवाय स्वराज्यात मागासलेल्या जातीचे कल्याण होणार नाही असा त्यांचा दावा होता. कारण भारतीय समाजात धर्माने काही जाती श्रेष्ठ व पवित्र मानल्या आहेत, तर काही

जातीना निकृष्ट व अपवित्र ठरविले आहे. त्यामुळे स्वाभिमान शून्य खालच्या जाती वरच्या जातीस पूज्य मानतात, तर शीलशून्य वरच्या जाती आपल्याला नम्र भावनेने श्रेष्ठ मानणाऱ्या खालच्या जातीस नीच ठरवतात. अशा परिस्थितीत एखाद्या मतदारसंघातून ब्राह्मण, ब्राह्मणेतर व बहिष्कृत असे तीन उमेदवार उभे राहिल्यास, ब्राह्मण लोक स्वजातीहितपरायणतेने आपली मते ब्राह्मणासच देतील. पण ब्राह्मणेतर व बहिष्कृत मतदारसुध्दा ब्राह्मणाची सेवा करण्याची संधी साधून पुण्य संचय करण्यासाठी ब्राह्मणासच मते देतील. त्यामुळे ब्राह्मण उमेदवार स्वत:च्या बळाने नव्हे, तर त्याला पूज्य मानण्याच्या ब्राह्मणेतर व बहिष्कृत मतदारांच्या श्रध्देने निवडून येईल. ब्राह्मण वर्गावर जडलेली ब्राह्मणेतरांची व बहिष्कृतांची श्रध्दा इतकी विनाशकारक आहे की त्यामुळे कायदे मंडळे आपोआपच एकवर्णीय बनतील. कायदे मंडळ काही प्रतिनिधी संग्रहालय नव्हे तसे असते तर प्रत्येक जातीचे एक-दोन प्रतिनिधी संग्रहालयात नमुने म्हणून ठेवता आले असते.

पण कायदे मंडळातील प्रतिनिधी प्रदर्शनार्थ बसवलेल्या वस्तू नसून, ते ज्यांचे प्रतिनिधी आहेत त्यांच्या परिस्थितीमध्ये बदल घडविणारे सत्ता पुरुष आहेत. पण बदल घडवायचा की नाही हे त्या सत्ता पुरुषांच्या शीलावर व स्वभावावर अवलंबून असते. म्हणून स्वातंत्र्यानंतर सामाजिक, धार्मिक व आर्थिक सुधारणा करू असे म्हणतात, तो त्यांचा समज पोरकटपणाचा आहे. कारण सत्ताधीश मनुष्य स्वतंत्र नसतो. तो स्वभावाच्या अधिन असल्यामुळे स्वतंत्र असूनही तो पारतंत्र्यात असतो. फरक इतकाच की स्वभाव सांगेल त्या मार्गाने जाण्यास सत्तेमुळे तो स्वतंत्र असतो. पण स्वभावाच्या विरुध्द जाण्यास सत्तावान माणूस देखील दुर्बल असतो. त्यामुळे आजची परिस्थिती ज्या जातींसाठी जाचक आहे ती बदलण्यासाठी त्यांची पुरेशी सत्ता येईल इतके प्रतिनिधित्व किंवा सत्तापुरुष त्या-त्या जातीतून आले तरच स्वराज्यापासून सर्वांना खरा फायदा होईल. जातींची लोकसंख्या आणि तिच्या गरजा या दोन गोष्टीवर आधारित प्रतिनिधीची संख्या ठरविल्यास जाती-जातीतील संघर्षास कारण उरणार नाही. लोकसंख्येने जात मोठी असेल पण तिच्या गरजा कमी असतील तर त्यांना संख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याची गरज नाही. पण उलटपक्षी लोकसंख्येने लहान असणारी जात, पण परिस्थितीने दडपल्यामुळे जिच्या अनेक गरजा भागलेल्या नाहीत. अशा जातीला तिच्या संख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रतिनिधित्व देणे योग्य ठरेल. त्यामुळे पार्लमेंटरी कमिटीने सुचविल्याप्रमाणे बहिष्कृत वर्गास पुरेसे प्रतिनिधित्व त्यांच्या संख्येच्या व गरजेच्या प्रमाणात मिळाले पाहिजे अशी डॉ. आंबेडकरांची मागणी होती.

## ❍ नेमणूक नको, निवडणूक हवी :-

स्वराज्याच्या कायदे मंडळात येणारे प्रतिनिधी सरकारच्या आवडीने किंवा मतदारांच्या पसंतीने/निवडीने येऊ शकतात. यापैकी दुसरी पध्दत श्रेष्ठ आहे. निवडणूकीच्या पध्दतीमुळे मतदारास जागृती येऊन, त्यांना राजकीय शिक्षण प्राप्त होते. निवडलेला प्रतिनिधी ज्यांनी त्याला निवडून दिले त्या

मतदारांस जबाबदार राहतो. सर्व वेळ सरकारी धोरण व लोकांच्या इच्छा यांची एकच दिशा नसते त्यामुळे नेमणूकीच्या पध्दतीने ज्यांची जागा सरकारी धोरणास मान डोलविण्यावर अवलंबून असते त्यांच्या हातून लोककल्याण कार्य होण्याचा संभव नसतो. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीस स्वत:ला पूर्णावस्थेस येण्यास कोण्या प्रकारची सामाजिक परिस्थिती पाहिजे. हे ठरविण्याचा हक्क प्रत्येक व्यक्तीस प्राप्त झाला पाहिजे. अशा स्थितीस स्वराज्य हे नाव योग्य आहे. अशा प्रकारचे स्वराज्य निर्माण करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस मतदानाचा अधिकार मिळून, निवडणूकीच्या पध्दतीने संख्येच्या व गरजेच्या प्रमाणात जातवार प्रतिनिधित्व दिले पाहिजे.

## ❍ उच्च शिक्षणाबाबत :-

विद्यापीठे म्हणजे विधान आणि नियम तयार करणारी, फक्त परिक्षा घेणारी आणि विविध विभाग स्थापन करून पदव्युत्तर अध्ययन-अध्यापनाच्या सोयी उपलब्ध करून देणारी व्यवस्था आहे असे मत मुंबई विधानमंडळात श्री. मुन्शी यांनी मांडले. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी उच्च शिक्षणाचे मागासवर्गाच्या, बहिष्कृतांच्या जीवनातील स्थान विशद करताना मुन्शी यांच्या विद्यापीठाविषयीच्या दृष्टीकोनाला विरोध केला. डॉ. आंबेडकर म्हणाले, विद्यापीठाच्या अनेक महत्त्वपूर्ण व मूलभूत कार्यापैकी एक म्हणजे गरजू आणि गरिबांच्या दारापर्यंत उच्च शिक्षणाच्या सोयी पोहोचविल्या पाहिजेत. मागासवर्गीय जातींना उच्च शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून देणे हे कोणत्याही आधुनिक विद्यापीठाचे प्रथम कर्तव्य असले पाहिजे. भारतीय समाजातील विद्यापीठाशी संबंधीत बुध्दिवंत व शिक्षित वर्गाचेच नियंत्रण विद्यापीठावर असावे.

ज्या देशात लोकसंख्येचा खूप मोठा भाग गुन्हेगार जमाती व अस्पृश्य लोकांचा आहे. तेथे हे निश्चित होते की, प्रगत समजल्या जाणाऱ्या जातीनी कनिष्ठ जातींचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले नाहीत. त्यांच्या प्रगतीकडे अक्षम्य दुर्लक्ष्य करून, त्यांच्याशी शत्रुत्वाची भूमिका घेतली. पण शिक्षणाचे महत्त्व मागासलेल्या जातींच्या लक्षात आले आहे. त्यामुळे शिक्षण हा सर्वात महत्त्वाचा भौतिक लाभ आहे याची जाणीव मागासवर्गीयांना झाली. त्यासाठी संस्कृतीने उपलब्ध करून दिलेल्या कोणत्याही प्रकारच्या भौतिक लाभाचा त्याग करून, उच्च शिक्षणाचा अधिकार आणि संधी यांचा महत्तम उपयोग करणे आवश्यक आहे, कारण मागासवर्गीयांचे अस्तित्वच शिक्षणाशिवाय सुरक्षित नाही.

## ❍ समतेसाठीच विषमता :-

डॉ. आंबेडकरांनी सायमन कमिशन समोर अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबाबत साक्ष दिली. त्या भूमिकेवर स्पृश्य समाजाकडून अनेक आक्षेप घेण्यात आले. डॉ. आंबेडकर हे समाज समता संघाचे अध्यक्ष असताना त्यांनी अस्पृश्य समाजासाठी जातवार प्रतिनिधित्वाची मागणी का केली? व एखाद्या

समाजासाठी जातवार प्रतिनिधित्व मागणे ही विषमता नव्हे काय? असा आक्षेप पुण्याच्या चित्रमय जगाच्या संपादकांकडून घेतल्यावर त्याला अनेकांनी पाठिंबा दिला. सदर आक्षेप उच्च प्रतीचा असून, प्रतिपक्षाचे तोंड बंद करणारा आहे. असा आक्षेप घेणाऱ्यांचा समज झाला.

पण डॉ. बी. आर. आंबेडकरांनी आरक्षणाची सैध्दांतिक भूमिका या नावाने 'बहिष्कृत भारत'मध्ये अग्रलेख लिहून सदर आक्षेपाचे खंडन केले. समतावाद्याचे ध्येय सर्वांना समतेने वागविणे हे नसून, समता प्रस्थापित करणे हे आहे. समता प्रस्थापित करण्याचे ध्येय साध्य करताना सर्वांना समतेने वागवणे शक्य नाही. जेथे अगोदरच सर्व व्यक्ती समान आहेत तेथे काही व्यक्तींना असमानतेने वागविल्यास विषमता निर्माण होते. तसेच जेथे अगोदरच व्यक्ती असमान आहेत तेथे त्यांना समानतेने वागविल्यास सुध्दा विषमता निर्माण होते. जसे सुदृढ माणूस व रोगी माणूस यांना सारखे मानून एखाद्या वेडगळ समतावाद्याने जाडेभरडे अन्न दोघांना समानतेने दिले. तर तो रोग्याचा प्राणहर्ता होईल. तसेच श्रीमंत व गरीब यांच्यावर सारखाच कर आकारल्यास तेथे असमानता निर्माण होते. पण सारखा कर देण्याची ऐपत असलेल्या श्रीमंतावर कमी-जास्त कर लावणे ही सुध्दा असमानता ठरते. त्यामुळे समता प्रस्थापित करण्यासाठी श्रीमंतांना व गरीबांना वेगवेगळा कर लावला पाहिजे. तसेच सारखीच ऐपत असणाऱ्या श्रीमंतांना समान कर लावला पाहिजे त्यावेळी समता प्रस्थापित होते. त्यामुळे डॉ. आंबेडकरांच्या आरक्षणाच्या मागणीला सैध्दांतिक बैठक आहे.

त्यामुळे स्पृश्य आणि अस्पृश्य या दोन्ही वर्गात कोणत्याही प्रकारची समानता नाही. शिक्षण, संपत्ती व लोकसंख्या या तिन्हीबाबत या दोन वर्गात कमालीची विषमता आहे. शिक्षणाच्या बाबतीत स्पृश्य पुढारलेले व अस्पृश्य मागासलेले, संपत्तीच्या बाबतीत सदृश्य श्रीमंत व अस्पृश्य गरीब, तर लोकसंख्येच्या बाबतीत स्पृश्य बहुसंख्य सक्षम व अस्पृश्य अल्पसंख्य दुर्बल अशी स्थिती आहे. म्हणजे स्पृश्य समाज सर्वच बाबतीत पुढारलेला, तर अस्पृश्य समाज मागासलेला आहे. त्यामुळे अशा दोन असमान वर्गाना समानतेने वागवायचे ठरवले, तर प्रत्यक्षात विषमताच निर्माण होईल. ज्यामुळे मागासलेल्या वर्गात कोणत्याही प्रकारचा बदल होण्याची शक्यता राहणार नाही.

त्यामुळे डॉ. बी. आर. आंबेडकरांच्या जातवार प्रतिनिधित्व मागणीमध्ये व समतेच्या तत्त्वामध्ये काहीही विरोध नव्हता. कारण रोगी-निरोगी, गरीब-श्रीमंत, मागासलेल्या-पुढारलेल्या, अल्पसंख्य-बहुसंख्य सारखेपणाने वागविणारी त्यांची विचारसरणी नाही. तर त्यांना विषम पध्दतीनेच वागवून समता प्रस्थापित करता येते हे डॉ. आंबेडकरांनी सिध्द केले. डॉ. आंबेडकरांच्या जातवार प्रतिनिधित्वाच्या मागणीवर आक्षेप घेणाऱ्यांचा दिखाऊपणा व वास्तव वेगळे होते. कारण डॉ. आंबेडकरांच्या या मागणीमुळे स्पृश्य व अस्पृश्य हे राजकारणात समान अधिकारी होतील. तसेच लोकसंख्येच्या व गरजांच्या आधारित अस्पृश्यांना आरक्षण मिळाल्यास ते स्पृश्यांच्या बरोबरीचे होतील. हेच स्पृश्यांना नको होते,

कारण त्यात चातुर्वर्णात्मक सनातन धर्माचे उच्चाटन आहे. स्पृश्य समाजाला सनातन धर्माचे उच्चाटन नको असल्यानेच वेगवेगळ्या टप्प्यावर डॉ. आंबेडकरांच्या खऱ्या प्रतिनिधित्वाच्या मागणीला विरोध झालेला दिसतो.

आजपर्यंतच्या भारतातील चातुर्वर्ण विषमतेवर राज्यसत्तेचा मारा झाला नव्हता. तर नेहमीच तिच्यावर राज्यसत्तेची कृपादृष्टी होती. राजा हिंदू असो, मुसलमान असो किंवा इंग्रज त्यांनी चातुर्वर्णातील श्रेष्ठ व पवित्र ब्राह्मणांवर राजकीय सत्तेची खैरात केली. पर्यायाने अस्पश्य किंवा मागासलेल्या जाती यांना कधीच सत्तेत हिस्सा मिळाला नाही. पण डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य समाजाला राजकीय सत्तेची मागणी करताच तथाकथित स्पृश्य लोकांनी डॉ. आंबेडकरांच्या विरुध्द अनेक चाली केल्याचे दिसून येते.

अस्पृश्यांना हिंदूपासून वेगळे करून, त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाची मागणी डॉ. आंबेडकर करतात. कारण अस्पृश्यांना हिंदूपासून वेगळे करून, त्यांना ब्राह्मण्यावर मारा करावयाचा होता. ब्राह्मण्य नष्ट करून त्याच्या तावडीतून देशाची सुटका करणे हे हिंदूंचेच नव्हे तर मुसलमान, ख्रिश्चन यांचेही कर्तव्य आहे असे डॉ. आंबेडकर मानत होते. आम्ही हिंदूपासून वेगळे होऊ इच्छितो ते एका घरात राहून गुदमरण्यापेक्षा घराबाहेर पडून मारा करण्याच्या हेतूने होय. आम्हाला हिंदू समाजाशी समतेचे नाते जोडायचे आहे ते हिंदू समाजात राहून त्याचे गुलाम म्हणून नव्हे. तर हिंदू समाजाशी आम्हाला सर्व बाबतीत समानाधिकारी व्हावयाचे आहे हे डॉ. आंबेडकरांच्या आरक्षण योजनेचे ध्येय होते. हे ध्येय साध्य करताना वरपांगी दिसणाऱ्या विषमतेवर तुमचे लक्ष जात असेल तर ही विषमता समता प्रस्थापित करण्यासाठीच आहे.

दलितांच्या आरक्षणाच्या तरतूदीची आवश्यकता व साधने यांचे विश्लेषण ही डॉ. आंबेडकरांनी केले. अखिल भारतीय दलित वर्ग परिषदेतील ऑगस्ट, १९३० मधील नागपूर येथील त्यांचे भाषण 'दलितांच्या हक्कांचा जाहिरनामा' म्हणून प्रसिध्द आहे. ज्यामध्ये भारताच्या भावी स्वराज्यातील दलितांच्या हक्कांबाबत मांडणी केली आहे. तसेच भारतीय समाज व्यवस्थेची चिकित्सा केली आहे. त्यातील विविध पैलू पुढीलप्रमाणे :-

## १. उच्चवर्णीयांची सरंजामशाही निर्माण होण्याचा धोका :-

स्वराज्यामध्ये राज्यघटना निर्माण करताना भारतातील सामाजिक भिन्नत्व लक्षात घेऊन शासनाची सत्ता सर्वांना कशी वितरीत होईल हे पाहिले पाहिजे. अल्पसंख्यांक घटक किंवा खालच्या वर्गातील लोकांकडे ती सत्ता जाणे स्वराज्यात अभिप्रेत आहे. अन्यथा उच्चशिक्षित, मातब्बर व महत्त्वकांक्षी अशा उच्चवर्णीय लोकांच्या हाती स्वराज्याची शासन शक्ती जाईल. म्हणजेच संपत्ती, शिक्षण व सामाजिक दर्जा प्राप्त असणाऱ्या सरंजामदारांच्या हाती सर्व सत्ता जाईल. भारतीय समाज रचनेतील पारंपरिक सामाजिक दर्जामुळे पात्रता व गुणवत्तेला समाजात काहीच स्थान नाही. तर भारतात केवळ जात भावनेला

विशेष महत्त्व असून, ती भावना परजातीच्या लोकांशी लढण्यास प्रवृत्त करते. त्यामुळे स्वातंत्र्यानंतरही अस्पृश्य समाजाच्या हाती खूप काही लागणार नाही. कारण ह्या सामाजिक रचनेमुळे अस्पृश्य उमेदवाराला एकही मत न टाकता स्पृश्य लोक अस्पृश्यांची अनेक मते मिळवून निवडून येतील. यामध्ये अस्पृश्य निवडणूक हरणारच नाहीत, तर अजाणतेपणे आपल्या प्रतिस्पर्ध्याला सहकार्य करतील. त्यामुळे केवळ राज्यकर्त्यांमध्ये बदल होण्याने दलितांचे प्रश्न सुटणार नाहीत. जसे आपल्या देशावर इतर कोणत्याही देशाचे राज्य चालणार नाही असे काँग्रेसवाल्यांना वाटते. तसेच कोणत्याही एका वर्गाचे दुसऱ्या कोणत्याही वर्गावर राज्य असणे ही सुध्दा चांगली गोष्ट नाही हे स्पष्टपणे डॉ. आंबेडकरांनी काँग्रेसवाल्यांना सांगितले. त्यामुळे आधुनिक लोकशाही राज्यातील मूलभूत तत्त्व म्हणजे प्रत्येक व्यक्तीचे मूल्य मान्य करणे हेच होय. तसेच प्रत्येक व्यक्तीला केवळ एकदाच हे जीवन जगण्याची संधी मिळत असल्यामुळे त्याला आपल्या सुप्त गुणांची वाढ करण्यास पुरेपूर संधी मिळाली पाहिजे. हाच स्वराज्याचा खरा अर्थ अभिप्रेत होता.

## २. मुलभूत हक्कांच्या अंमलबजावणीच्या उपाययोजनावर दलितांसाठी संरक्षण तरतूदी :–

भारतीय समाज रचनेमुळे व्यक्तीने कितीही पात्रता मिळविली किंवा त्याचे शील उज्ज्वल असले तरी त्याच्या सामाजिक स्थितीत काहीच बदल होत नाही. अशा जन्माधिष्ठित सर्व सत्ताधीश असलेल्या वर्गाच्या हातात अनिर्बंध सत्ता देणे म्हणजे फाशी देणाऱ्याच्या हातात सुराही देण्यासारखे आहे. त्यामुळे भारताचे राजकीय पुनर्घटन करीत असताना दुर्बल समाज घटक दु:खाच्या खाईत लोटले जाऊ नयेत, यासाठी भारताच्या राज्यघटनेत राजकीय समतोलाच्या तत्त्वाचा अवलंब करण्याची आवश्यकता आहे. पण फक्त मूलभूत हक्कांच्या उद्घोषणेवर आपण विश्वास ठेवून चालणार नाही. कारण या योजना स्वागतार्ह असल्या तरी, जोपर्यंत त्या मूलभूत हक्कांच्या उपभोगांची ग्वाही दिली जात नाही तोपर्यंत त्यांचा काही उपयोग नसतो. मूलभूत हक्क हिरावून घेतल्यास त्याविरुध्द करण्यात आलेल्या उपाययोजनांवर मूलभूत हक्कांची हमी अवलंबून असते. त्यामुळे डॉ. आंबेडकर अस्पृश्यांसाठी राज्यघटनेत संरक्षण तरतूदीच्या समावेशाबाबत गंभीर होते.

## ३. विधानमंडळात आरक्षण :–

दलितांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यावर सर्वात उत्तम मार्ग म्हणजे शासनाची सत्ता त्यांच्या हातात येणे हा होय. कारण त्यांच्या हिताला बाधक हालचाली करण्यास ते शिक्षा करू शकतील. एवढेच नव्हे तर संभाव्य असलेल्या बाधक हालचालींना आळा घालता येईल व स्वत:च्या हिताच्या रक्षणावर करडी नजर ठेवता येईल. दलितांच्या हितरक्षणासाठीचा अत्यंत महत्त्वाचा मार्ग म्हणजे भावी स्वयंशासित भारताच्या कार्यकारी मंडळावर ताबा मिळविते. देशाच्या कायदे मंडळात दलितांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्यानेच हे साध्य होईल.

## ४. अल्पसंख्यांकांना परिणामकारक प्रतिनिधित्व हवे :-

अल्पसंख्यांकांना किंवा दलितांना केवळ प्रतिनिधित्व नको, तर परिणामकारक प्रतिनिधित्व हवे. यासाठी 'पुरेसे प्रतिनिधित्व' हा शब्द सर्वच अल्पसंख्यांकांच्या मागणीमध्ये आला. पण प्रत्यक्ष संख्येच्या रूपात त्याचा अर्थ सांगणे खूप कठीण असल्यामुळे तो टिंगलीचा विषय होऊन बसला होता. म्हणून अल्पसंख्यांकांनी त्याचा निश्चित अर्थ संख्येच्या स्वरूपात तयार केला पाहिजे. काँग्रेसच्या प्रचलित मतप्रणालीनुसार 'पुरेसे प्रतिनिधित्व' याचा अर्थ 'लोकसंख्येच्या प्रमाणात प्रातिनिधित्व' असा ते करीत होते. ही गणिती बुध्दीची विचारसरणी अपक्व व मूर्खपणाची आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. भारतातील बहुसंख्यांकांच्या मनात अल्पसंख्यांकाबद्दल जी अनुदारपणाची किंवा कुत्सित भावना प्रचलित होती तिचीच ती प्रतिक्रिया म्हणावी लागेल.

अल्पसंख्यांकाजवळ असणारी शक्ती वाढविण्यासाठी त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व पाहिजे. अन्यथा शासकीय सत्तेने सुसज्ज असलेल्या बहुसंख्याकांशी सामना करण्यास ते समर्थ ठरणार नाहीत. या दृष्टीकोणातून पाहिल्यास अल्पसंख्यांकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ज्या जागा मिळणार आहेत, त्यापेक्षा जास्त जागा दिल्यानेच त्यांना संरक्षण दिल्यासारखे होईल. त्यामुळे अल्पसंख्यांकांच्या संरक्षणाची भाषा वापरून केवळ त्यांच्या लोकसंख्ये इतकेच प्रतिनिधित्व देणे हे परस्पर विरोधी होते. या तत्त्वाच्या वापरामुळे प्रत्यक्ष समाजात जी स्थिती आहे तिचीच प्रतिकृती कायदे मंडळात उभी राहिल. म्हणजे बाहेरील समाजामध्ये बहुसंख्य व अल्पसंख्य जमातीचे बलाबल आहे ते तसेच संसदेमध्ये कायम ठेवणे होय.

अल्पसंख्यांकाच्या संरक्षणाच्या दृष्टीकोणातून जर त्यांच्यात खऱ्या स्वरूपात सुधारणा करावयाची असेल, तर अल्पसंख्यांकांना सोयीचा होईल असा बदल राजकीय शक्तीच्या समतोलामध्ये केला पाहिजे. हे लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा अतिरिक्त अशा (पासंगाच्या) जागा अल्पसंख्यांकाना देऊनच ते साध्य करता येईल. पासंगाच्या अतिरिक्त जागांची योजना अल्पसंख्यांकांचे हात बळकट करण्यासाठी करण्यात आली पाहिजे. या अतिरिक्त जागांशिवाय अल्पसंख्यांकांची शक्ती त्यांच्या स्वत:च्या संरक्षणासाठी तोकडी पडेल. अल्पसंख्यांक जमातींच्या सामाजिक दर्जानुसार पासंगाच्या जागांचे प्रमाण बदलते राहिल. एखाद्या अल्पसंख्यांक जमातीचा सामाजिक दर्जा नीच असेल तर तिला जास्त जागा मिळतील आणि तिचा दर्जा प्रतिष्ठेचा असेल तर तिला कमी जागा मिळतील. या पासंगाच्या अतिरिक्त जागा देण्यामागील हेतू वादळामध्ये कुडकुडणाऱ्या कोकराला थंडीपासून संरक्षण देणे एवढाच होता.

## ५. प्रतिनिधित्व कसे ठरवावे :-

अल्पसंख्यांकांना द्यावयाच्या पासंगाच्या अतिरिक्त जागा पुढीलप्रमाणे ठरवाव्यात. सर्वप्रथम बहुसंख्य व अल्पसंख्य जमातींनी परस्परांच्या संगनमताने लोकसंख्येच्या प्रमाणातील प्रतिनिधित्वापेक्षा

जास्तीत–जास्त किती जागा, अतिरिक्त पासंगाच्या म्हणून अल्पसंख्यांकांना दिल्या जाऊ शकतील याचा आकडा निश्चित करावा. नंतर एखाद्या विशिष्ट अल्पसंख्यांक जमातीच्या अतिरिक्त प्रतिनिधित्वाचा वाटा ठरविताना हे जादा प्रतिनिधित्व त्या जमातीच्या सामाजिक परिस्थितीच्या विरुध्द प्रमाणात ठरवावे. ही सामाजिक परिस्थिती त्या जमातींचा (१) सामाजिक दर्जा (२) आर्थिक बळ आणि (३) शैक्षणिक अवस्था यावरून ठरवावी, असे झाल्यास सर्व अल्पसंख्यांक जमातींशी ही न्याय व योग्य तडजोड होईल आणि कोणत्याही संबंधित घटकाला तक्रार करण्यास कारण शिल्लक राहणार नाही.

## ६. भारताचे एकसंघत्व महत्त्वाचे :–

भारतासारखा देश हा विविध जाती–जमातींमध्ये व पंथामध्ये विभागलेला देश आहे. त्यामुळे या जाती–जमातींच्या संरक्षणाची तरतूद राज्यघटनेमध्येच करून ठेवल्याशिवाय हा देश एकसंघ व स्वयंशासित असा देश होऊच शकत नाही. ही वस्तुस्थिती असली तरी सर्व अल्पसंख्यांकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, कितीही जातीपातींनी व पंथानी आपण खंडीत झालो असलो तरी एकसंघ भारत हे आमचे ध्येय आहे. कोणतीही अल्पसंख्यांक जमात संरक्षण तरतुदीची मागणी करीत असेल, तर तिने आपले संरक्षण हक्क मिळविताना ते भारतीय ऐक्याच्या आड येणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. तसेच अल्पसंख्यांकांच्या संरक्षण तरतूदींना मान्यता देणे हे बहुसंख्य जमातीचे कर्तव्य आहे. परंतु अल्पसंख्यांकांचे तितकेच पवित्र कर्तव्य आहे की सर्वांचे एकत्व निर्माण करण्याच्या मार्गात अडथळे निर्माण करू नयेत.

## ७. सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण :–

कायदे तयार करण्याच्या अधिकारापेक्षा कायद्यांची अंमलबजावणी करण्याचा अधिकार कमी महत्त्वाचा नाही. कारण कामाच्या घाईगर्दीमुळे किंवा परिस्थितीच्या अडचणीमुळे बऱ्याचवेळा अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या हातात परिस्थितीचे तारतम्य पाहून निर्णय देण्याचे अधिकार असतात. अशा प्रसंगी निर्णय देण्याच्या अधिकाराची अंमलबजावणी निष्पक्षपणे होते की नाही यावर जनतेचे कल्याण अवलंबून असते. असे अंमलबजावणीचे अधिकार जेथे केवळ एकाच जातीच्या हातात आहेत अशा भारतासारख्या देशात या प्रासंगिक न्याय देण्याच्या अधिकाराचा दुरुपयोग एका विशिष्ट वर्गाची फाजील भरभराट करण्यासाठी होण्याचा फार मोठा धोका असतो. यावरचा योग्य उपाय म्हणजे या देशातील सरकारी नोकऱ्यांमध्ये दलित वर्गासहित सर्वांचा सरमिसळ समावेश करण्यात यावा. याकरिता दलित वर्गासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये एका विशिष्ट प्रमाणात जागा राखीव ठेवण्याची मागणी करण्यात आली. तसेच ही संरक्षण व्यवस्था राज्यघटनेमध्ये एका कलमाद्वारे घडवून आणण्यात काहीच अडचण नाही असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले.

अशाप्रकारे अल्पसंख्यांक घटकांना संरक्षणाच्या तरतूदी व त्यांचा मागासलेपणा नष्ट करून सर्वांच्या बरोबरीने त्यांना आणण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये डॉ. आंबेडकरांनी आरक्षणाची मागणी केली. प्रचलित आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणावर असले तरी त्यांच्या मते अल्पसंख्यांकांना सत्ता शक्ती पुरविण्याइतके पुरेसे प्रतिनिधित्व देणे गरजेचे होते. या देशातील प्रत्येक व्यक्ती हे एक मूल्य व ते राजकीय, सामाजिक आणि आर्थिक मूल्य मानण्यात येईल अशी समाजरचना निर्माण करण्यासाठी ह्या तरतुदींची आवश्यकता आहे असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ ❊

❑ **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. डॉ. आंबेडकरांच्या मते प्रतिनिधित्वाच्या निवडीवर कशाचा परिणाम होतो?

२. डॉ. आंबेडकरांच्या मते स्वराज्यात कसे प्रतिनिधित्व पाहिजे?

३. डॉ. आंबेडकरांच्या आरक्षण मागणीची सैध्दांतिक बैठक कोणती?

४. डॉ. आंबेडकरांला अस्पृश्यांना हिंदूपासून वेगळे का करावयाचे होते?

५. स्वराज्यात अल्पसंख्यांकांना सत्ता दिली नाही तर ती कोणाकडे जाईल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते?

## २.२.३ गोलमेज परिषदा आणि जातीय निवाडा

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडातील अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे लंडन मध्ये झालेल्या गोलमेज परिषदा होय. कारण त्या परिषदांमध्ये भारताच्या भावी राज्यघटनेबाबत विचारविनिमय झाला. १९१९ चा कायदा केल्यानंतर ब्रिटिश सरकारला दहा वर्षानंतर राज्यघटनेच्या कार्यपध्दतीची तपासणी करण्यासाठी एक कमिशन नेमणे बंधनकारक होते. त्यानुसार १९२८ मध्ये सर जॉन सायमन यांच्या अधिकारात या कमिशनची नेमणूक झाली. पण या कमिशनमध्ये भारतीयांना सामील करून घेण्यास स्टेट फॉर इंडियाचे सेक्रेटरी लॉर्ड बर्किनहेड यांनी विरोध केला. परिणामी काँग्रेसने या कमिशनच्या विरोधात आंदोलन करून त्यांच्यावर बहिष्कार टाकला. या भारतीय जनतेतील असंतोषाला शांत करण्यासाठी ब्रिटिश सरकारने अशी घोषणा केली की, कमिशनचे काम पूर्ण झाल्यानंतर, भारताला राज्यघटना लागू करण्यापूर्वी भारतीय प्रतिनिधींना चर्चेसाठी बोलाविले जाईल. या घोषणेनुसार गोलमेज परिषदा भरविल्या व भारतीय प्रतिनिधींना चर्चेसाठी लंडनला बोलविण्यात आले. या परिषदेमध्ये भारतीय प्रतिनिधींच्या बरोबर ब्रिटिश संसदेचे व सरकारचे प्रतिनिधीही सहभागी होते.

## १. पहिली गोलमेज परिषद :-

१२ नोव्हेंबर १९३० रोजी पहिली गोलमेज परिषद सुरू झाली. भारतीयांच्या दृष्टीने ही एक महत्त्वपूर्ण घटना होती. कारण गेल्या दोन हजार वर्षाच्या इतिहासातील कोणत्याच अमदानीत भारतीय जनतेला राज्य कसे पाहिजे? असे विचारले नव्हते. त्यामुळे जनतेचा राज्य निर्माणासंबंधीचा हक्क कधीच मान्य करण्यात आला नव्हता. तो हक्क ब्रिटिशांनी गोलमेज परिषदेमध्ये भारतीयांना दिला. भारतातील अस्पृश्य समाजाच्या दृष्टीनेही अत्यंत प्रभावी घटना होती. कारण पहिल्यांदाच अस्पृश्यांना भारताच्या भावी राज्यघटनेबाबत आपले मत मांडण्यासाठी **प्रतिनिधी** पाठविण्याची संधी मिळाली. त्यानुसार **डॉ. बी. आर. आंबेडकर** व **श्री. दिवाण बहादूर आर., श्री. निवासन** हे अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून गोलमेज परिषदेमध्ये सहभागी झाले. यामुळे अस्पृश्यांचे इतर हिंदू पासून वेगळे अस्तित्व निर्माण झाले. त्याहीपुढे भारताची भावी राज्यघटना बनविण्यात त्यांचेही मत विचारात घेतले जाणार होते.

गोलमेज परिषदेमध्ये भारताच्या भावी राज्यघटनेबाबत विचार-विमर्श करण्यासाठी एकूण नऊ समित्या नेमल्या गेल्या. भारताच्या सामाजिक जीवनात अस्पृश्यतेसारखी अमानवी प्रथा प्रचलित होती. ज्या प्रथेने त्यावेळी सहा कोटी लोकांना ग्रासलेले होते. ज्याचे मानव म्हणून असणारे अधिकारही नाकारले होते. त्याहीपेक्षा त्यांच्यावर सामाजिक व आर्थिक निर्बंध लादल्याने ते सर्वांगाने गलीतगात्र झाले होते. अशा जातीयतेच्या प्रश्नावर उपाय शोधण्यासाठी एक 'अल्पसंख्यांक समिती' तयार केली. ह्या महत्त्वपूर्ण समितीचे अध्यक्ष त्या वेळचे ब्रिटनचे पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड हे स्वत: झाले होते. अल्पसंख्यांक समितीचे कार्य अस्पृश्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. कारण अस्पृश्यांबाबतचा इतर भारतीय प्रतिनिधींचा विशेष करून कॉंग्रेसचा त्यांच्याबाबतचा दृष्टीकोन स्पष्ट होणार होता.

मॉंटेग्यू-चेम्सफर्ड अहवालानुसार १९१९ च्या कायद्यात अस्पृश्यांच्या सुरक्षिततेची दक्षता घेतली गेली होती. अस्पृश्यांना स्पष्टपणे अल्पसंख्यांकांचा दर्जा देण्यात आला होता. त्यांच्या सुरक्षिततेसाठी जो कायदा संमत केला होता. आता त्या कायद्याच्या विस्तृतीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. कारण त्याच्या विस्तृतीकरणाचा उल्लेख केला जाऊ लागला, तेव्हा सरकारला अस्पृश्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाय योजना तयार करण्यात अडचणी जाणवल्या. कारण ब्रिटिश सरकारसुध्दा त्याबाबत योग्य निर्णय घेत नव्हते. सवर्ण हिंदूंच्याकडून अस्पृश्यांवर होणारा अमानुष अन्याय, अत्याचारापासून त्यांचे संरक्षण करण्याची गरज होती. या संदर्भात गोलमेज परिषदेच्या अल्पसंख्यांक समितीसमोर डॉ. आंबेडकरांनी एक प्रस्ताव सादर केला. ज्या प्रस्तावात अस्पृश्यांच्या सुरक्षिततेसंबंधीच्या उपाययोजना सुचविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये भारताच्या भावी राज्यघटनेत अस्पृश्यांसंबंधी कोणत्या राजनैतिक अधिकारांची तरतूद करण्यात यावी. या तरतूदी डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेसमोर ठेवल्या त्या पुढीलप्रमाणे :-

१. **समान नागरिकत्व :** स्वतंत्र भारतात बहुमताचे शासन निर्माण होण्यापूर्वीच अस्पृश्यांच्या बंधनमुक्तीची तरतूद करणे गरजेचे होते. कारण असे कार्य बहुमताच्या लहरीवर सोपविता येणार नाही. अस्पृश्येतेचे निवारण आणि नागरिक समानता प्रदान करण्याच्या हेतूने भारतीय राज्यघटनेत मूलभूत अधिकारांचा समावेश करावा व तो राज्यघटनेचाच एक भाग मानला जावा. भारताचे सर्व नागरिक कायद्यासमोर समान असतील व सर्वांना समानतेने अधिकार मिळतील. वर्तमान काळातील कोणताही आदेश किंवा कायद्याद्वारे अस्पृश्यतेच्या आधारावर कुठल्याही प्रकारची शिक्षा करता येणार नाही किंवा हानी पोहचवता येणार नाही. तसेच कोणावरही अयोग्यतेचा आरोप करणे किंवा भेदभाव करणे हे देशातील कोणत्याही नागरिकाबरोबर भारताची राज्यघटना लागू झाल्यापासून करता येणार नाही.

२. **समान अधिकारांचा उपयोग :** अस्पृश्य किंवा दलित समाजासाठी केवळ समान अधिकारांची घोषणाकरून भागणार नाही. कारण त्या समाजाकडून नागरिकत्वाच्या समान अधिकारांचा वापर केल्यावर पारंपारिक भारतीय समाज त्यांना विरोध करेल. अशा पाखंडी समाजाबरोबर दलितांना पूर्ण शक्तीनिशी टक्कर द्यावी लागेल. सवर्ण हिंदूच्या विरोधामुळे दलितांच्यासाठी अधिकारांच्या घोषणा ह्या केवळ धोका बनून राहतील. त्यामुळे त्यांच्या घोषित अधिकारांच्या उपयोगात कुठल्याही प्रकारची आडकाठी निर्माण केल्यास, त्या अपराध्यास योग्य ती शिक्षा देऊन दलितांच्या हक्कांचे संरक्षण करावयास हवे. यासाठी नागरिकत्वाच्या नियमांचे उल्लंघन कोणाही व्यक्तीने केल्यास त्याच्या विरोधात दंडात्मक कायदा केला पाहिजे. याद्वारे अस्पृश्यतेच्या आधारावर कोणाही व्यक्तीचे नागरिकत्वाचे अधिकार नाकारल्यास असे अधिकार नाकारणाऱ्या व्यक्तीला ह्या गुन्ह्याप्रमाणे जास्तीत-जास्त पाच वर्षांची शिक्षा अथवा दंड होऊ शकेल किंवा दोन्ही होऊ शकेल.

नागरिकत्वाच्या अधिकारांचा शांततापूर्वक उपयोग दलितांनी केल्यावर, कट्टर सनातनी हिंदू केवळ त्यामध्ये नुसते अडथळे आणून थांबणार नाहीत, तर दलितांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकतील. सामाजिक बहिष्कार हे कट्टर सनातनी हिंदूचे एक भयंकर हत्यार आहे. त्यामुळे दलित समाजाला जीवनावश्यक गोष्टीचा उपयोग करण्यात भविष्यात खूप अडचणी आहेत. कारण गावागावामध्ये दलितांची संख्या कमी आहे. त्यांना प्रत्येक गावात बहुसंख्य असलेल्या कट्टर सनातनी हिंदूचा सामना करावा लागेल. हे सनातनी लोक दलितांना प्राप्त झालेल्या अधिकारांना फक्त विरोध करून थांबणार नाहीत, तर दलितांच्या इज्जतीवर देखील हल्ले चढवतील. तसेच सनातनी हिंदू आपल्या वरचढ आर्थिक परिस्थितीचा उपयोग गावातील दलितांना दाबून ठेवण्यासाठी हत्यारासारखा करतील. सवर्ण हिंदू त्यांची शेती बळकावतील, मजूरी बंद करतील. अशा बहिष्कारात दलितांना सार्वजनिक जीवनात

वाटचाल करणे अशक्य होईल, त्यांना गावात जीवनावश्यक सामान खरीदणे देखील अशक्य केले जाईल. त्यामुळे सामाजिक बहिष्कार हा कायदेशीर शिक्षापात्र गुन्हा समजला जावा. तसा कायदा करण्यात यावा. या कायद्याने बहिष्काराला अपराधाच्या व्याख्येत बसवावे. बहिष्कार टाकणाऱ्याला दंड व शिक्षा हे त्या गुन्ह्याची गंभीरता पाहून दिले जावे. बहिष्कार टाकण्यासाठी प्रोत्साहन किंवा पाठिंबा व बहिष्काराची धमकी देणे, यासाठी दंडात्मक कायदा निर्माण करावा.

३. **भेदभावाच्या विरुध्द संरक्षण :** भविष्यातील कार्यकारिणीद्वारे कायदा तयार करणे व भेदभाव नष्ट करण्याच्या हुकूमाची अंमलबजावणी होणार आहे. या भीतीने दलित वर्गाचे लोक घाबरले आहेत. कारण या कार्यकारिणीचे व कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार सनातनी हिंदूना मिळतील. त्यामुळे जोपर्यंत घटनात्मकरित्या दलित वर्गाच्याविरूध्द कार्यकारिणीद्वारे भेदभावाचे मूळ ठरेल असे कायदे बनविणे व त्यांची अंमलबजावणी करणे असंभव बनवले जात नाही. तोपर्यंत बहुसंख्य असलेल्या शासनाची प्रजा बनण्याचे दलित लोक स्वीकार करणार नाहीत.

त्यामुळे भारताचे कार्यकारी मंडळ देशात असा कुठलाही कायदा किंवा नियम तयार करू शकत नाही, ज्यामुळे नागरिकत्वाच्या अधिकारांचे उल्लंघन होईल व पूर्वापार चालत आलेल्या अस्पृश्यतेच्या प्रथेवर आधारित भेदभाव केला जाईल. म्हणजेच भेदभावाच्या प्रचलित पध्दतीपासून संपूर्ण संरक्षण दलितांना द्यावे.

४. **विधानसभांमध्ये पर्याप्त प्रतिनिधित्व :** दलित समाजाला आपल्या कल्याणासाठी विधानसभांमध्ये व कार्यकारी मंडळावर प्रभाव टाकण्यासाठी आवश्यक असणारे पर्याप्त प्रतिनिधित्व मिळावे. यामध्ये (अ) प्रांतीय आणि केंद्रीय विधानसभामध्ये दलितांना पर्याप्त प्रतिनिधित्व दिले जावे. (ब) दलितांना त्यांच्यामधील व्यक्तीनाच त्यांचे प्रतिनिधी म्हणून निवडून देण्याचा अधिकार असावा. (क) प्रौढ मताधिकार दिला जावा. (ड) पहिल्या दहा वर्षाकरिता स्वतंत्र निवडणूक पध्दती आणि त्यानंतर संयुक्त निवडणूक पध्दतीद्वारे त्यांच्यासाठी निवडणूका घ्याव्यात. संयुक्त निवडणूक पध्दती दलितांच्यावर त्यांच्या इच्छेविरूध्द तोपर्यंत लादली जाऊ नये. जोपर्यंत संयुक्त निवडणूक पध्दतीची पूर्ण प्रौढ मताधिकारांच्या बरोबर सांगड घातली जात नाही. यामध्ये अत्यंत महत्त्वाचे म्हणजे दलित समाजासाठी 'पर्याप्त प्रतिनिधित्व' या शब्दरूप अथवा त्याची योग्य व्याख्या करण्यात आली पाहिजे.

५. **सरकारी नोकरीत समुचित प्रतिनिधित्व :** सनातनी हिंदू अधिकाऱ्यांनी दलितांचे खूप मोठे शोषण केले आहे. त्यांनी आपल्या सरकारी नोकरीमध्ये एकाधिकारशाही गाजवली

आहे. न्याय आणि समतेला तिलांजली देऊन, अशा सवर्ण अधिकाऱ्यांनी दलितांच्या तुलनेत उच्च हिंदूना त्याचा फायदा जास्त मिळावा यासाठी कायद्याचा व अधिकारांचा दुरुपयोग केला आहे. त्यामुळे नोकर भरतीत सर्व प्रकारच्या घटकांना/समाजांना त्यांचा योग्य हिस्सा मिळाला पाहिजे. जेणेकरून उच्चजातींनी एकाधिकारशाही बंद होईल. यासाठी दलित समाजाला कायद्याने संमत केलेल्या नियमांचा राज्यघटनेत अंतर्भाव असावा. त्यानुसार संपूर्ण भारतात व प्रत्येक प्रांतात नोकऱ्यांमध्ये भरती करण्यासाठी, तसेच त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'पब्लिक सर्व्हिस कमिशन' असावे. कमिशनच्या सदस्याला पदावरून हटवण्यासाठी फक्त विधानसभा तसा ठराव पास करू शकेल. कमिशनने निर्धारित योग्यतेचे परीक्षण करण्याचे काम करावे. कमिशन अशा प्रकारे नोकर भरती करेल की, भारतीय समाजातील सर्व गटांना त्यांचे यथायोग्य प्रतिनिधित्व मिळू शकेल.

६. **पक्षपाती कार्यवाही किंवा हितांकडे दुर्लक्ष झाल्यास त्याबाबत करावयाची तरतूद :** स्वतंत्र भारतातील शासन सवर्ण हिंदूच्या हातात असेल व ते दलितांबाबत कोणतीही सहानुभूती दाखवणार नाही. उलट ते दलितांच्या हितसंबंधात स्पर्धक म्हणून उभे राहतील. दलितांच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष करतील. त्यामुळे भविष्यात काय घडेल हे सांगता येणार नाही, त्यामुळे अशा पक्षपातीपणाच्या विरोधात राज्यघटनेत कायदे करणे आवश्यक आहे. कारण प्रतिनिधित्व असूनही विधानसभेत दलित अल्पसंख्यांक ठरतील. त्यामुळे राज्यघटनेतच त्यांच्या हिताच्या संरक्षणाची व्यवस्था केली पाहिजे. त्यानुसार केंद्र व प्रांतातील सर्व संस्थांना हे अनिवार्य करावे की, त्यांनी दलितांच्यासाठी शिक्षण, स्वच्छता व नोकऱ्यांमध्ये त्यांचे योग्य प्रमाण यावे. यासाठी कायदे तयार करावेत. दलितांना नाउमेद करणारे कोणतेही कार्य त्यांनी करू नये. अशा अनिवार्य कायद्याची अवहेलना केंद्र अथवा प्रांताकडून झाल्यास त्याबाबत ब्रिटिश सरकारच्या भारतमंत्र्याकडे अपील करता येईल.

७. **विशेष विभागीय सुरक्षेची व्यवस्था :** सनातनी हिंदू समाजाच्या हट्टी व अस्पृश्यांच्या कट्टर विरोधी भूमिकेमुळे दलित वर्गाला अभावी व नीरस जीवन कंठावे लागत आहे. सनातनी हिंदू समाज दलितांना समानतेचा दर्जा व त्यांच्याबरोबर समानतेचा व्यवहार करण्यासाठी कधी राजी नसतो. दलित समाज हा भूमिहीन मजूर व गरिबीने ग्रासलेला आहे. पण दलितांची ही गरिबी सवर्ण हिंदूंच्या द्वेषभावनेतून निर्माण होते. दलितांच्या उदरनिर्वाहाची सर्व साधने बंद करण्यात आली आहेत. दलितांना त्रास देण्याचे अनेक विभिन्न मार्ग सवर्ण हिंदूकडे आहेत. पण या सर्व अत्याचारांचा सामना करण्यासाठी दलितांच्या जवळ कमी व मर्यादित साधने आहेत.

अतिशूद्रांनी आपल्या मालकाचे म्हणणे ऐकले नसल्यास शिक्षा करणे, त्यांच्यावर खोट्या केसेस दाखल करणे, त्यांच्या वस्तीला चहूबाजूनी घेरणे, मंदिर प्रवेशास मनाई करणे, सरकारी कागदपत्रात चुकीची नोंद करणे, त्यांच्या झोपड्या पाडणे, त्यांना हाकलून लावणे. अशा अनेक मार्गानी त्यांना पददलित केले जाते. त्यामुळे शासनाच्या कार्यप्रणालीत त्यांच्या उत्थानाला अग्रक्रम दिला पाहिजे. शास्त्रीय स्तरावरून सर्वांना समान संधी देण्याची नीती अंमलात आणली पाहिजे. यासाठी शासनाने राज्यघटनेतील नियम कायमस्वरूपी लागू करण्यासाठी एका विशेष विभागाची स्थापना करावी.

८. **दलित वर्ग आणि मंत्रीमंडळ :** सरकारी कामकाजात दलित समाजाचा प्रभाव राहण्यासाठी त्यांना विधानसभेत जागा पाहिजेत. त्याचप्रमाणे शासनाची सर्वसामान्य नीती ठरविण्याची संधी दलित समाजाला मंत्रीमंडळात सामील करून घेऊन दिली पाहिजे. त्यामुळे दलित वर्गाची अशी मागणी आहे की, इतर अल्पसंख्यांकांबरोबर मंत्रीमंडळात दलितांनाही प्रतिनिधित्व मिळण्याचा नैतिक अधिकार संरक्षित केला पाहिजे. त्यासाठी गव्हर्नर जनरल आणि प्रांतांच्या गव्हर्नर जनरलला आदेश देऊन त्यांनी आपल्या मंत्रीमंडळात दलितांना योग्य प्रतिनिधित्व देण्याचे निर्देश द्यावेत.

वरीलप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्यासाठीच्या मागण्या गोलमेज परिषदेत ठेवल्या. त्यासंदर्भात गोलमेज परिषदेच्या अल्पसंख्यांक समितीने पुढीलप्रमाणे भूमिका मांडली. प्रत्येक संप्रदायाला किंवा जातीला त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागाची संख्या दिली जावी. अल्पसंख्यांकांना विधानसभेचे प्रतिनिधित्व देण्यासाठी (१) नियुक्ती (२) सामान्य निवडणूक व (३) वेगळी निवडणूक पध्दती हे तीन उपाय सुचवले. पण यातील नियुक्ती किंवा नेमणूकीची पध्दती सर्व संमतीने नाकारण्यात आली. तर संयुक्त निवडणूक पध्दती ही निरनिराळ्या समुदायांना त्यांच्या प्रमाणात जागा राखून ठेवण्याच्या अटीवर सुचविण्यात आली. पण अशा पध्दतीतून अल्पसंख्यांकांना त्यांच्या प्रतिनिधित्वाची हमी मिळणार नव्हती. कारण बहुसंख्यांकांचा प्रभाव असल्यामुळे अल्पसंख्यांकांना प्रतिनिधित्व मिळणार नव्हतेच. त्यामुळे संयुक्त निवडणूकांना विरोध होऊ लागला.

या संघर्षातून एक निष्कर्ष निघाला व तशी अल्पसंख्यांकांची मागणी पण होती ती म्हणजे स्वतंत्र (वेगळी) निवडणूक पध्दती. पण या पध्दतीला भारतात पूर्वीपासून विरोध होत आला. हिंदू लोकसंख्येपासून दलितांना वेगळे केले पाहिजे व विधानसभाच्या निवडणूकीत वेगळ्या समुदायाच्या नात्याने मान्यता दिली पाहिजे. शासनासंबंधीच्या कार्याकडे पाहता प्रांतिय व केंद्रीय नोकऱ्यांच्या भरतीचे काम पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे सोपविण्यास सर्वांची संमती होती. त्यामुळे नोकऱ्यात वेगवेगळ्या गटांच्या उमेदवारांची योग्यता व

नोकऱ्यांचे मापदंड लक्षात घेऊन प्रत्येक गटाला योग्य प्रतिनिधित्व देण्यात यावे. तसेच ब्रिटिश सरकार संबंधित समुदायाच्या किंवा जातीच्या संमतीशिवाय त्यांच्यावर कोणताही निवडणूक सिध्दांत लादू इच्छित नव्हते. त्यामुळे यासंदर्भातील समझोता असफल झाल्यास त्यात काही उणीवा असूनही नवीन राज्यघटनेंतर्गत स्वतंत्र निवडणूक पध्दतीलाच निवडणूक व्यवस्थेचा आधार मानावा लागेल. यातून प्रमाणाचा प्रश्न स्पष्ट होईल व दलित समाजाने केलेल्या मागण्यांचा योग्य विचार होईल.

गोलमेज परिषदेच्या 'फेडरल स्ट्रक्चर कमिटी'ला केंद्राच्या संदर्भात अस्पृश्यांच्या प्रश्नावर विचार करावयाचा होता. तिने आपल्या अहवालात गोलमेज परिषदेला कळविले की, दलित वर्ग, ख्रिश्चन्स, युरोपियन्स, अँग्लो-इंडियन्स, जमीनदार व व्यापारी आणि श्रमिकांसाठी जिथपर्यंत शक्य असेल, दोन्ही सभागृहात विशेषत: कनिष्ठ अथवा निम्नस्तरीय सदनात त्यांच्या प्रतिनिधित्वासाठी कायदा करावा. गोलमेज परिषदेचे पहिले अधिवेशन पूर्ण होण्यापूर्वीच वरील दोन्ही समित्यांचा अहवाल गोलमेज परिषदेत मांडण्यात आला. या परिषदेद्वारे त्याची नोंद घेण्यात आली. सर्वांच्या संमतीने राजनैतिक आणि घटनात्मक बाबींमध्ये अस्पृश्यांसाठी स्वतंत्र अस्तित्वाचा स्वीकार करण्यात आला होता. गोलमेज परिषदेच्या या निर्णयावर भारतातील फक्त काँग्रेसचे मत स्पष्ट होत नव्हते. कारण काँग्रेसने गोलमेज परिषदेवर बहिष्कार टाकला होता व ब्रिटिश सरकारच्या विरोधात सविनय कायदेभंगाचे आंदोलन करण्यात काँग्रेस गुंतली होती.

## २. दुसरी गोलमेज परिषद :-

गोलमेज परिषदेचे दुसरे अधिवेशन सुरू होतेवेळी ब्रिटिश सरकार आणि काँग्रेस यांच्यात तडजोड होऊन, काँग्रेसने परिषदेत सहभागी होण्याचे मान्य केले. तसेच गोलमेज परिषदेसमोरील समस्यांवर मार्ग शोधण्यासाठी योगदान देण्याचे मान्य केले. कारण प्रथम अधिवेशनात गोलमेज परिषद कुठल्याच निर्णयापर्यंत पोहचली नव्हती. याचे कारण म्हणजे काँग्रेस अनुपस्थित असल्यामुळे तिचे म्हणणे स्पष्ट होत नव्हते.

त्यामुळे गोलमेज परिषदेचे दुसरे अधिवेशन यशस्वी होण्याच्यादृष्टीने सर्वांच्या नजरा काँग्रेसकडे होत्या. या परिषदेत काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून म. गांधी सहभागी झाले. पण ज्या-ज्यावेळी गोलमेज परिषदेमध्ये घटनात्मक आणि संप्रदायाच्या किंवा जातीयतेच्या प्रश्नांवर संघर्ष होण्याची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा म. गांधीजींनी त्यावर कोणतेही रचनात्मक उपाय सुचविले नाहीत. पण १९२० पासून काँग्रेसने अस्पृश्यता निवारणाच्या प्रश्नावर महत्त्वाची भूमिका घेतली आहे असे मत म. गांधीजींनी मांडले व काँग्रेसच अस्पृश्यता निवारण करणार असे म्हटले. पण डॉ. आंबेडकर म्हणाले की, गोलमेज परिषदेच्या

पहिल्या अधिवेशनाला जाण्यापूर्वी त्यांनी म. गांधीजींची मुंबईत भेट घेतली होती. तेव्हा म. गांधीजींनी राजनैतिक बाबींमध्ये अस्पृश्यांना स्वतंत्र अस्तित्व देण्याच्या विचारात आपण नाही हे स्पष्ट केले होते. तसेच गोलमेज परिषदेत म. गांधीजींनी स्पष्ट केले की, अस्पृश्यांचे हित काँग्रेसला जेवढे समजले आहे तेवढे देशाच्या अन्य कुठल्याही व्यक्तीला समजलेले नाही आणि म्हणून मी विशेष प्रतिनिधित्व देण्याला पूर्णशक्तीनिशी विरोध करेन. अशा प्रकारे डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यांच्या संदर्भातील मागण्यांना त्यांनी विरोध केला.

सर आगा खान यांनी अल्पसंख्यांक कमिटीसमोर स्पष्ट केले की, जेव्हा समझोत्याच्या गोष्टी चालल्या आहेत तेव्हा इतर अल्पसंख्याकांनीही आपला दावा तयार केला पाहिजे. मुसलमान व दलित वर्गाच्या अल्पसंख्यांक प्रतिनिधीनी आपला दावा कमिटीसमोर मांडला आहे. आता फक्त परिशिष्टाद्वारे प्रतिनिधित्वाची संख्या देण्याचे राहिले आहे. तसेच अल्पसंख्यांक कमिटीसमोर डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले की, मं. गांधीजींनी फेडरल स्ट्क्चर कमिटीसमोर सांगितले आहे की, काँग्रेस प्रतिनिधी या नात्याने मुसलमान व शीख यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणास राजनैतिक मान्यता देण्यास आपण तयार नाही. म्हणजेच ते दलित, अँग्लो-इंडियन व भारतीय ख्रिश्चन यांना राजनैतिक मान्यता देण्यास तयार नव्हते.

त्यामुळे दलित वर्गास अल्पसंख्यांक समुदायाच्या स्वरूपात मान्यता मिळत नाही व भारताच्या भावी राज्यघटनेतील राजनैतिक मान्यतेचे हक्कदार ते होत नाहीत किंवा तसे आश्वासन मिळत नाही. तोपर्यंत भावी राज्यघटनेच्या संदर्भातील समितीत सामील होण्यास काहीही अर्थ नाही असे डॉ. आंबेडकर म्हणाले.

यावर म. गांधीजी म्हणाले, जातीयतेच्या समस्येची सोडवणूक हे स्वराज्याचा राज्यघटनेचा पाया नाही, तर शिखर असू शकते. परंतु केव्हा, जेव्हा आमच्यातील सारे मतभेद दूर होतील. तसेच परदेशी दबावापासून आम्ही मुक्त असू तेव्हा जातीयतेचे भेदभाव नष्ट होतील याची मला खात्री आहे. परंतु हे सर्व देश स्वतंत्र झाल्यावर घडेल म्हणून माझी सूचना आहे की, अल्पसंख्यांक समिती अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात यावी आणि राज्यघटनेच्या मुख्य सिध्दांतांना तातडीने योग्य स्वरूप दिले जावे. यातील अल्पसंख्यांक समिती अनिश्चित काळासाठी स्थगित करण्याचा म. गांधीजींचा ठराव व वेगवेगळ्या जातींच्या प्रतिनिधींवर गांधीजींनी केलेली चिखलफेक डॉ. आंबेडकरांना आवडली नाही. त्यामुळे अस्पृश्य समाजाचे आपण प्रतिनिधित्व करतो असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्टपणे सांगितले. तसेच अल्पसंख्यांक समितीने जातीयतेचा प्रश्न संतोषजनक मार्गाने सोडवावा आणि ते शक्य होत नसेल तर ब्रिटिश सरकारने हा प्रश्न सोडविण्यासाठी स्वत:कडे घ्यावा असे डॉ. आंबेडकरांनी स्पष्ट केले. कारण ब्रिटिश सरकारमध्ये जी जबाबदारीची भावना आहे ती इतर पक्षांमध्ये नसावी असे त्यांनी म्हटले. ब्रिटिश सरकारने सत्ता सोपविताना राज्यघटनेत अशा काही कायदेशीर अटी घालाव्यात की, ज्यामुळे विरोधकांच्याच हातात सर्व सत्ता जाणार नाही. काही लोकांच्या किंवा छोट्या गटांच्या मग ते मुसलमान असोत किंवा

हिंदू त्याच्याकडे सत्ता केंद्रीत होणार नाही. त्याऐवजी आता उपाय शोधावा की, सत्तेमध्ये प्रत्येक गटाला त्याच्या-त्याच्या प्रमाणात हिस्सा मिळावा.

अंतिमत: ब्रिटिश पंतप्रधानांनी आपल्या भाषणात स्पष्ट केले की, आम्ही ही बैठक स्थगित करीत आहोत. पुन्हा बैठक बोलावे पर्यंत सर्व प्रतिनिधीनी अल्पसंख्यांक प्रतिनिधींचे समर्थन प्राप्त करावे व सर्वमान्य असा तोडगा काढावा अशा सर्वसामान्य समझोत्याच्या विरोधात ब्रिटिश सरकार जाणार नाही. त्यानंतर अल्पसंख्यांकांनी आप-आपसात विचारविमर्श करून १३ नोव्हेंबर, १९३१ रोजी सभा होण्यापूर्वी पंतप्रधानांकडे एक समझोता तयार करून दिला. मुसलमान, दलित, अँग्लो इंडियन आणि युरोपियन व भारतीय ख्रिश्चन यांनी मिळून तयार केलेल्या समझोत्यात ब्रिटिश इंडियाच्या ४६% जनतेच्या मागण्यांचा समावेश होता. या 'अल्पसंख्यांक समझोत्या'ने हे सर्व लोक जातीय प्रश्नावर मार्ग शोधून काढण्यात यशस्वी झालेत असे सर आगा खान यांनी स्पष्ट केले.

## ❑ महात्मा गांधींची भूमिका :-

म. गांधीजींनी स्पष्ट केले की, काँग्रेस, मुसलमान आणि शीख यांना जो समझोता मान्य असेल त्याचा स्वीकार करेल. पण अन्य कुठल्या दुसऱ्या अल्पसंख्यांक (अस्पृश्य) संप्रदायाबाबत हा समझोता मान्य करणार नाही. पुढे ते म्हणाले की, अस्पृश्यांच्या महत्त्वपूर्ण हितासाठी भारतीय स्वातंत्र्याचे मूल्य चुकविण्यास मी मुळीच तयार नाही. मी स्वत: व्यक्तीगत स्वरूपात अस्पृश्यांचा एकमेव प्रतिनिधी आहे असा त्यांनी दावा केला. स्वतंत्र निवडणूक पध्दती आणि अस्पृश्यांच्यासाठी वेगळ्या राखीव जागा हा काही अस्पृश्यता निवारण्याचा योग्य मार्ग नव्हे, असे त्यांचे मत होते.

या सर्व संघर्षावरून ब्रिटिश पंतप्रधानांनी अल्पसंख्यांक समितीची बैठक अनिश्चित काळापर्यंत स्थगित करण्याआधी समितीच्या सर्व सदस्यांना विचारले की, जातीयतेच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी सर्व प्रतिनिधी मिळून मला विनंती करतील व मी दिलेल्या निवाड्याचा स्वीकार करतील. तुम्ही सर्व लोक असे लिहून द्याल की, पंतप्रधानांनी दिलेला निवाडा विश्वासाने मान्य करू आणि आमच्या पूर्णक्षमतेने नवीन राज्यघटनेत त्याची अंमलबजावणी करू. अशा आशयाचे संमतीपत्र सर्व भारतीय सदस्यांनी लेखी स्वरूपात ब्रिटिश पंतप्रधानांच्याकडे दिले. त्यामुळे सर्व प्रतिनिधींनी स्व-खुशीने पंतप्रधानांना अंतिम पंच म्हणून मान्यता दिली. त्यामुळे जातीयतेच्या प्रश्नावर फक्त त्यांच्या निर्णयाची वाट पाहायची होती.

याच दरम्यान मताधिकाराच्या प्रश्नावर विचारविनिमय करण्यासाठी ब्रिटिश पंतप्रधानांनी डिसेंबर १९३१ मध्ये लॉर्ड लोथियन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने केंद्रीय व प्रांतिय पातळीवरील सरकारांनी व कमिट्यांनी पाठविलेल्या वेगवेगळ्या अहवालावर चर्चा केली. तसेच या व्यतिरिक्त अस्पृश्यांच्या राजनैतिक मागण्यांवर उपाय शोधून काढण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या समितीवर

सोपविले होते. या लोथियन कमिटीच्या स्थापनेनंतर अस्पृश्यांच्या लोकसंख्येला महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे १९३१ मधील प्रांतिय सरकारांनी, प्रांतिय मताधिकार समितीने व प्रत्यक्ष जनगणनेतील अस्पृश्यांच्या लोकसंख्येच्या आकडेवारीत खूपच तफावत पहावयास मिळाली. या आकडेवारीच्या फरकावरून हिंदूच्या मनोवृत्तीतील अस्पृश्यांप्रती असणारा क्षुद्रपणा दिसला. ज्यामधून स्वार्थासाठी सत्याला तिलांजली देऊन, खोट्या आकडेवारीच्या आधारावर अस्पृश्यांचे अधिकार नाकारण्यास त्यांनी मागेपुढे पाहिले नाही. तसेच अल्पसंख्यांकांचा दावा मान्य करताना जर दलित वर्गासाठी स्वतंत्र निवडणूकांचा मार्ग स्वीकारला तर त्याला प्राणपणाने विरोध करू असे म. गांधीजींनी सर सॅम्युअल होअर यांना पाठविलेल्या ११ मार्च १९३२ पत्रात म्हटले. अस्पृश्यांसाठी स्वतंत्र निवडणूकांचा स्वीकार केला तर त्याला विरोध करण्यासाठी मी आमरण उपोषण करेन, या आमरण उपोषणाच्या इशाऱ्याने ब्रिटिश पंतप्रधानाचा जातीय प्रश्नासंबंधीचा निर्णय म. गांधीजी रोखू इच्छित होते.

## ❍ जातीय निवाडा :-

अस्पृश्यांना मिळणाऱ्या राजकीय हक्कांना विरोध करण्याची भूमिका काँग्रेसने घेतली होती. त्यात म. गांधीजींनी आमरण उपोषणाचा इशारा देऊन ब्रिटिश पंतप्रधानांना अल्पसंख्यांकासंबंधी निर्णय घेण्यापासून रोखू पहात होते. पण ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीयतेच्या प्रश्नावर १७ ऑगस्ट, १९३२ रोजी आपला अस्पृश्यांसंबंधीचा निवाडा जाहीर केला. तोच जातीय निवाडा (Communal Award) म्हणून भारतीय राजकारणात प्रसिध्द झाला.

## ❍ ब्रिटिश सरकारचा १९३२ चा जातीयतेच्या समस्येवरील निर्णय (जातीय निवाडा)

गोलमेज परिषदेचे दुसरे सत्र समाप्त झाल्यानंतर ब्रिटिश पंतप्रधानांनी १ डिसेंबर १९३१ रोजी जे भाषण केले, त्याचे समर्थन ब्रिटिश संसदेच्या दोन्ही सभागृहांनी केले. त्या भाषणात पंतप्रधान म्हणतात की, जर भारतातील सर्व समुदाय जातीयतेच्या प्रश्नावर कोणत्याही सर्वमान्य समझोत्यापर्यंत पोहचू शकले नाहीत, त्यामुळे जातीय समझोत्याबाबत गोलमेज परिषदेत ते सर्व समुदाय अयशस्वी झाले आहेत. त्यामुळे ब्रिटिश सरकारने निर्णय घेतला की, भारतीय राज्यघटनेचे उद्दिष्ट केवळ भारतीय समुदायातील असफल कारणांमुळे (जातीयतेच्या प्रश्नामुळे) निरर्थक बनू दिले जाणार नाही. त्यासाठी ब्रिटिश सरकार एकत्रित योजना लागू करून अडचणीतून मार्ग काढला जाईल.

१९ मार्च १९३२ रोजी ब्रिटिश सरकारला मिळालेल्या सूचनेनुसार, भारतातील संप्रदाय कोणत्याही समझोत्याप्रत न आल्यामुळे नवीन राज्यघटना निर्माण करण्याच्या योजनेची प्रगती थांबली आहे. काही लोक प्रश्नांचे पुनर्निरीक्षण करण्यात गुंतले आहेत. त्यांची शिफारस अशी आहे की, नवीन राज्यघटनेत

अल्पसंख्यांकांच्या समस्यांमधील कमीत कमी काही समस्यांवर निर्णय घेतल्याशिवाय पुढे काही प्रगती केली जाऊ शकत नाही.

त्यानुसार ब्रिटिश सरकारने निर्णय दिला आहे की, संसदेत मांडण्यात येणाऱ्या भारतीय राज्यघटनेशी संबंधीत ठरावांना मूर्त स्वरूप देण्यासाठी कायदे करून ते सामील केले जातील. या योजनेचे उद्दिष्ट ब्रिटिश इंडियाच्या प्रांतिय आणि केंद्रीय मंडळामध्ये भारतातील सर्व समुदायांच्या प्रतिनिधित्वाची मर्यादित व्यवस्था केली जाईल. या योजनेचे उद्दिष्ट मर्यादित करण्याच्या निर्णयाचा अर्थ असा नाही की, ब्रिटिश सरकार हे समजण्यात अयशस्वी झाले आहे. तर राज्यघटनेच्या निर्माणा वेळी अल्पसंख्यांकांच्या असंख्य महत्त्वपूर्ण समस्या उभ्या राहतील. त्यामुळे समुदायांच्या प्रतिनिधित्वाचे प्रमाण आणि पध्दती या संबंधी घोषणा करण्यात आल्यानंतर विविध जातीजमाती स्वत:च जातीय प्रश्नाच्या सोडवणूकीच्या संदर्भात समाधानकारक उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतील.

ब्रिटिश शासनाची अशी इच्छा आहे की, शासन कोणत्याही वाटाघाटीत एक पक्ष म्हणून सहभागी होणार नाही. तसेच एखाद्या निवाडा सर्व पक्षांना मान्य नसेल किंवा सर्व पक्षांनी सादर केलेल्या निवाड्यावर विचारविनिमय करण्यासाठी, त्यात बदल किंवा सुधारणा करण्यासाठी करण्यात येणाऱ्या कोणत्याही निवेदनाची शासन दखल घेणार नाही. पण सर्व संमत एखाद्या प्रस्तावावर विचार करण्यासाठी शासन आपले दरवाजे बंद करणार नाही. नवीन गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट पास होण्यापूर्वी व त्याचे कायद्यात रूपांतर होण्यापूर्वी, जर सर्व संबंधीत समुदायांनी परस्पर सहमतीने एखादी योजना तयार केली आहे अशी शासनाची खात्री पटली तर आणि ती योजना प्रांताधिकारी किंवा संपूर्ण ब्रिटिश हिंदुस्थानविषयी असेल तर शासन संसदेला शिफारस करण्यास तयार आहे की, त्या योजनेचे कायद्यात रूपांतर करावे.

दलित वर्गातील जे सदस्य मतदान करण्यास पात्र ठरतील ते सर्वसाधारण मतदारसंघातील उमेदवाराला मतदान करतील. पण वस्तुस्थितीचा विचार करता बऱ्याच काळासाठी या पध्दतीवर आधारीत दलितांना विधानमंडळात पुरेसे प्रतिनिधित्व मिळणे शक्य नाही. त्यामुळे सारणीप्रमाणे काही जागा त्यांच्याकरिता आरक्षित केल्या जातील या जागा विशेष मतदारसंघाच्या माध्यमातून निवडल्या जातील. या विशेष मतदारसंघात दलित वर्गातील पात्र मतदारच मतदान करू शकेल व तो मतदार सर्वसाधारण मतदार संघातही मतदान करण्यास पात्र असेल. दलितांची लोकसंख्या अधिक आहे अशा विभागातून विशेष मतदार संघ अस्तित्वात यावेत असा दृष्टिकोन आहे. या योजनेत मद्रास सोडून कोठेही प्रांताचा पूर्ण भूभाग अशा मतदारसंघाच्या कक्षेत येणार नाही. बंगालमध्ये काही सर्वसाधारण मतदारसंघात दलित बहुसंख्य असल्याने पुढील तपासणीची कारवाई होईपर्यंत या प्रांतातून दलितांसाठी विशेष मतदारसंघातून पाठवावयाच्या प्रतिनिधींची संख्या निश्चित करण्यात आली नाही. बंगाल प्रांतात दलितांना १० पेक्षा कमी जागा मिळणार नाहीत अशी व्यवस्था करावी असा विचार आहे.

प्रत्येक प्रांतात दलितांसाठी स्थापन केलेल्या विशेष मतदार संघात कोणाला मतदानाचा अधिकार राहील याच्या व्याख्येला निश्चित अंतिम स्वरूप देण्यात आले नाही. ही व्यवस्था प्रौढ मतदान समितीच्या स्वीकृत सामान्य नियमानुसार करण्यात येईल. उत्तर हिंदुस्थानातील काही प्रांतात या व्याख्येत काही बदल होण्याची शक्यता आहे. कारण अस्पृश्यांसाठी लावल्या जाणाऱ्या कसोट्या त्या ठिकाणी अप्रस्तुत किंवा अयोग्य ठरण्याची शक्यता आहे. ब्रिटिश सरकार असा विचार करीत नाही की, विशेष मतदारसंघाची आवश्यकता एका विशिष्ट कालावधी नंतरही भासेल. राज्यघटनेत अशी तरतूद करण्यात यावी की, असे मतदारसंघ वीस वर्षानंतर समाप्त होतील. परिच्छेद सहामधील तरतुदीनुसार सदर बाब 'निवडणूक नियमांचे पुनर्निरीक्षण' या विषयात येईल.

अशाप्रकारे ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीय निवाडा प्रसिध्द केला. ज्यामध्ये अस्पृश्यांना किंवा दलितांना विशेष मतदारसंघाची तरतूद करून त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करण्यात आले होते. दुसऱ्या गोलमेज परिषदेतील करारनाम्यावर स्वाक्षरी केल्यामुळे भारतीय प्रतिनिधीना हा निवाडा स्वीकारणे बंधनकारक होते. अशी कायदेशीर प्रक्रिया जातीय निवाड्याबाबत होती.

### ❊ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ ❊

❑ **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. पहिली गोलमेज परिषद कधी सुरू झाली?

२. गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे दोन प्रतिनिधी कोण होते?

३. ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीय निवाडा कधी प्रसिध्द केला?

४. म. गांधीजींनी कोणत्या अल्पसंख्यांकांच्या समझोत्याला मान्यता दिली?

५. म. गांधीजींनी सर सॅम्युल होअर यांना पाठविलेल्या ११ मार्च १९३२ च्या पत्रात कोणता इशारा दिला होता?

## २.२.४ पुणे करार

म. गांधीजींनी गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनावेळी अल्पसंख्यांकांच्याबाबतच्या ब्रिटिश पंतप्रधानांचा निवाडा स्वीकार करण्याच्या करारनाम्यावर सही केली होती. त्या करारनाम्यानुसार जातीय निवाडा स्वीकारणे सर्व भारतीय प्रतिनिधींवर बंधनकारक होते. पण म. गांधीजींनी या जातीय निवाड्यातील तरतुदींमध्ये बदल करण्याचे प्रयत्न सुरू केले. म. गांधीजींनी सुरूवातीपासूनच अस्पृश्यांच्या राजकीय हककांच्याबाबत विरोधी भूमिका घेतलेली दिसते. गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनात म. गांधीजींनी स्पष्ट केले होते की, 'हिंदू-मुसलमान आणि शीख यांना जो समझोता मान्य असेल त्याचा कॉंग्रेस

स्वीकार करेल. पण काँग्रेस अन्य कुठल्याही दुसऱ्या अल्पसंख्यांक (अस्पृश्य) संप्रदायाचे विशेष अधिकार स्वीकारणार नाही.' म. गांधीजी कोणत्या आधारावर अस्पृश्यांच्या मागण्यांना विरोध करीत होते व अस्पृश्यता निवारणाचा पर्यायी रचनात्मक कार्यक्रम कोणता देऊ इच्छित होते हे त्यांच्या कृतीतून स्पष्ट होत नव्हते. एका बाजूला हिंदूनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य गंभीरपणे हाती घेतले आहे असे म्हणत, तर दुसऱ्या बाजूला अस्पृश्य मुसलमान व शीख यांच्यासारखे संघटित नाहीत. त्यामुळे त्यांची राजकीय चेतनाशक्ती कमी आहे. त्यामुळे ते खूप भयभीत झाले आहेत. मी त्या भयापासून त्यांचे संरक्षण करू इच्छितो असे म. गांधीजी म्हणत. पण काही राजकीय हक्क म्हणून स्वतंत्र निवडणूक पध्दती अस्पृश्यांनी मागितली तर तिला मात्र ते विरोध करत होते. त्यामुळे गोलमेज परिषदेत जातीयतेच्या प्रश्नावर सर्वमान्य तोडगा निघू शकला नाही. त्यामुळे भारतीय संप्रदायाच्या सर्व प्रतिनिधींनी ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीय समस्येवर सुचविलेला तोडगा मान्य करण्याचे लेखी आश्वासन ब्रिटिश शासनाला दिले होते. त्यानुसार १७ ऑगस्ट, १९३२ रोजी जातीयतेच्या प्रश्नावरील उपाय म्हणून जातीय निवाडा ब्रिटिश पंतप्रधानांनी घोषित केला.

या दरम्यान म. गांधीजी येरवड्याच्या तुरुंगात होते. तुरुंगांतूनच १८ ऑगस्ट, १९३२ रोजी त्यांनी सर सॅम्युअल होअर यांना एक पत्र लिहिले. त्यामध्ये आपल्या ११ मार्च, १९३२ च्या पत्राचाही उल्लेख केला. या पत्रात म. गांधीजींनी ब्रिटिश पंतप्रधानांनी घोषित केलेला जातीय निवाडा वाचून आपण खूपच अस्वस्थ झाल्याचे म्हटले. या जातीय निवाड्याला विरोध करण्याची भूमिका १३ नोव्हेंबर १९३१ च्या गोलमेज परिषदेतील भाषणात आपण स्पष्ट केल्याचे त्यांनी विशद केले. जाहीर झालेल्या जातीय निवाड्याला विरोध करण्यासाठी आपण आमरण उपोषण २० सप्टेंबरच्या दुपारपासून सुरू करण्याचे निश्चित केले आहे. दरम्यान लोकमताच्या दडपणामुळे किंवा ब्रिटिश सरकार स्वत:च प्रस्ताव पास करून जातीय निवाड्यात बदल करणार असेल तर हे आमरण उपोषण आपण स्थगित करू शकतो असे त्यांनी म्हटले.

अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देणे हे अस्पृश्य व हिंदू धर्माला घातक आहे असा दावा म. गांधीजींनी केला होता. हा दावा कदाचित चुकीचा असू शकेल असे तेच म्हणाले. पण आपला दावा बरोबर आहे हे स्पष्ट करण्यासाठी पुढे ते म्हणतात, 'वरील दावा जर चुकीचा असेल तर मग माझ्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे इतर भाग ही बरोबर असू शकत नाहीत.' या युक्तीवादावर आपला दावा योग्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यातूनही काही आपली चूक झाली असेल, तर आमरण उपोषणामध्ये माझा मृत्यू झाला तर ते त्याचे प्रायश्चित ठरेल असे भावनिक आवाहन त्या पत्रात केले होते. तसेच सदर पत्रे प्रसिध्द करण्याची विनंती ब्रिटिश सरकारला केली होती. ज्यातून भारतातील लोकमत प्रभावीत करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. म. गांधीजींनी पाठविलेल्या या पत्राला ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी ८ सप्टेंबर, १९३२ ला उत्तर पाठवले. यात पत्रात त्यांनी म. गांधीजींनी मांडलेल्या भूमिकेचा

उहापोह केला. म. गांधीजींचे पत्र वाचून आपण खूप आश्चर्यचकित व दु:खी झाल्याचे ते म्हणतात. दलित वर्गास हिंदू समाजापासून वेगळे करण्याच्या विचाराला आपण विरोध केला आहे. तो गोलमेज परिषदेत अल्पसंख्यांक समितीमध्ये स्पष्ट झाला होता. पंतप्रधान पुढे म्हणतात, म. गांधीजींनी तुमच्यासोबत एका मोठ्या हिंदू समाजाचे विचार आहेत, म्हणूनच आम्ही दलितांच्या प्रश्नावर खूप गंभीरपणे विचार केला आहे.

दलित समाजाच्या संस्थांकडून आलेले दावे आणि सामाजिक वाईट प्रथा-परंपरा ज्यामध्ये दलित काम करतात, ज्याला तुम्हीही मान्यता दिली आहे. या सर्वांचा विचार केल्यानंतर आम्ही आमचे कर्तव्ये समजतो की, विधानसभांमध्ये दलित वर्गाच्या प्रतिनिधित्वाच्या हक्कांच्या संरक्षणाची व्यवस्था केली पाहीजे. तसेच ११ मार्चच्या पत्रानुसार आपणही दलितांच्या विधानसभांमधील प्रतिनिधित्वाच्या विरोधी नाही हे स्पष्ट होते. ब्रिटिश सरकारच्या योजनेनुसार दलित समाज, हिंदू समाजाचा घटक बनून राहिल. दलित सामान्य मतदारसंघात समानतेचे मतदान करतील ही व्यवस्था प्रथम वीस वर्षासाठी राहील. विशेष मतदार संघातील दलितांना सामान्य मतदार संघात मतदान करण्यापासून वंचित केले जाणार नाही. तर दलित वर्गाला दोन मते देण्याचा अधिकार असेल. (१) स्वतंत्र मतदारसंघातील उमेदवारासाठी आणि (२) सर्वसाधारण मतदारसंघातील उमेदवारासाठी मतदान करता येईल. दलित वर्गीय मतदारास दोन मते देण्याचा अधिकार दिल्याने हिंदू समाजातील दलितांचे सदस्यत्व अबाधित राहिल.

जातीय मतदारसंघ निर्माण करण्याचे हेतुपुरस्सर टाळून दलित मतदारांचा हिंदू किंवा सर्वसाधारण मतदारसंघात समावेश केला आहे. त्यामुळे उच्च जातीच्या उमेदवाराला दलितांची मते मिळवावी लागतील. अशा प्रकारे हिंदू समाजाची एकता राखण्याचा विचार केला आहे. उच्चवर्णीय हिंदूनी शतकानुशतके जाणूनबुजून हेतुपूर्वक दलित वर्गाला पायदळी तुडविले आहे. त्या दलित वर्गाला नऊपैकी सात प्रांतात निश्चित संख्येत विधान मंडळात त्यांनीच निवडलेले प्रतिनिधित्व मिळावे असे सर सॅम्युअल होअर यांना पाठविलेल्या पत्रात म. गांधीनी म्हटले होते. त्याचा संदर्भ देऊन ब्रिटिश पंतप्रधान म्हणतात की, दलितांनीच दलितांच्या विषयी बोलावे या स्थितीत त्यांना आणण्यासाठी स्वतंत्र प्रतिनिधित्व गरजेचे आहे. हे कोणत्याही विवेकशील माणसाला सहज पटण्यासारखे आहे. वर्तमान परिस्थितीत आरक्षणाच्याद्वारे निवडणूक पध्दती व मतदानाची कोणतीही पध्दती स्वीकारली तरी निवडून येणारा प्रतिनिधी दलितांचे खरेखुरे प्रतिनिधित्व करेल व दलितांच्या प्रति उत्तरदायी राहिल असे ब्रिटिश शासनास वाटत नाही. कारण सर्वच परिस्थितीत निवडून आलेला उमेदवार उच्च जातीय हिंदूच्या माताधिक्यामुळे निवडून आलेला असेल त्यामुळे अस्पेश्यांना खरेखुरे प्रतिनिधित्व द्यावयाचे असेल तर स्वतंत्र मतदारसंघाचीच आवश्यकता ब्रिटिश पंतप्रधानांनी प्रतिपादन केली होती.

मुसलमानांच्या पेक्षा वेगळी तरतूद दलितांच्यासाठी करण्यात आली होती, कारण मुसलमान

बहुसंख्य असलेल्या प्रांतात त्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा जास्त जागा प्राप्त झाल्या होत्या. त्यामुळे मुसलमान सामान्य निवडणूक मतदारसंघात मतदान करू शकत नाही आणि उमेदवार म्हणून उभेही राहू शकत नाही. पण पात्र दलित वर्गीय मतदार सामान्य निवडणूक मतदारसंघात मतदान करू शकतो आणि उमेदवार म्हणून उभाही राहू शकतो. या तत्त्वानुसार दलित वर्गासाठी स्वतंत्र निवडणूक मतदारसंघाची संख्या निश्चित केली, जी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेसे प्रतिनिधित्व नाही. तर विधानमंडळात फक्त दलितांनीच निवडलेले त्यांचे प्रतिनिधी स्थान ग्रहण करतील या सीमित हेतूने ही तरतूद केली आहे. यावेळी दलितांना दिलेले जातीय निवाड्यातील प्रतिनिधित्व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात फार कमी आहे असे ब्रिटिश पंतप्रधानानी स्पष्ट केले होते.

अंतिमत: ब्रिटिश पंतप्रधान म्हणतात की, सर्व भारतीय समुदाय एकत्रित येवून अल्पसंख्यांच्या किंवा जातीयतेच्या प्रश्नावर सर्वमान्य समझोता निर्माण करण्यात अपयशी झाला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने अल्पसंख्यांकांच्या प्रश्नावर निर्णय दिला आहे. ब्रिटिश सरकारने प्रसिध्द केलेला जातीय निवाडा ज्या अटींवर आधारित आहे. त्या अटींप्रमाणे जातीय निवाड्यात कोणताही बदल होण्याची अपेक्षा नाही. यादृष्टीने ब्रिटिश सरकार आपल्या निर्णयावर ठाम आहे. पण जी निवडणूक व्यवस्था शासनाने परस्पर विरोधी मागण्यांच्या गुणवत्तेवर सारासार विचार करून तयार केली होती. त्यातील संबंधित समुदाय परस्पर सहमतीने निवडणूक व्यवस्थेसंबंधी अन्य कोणता पर्याय सुचवित असतील तर तसे फेरबदल जातीय निवाड्यात केले जाऊ शकतील.

अशा प्रकारे म. गांधीजींच्या पत्राला ब्रिटिश पंतप्रधानांनी सविस्तर व वस्तुस्थितीचे विश्लेषण करणारे उत्तर दिले व शेवटी आमरण उपोषणाच्या घेतलेल्या निर्णयावर म. गांधीनी गांभीर्याने विचार करावा असे म्हटले. पंतप्रधानांनी म. गांधीजींचे म्हणणे मान्य करण्यास नकार दिला. त्यामुळे लगेचच ९ सप्टेंबर, १९३२ रोजी म. गांधीजींनी पंतप्रधानांना दुसरे पत्र पाठवले. त्यामध्ये म. गांधीजी म्हणतात, मी आमरण उपोषणाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या/दलितांच्या हिताचा बळी देण्याचा विचार करतो असा आरोप तुम्ही माझ्यावर केला आहे तो योग्य नाही. दलितांना मिळालेला दुहेरी मतदानाचा अधिकार दलितांना किंवा हिंदू समाजाला विभाजनापासून वाचवू शकत नाही. पददलितांच्या विभक्त किंवा स्वतंत्र मतदारसंघाच्या स्थापनेमागे जाणीवपूर्वक हिंदू धर्म नष्ट व्हावा असे विष पेरण्याचा हा प्रयत्न आहे असे मला वाटते. यामुळे दलितांचे काहीही भले होणार नाही असे स्पष्टीकरण करून, ब्रिटिश सरकारने दलितांना कितीही सहानुभूती दाखवली तरी त्यांच्या धार्मिक प्रश्नाबाबत योग्य निर्णय ते घेऊ शकणार नाहीत असे प्रतिपादन म. गांधीजींनी केले.

म. गांधीजींनी केलेल्या पूर्वनिश्चियानुसार २० सप्टेंबर, १९३२ रोजी अस्पृश्यांना मिळालेल्या

स्वतंत्र मतदारसंघाच्या विरोधात त्यांनी आपले आमरण उपोषण सुरू केले. गोलमेज परिषदेत ज्या प्रश्नाला त्यांनी अत्यंत कमी महत्त्वाचे मानले होते, त्या जातीय निवाड्याच्या प्रश्नावर म. गांधीजींनी आपले प्राण पणाला लावावे हे समजणे माझ्या बुध्दीपलीकडे आहे असे डॉ. आंबेडकरांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले. पुढे डॉ. आंबेडकर म्हणतात, स्वत:च्या प्राणाची आहुती देण्यासाठी म. गांधीजींनी जातीय निवाड्यातील दलित वर्गाला मिळालेले विशेष प्रतिनिधित्व हाच एकमेव विषय वेगळा काढून निवडावा याचे मला आश्चर्य वाटते. स्वतंत्र मतदारसंघ फक्त दलित वर्गालाच बहाल करण्यात आले नव्हते तर ही तरतूद भारतीय ख्रिश्चन, अँग्लोइंडियन, मुसलमान, शीख या सर्व समुदायाकरिता स्वीकारण्यात आली होती. पण गांधीजींनी मुसलमान व शीख सोडून बाकी सर्व वर्गाच्या विशेष प्रतिनिधित्वाला विरोध केला. त्यात ही नंतर इतर समुदायांना बहाल करण्यात आलेल्या स्वतंत्र मतदारसंघाच्या अधिकाराला त्यांनी आपली संमत्ती दिली. पण दलित वर्गाला मात्र त्यांनी अपवाद मानले. दलितांच्या या स्वतंत्र मतदारसंघाच्या अधिकाराला म. गांधीजींचा विरोध कायम राहिला.

या विरोधासाठीच म. गांधीजींनी आमरण उपोषण सुरू केले. या आमरण उपोषणातून म. गांधीजींना जिवंत ठेवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे जातीय निवाड्यात बदल करणे हाच होता. ब्रिटिश पंतप्रधानांनी स्पष्ट केल्याप्रमाणे, ब्रिटिश संसद स्वत:हून हा जातीय निवाडा बदलणार नाही किंवा मागेही घेणार नाही. पण सवर्ण हिंदू आणि अस्पृश्य या दोघांनाही मान्य असणारा समझोता पुढे आल्यास, या जातीय निवाड्याला पर्याय म्हणून तो समझोता स्वीकारण्यास ब्रिटिश शासन तयार होते. गोलमेज परिषदेत अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करण्याचा मान डॉ. आंबेडकरांना मिळालेला होता. त्यामुळे असे गृहीत धरण्यात आले की, जोपर्यंत अशा समझोत्याला एक पक्ष म्हणून डॉ. आंबेडकरांची मान्यता मिळणार नाही, तोपर्यंत त्या पर्यायाला अस्पृश्यांची मान्यता आहे असे मानले जाणार नाही. त्यामुळे आश्चर्याची बाब म्हणजे डॉ. आंबेडकर हे अस्पृश्यांचे नेते आहेत या वास्तवाला काँग्रेसजनांनी आव्हान तर दिले नाही पण हे वास्तव मात्र स्वीकारले. त्यामुळे समझोत्याच्या दृष्टीने सर्वांच्या नजरा डॉ. आंबेडकरांच्याकडे वळल्या. डॉ. आंबेडकर म्हणतात, मला दोन वेगवेगळ्या विकल्पापैकी एकाची निवड करायची होती. एका बाजूस माझ्यापुढे कर्तव्य होते ते म्हणजे मानवतेच्या दृष्टीने गांधीजींच्या प्राणांचे रक्षण करणे, तर दुसऱ्या बाजूस महत्प्रयासाने प्राप्त झालेल्या अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांच्या संरक्षणाची जबाबदारी होती. मी मानवतेच्या आवाहनाला प्रतिसाद दिला आणि म. गांधीजींचे समाधान होईल अशाप्रकारे जातीय निवाड्यात बदलाला संमती देऊन गांधीजींचे प्राण वाचवले.

या जातीय निवाड्यामध्ये ज्या कराराने बदल करण्यात आले तो करार पुणे करार म्हणून ओळखला जातो. सवर्ण हिंदू आणि अस्पृश्यांमध्ये झालेल्या पूणे कराराच्या तरतुदी पुढीलप्रमाणे :-

१) प्रांतीय विधानमंडळात दलित वर्गासाठी सर्वसाधारण मतदारसंघातील जागांपैकी खालीलप्रमाणे

राखीव जागांची तरतूद करण्यात यावी. मद्रास–३०, मुंबई आणि सिंध मिळून–१५, पंजाब–८, बिहार आणि ओरिसा–१८, मध्यप्रांत–२०, आसाम–७, बंगाल–३०, संयुक्त प्रांत–२०, एकूण १४८ ही जागांची संख्या पंतप्रधानांच्या निवाड्यात प्रांतिय विधानमंडळातील घोषित केलेल्या एकूण जागांच्या संख्येवर आधारित आहे.

२) या जागांकरिता संयुक्त मतदारसंघाच्या आधारावर निवडणूका होतील. दलित वर्गातील मतदार ज्या मतदार संघात समाविष्ट असतील तेथे प्रत्येक राखीव जागेकरिता दलित मतदार एक मत देऊन चार उमेदवारांच्या समूहाची निवड करतील. याला प्राथमिक निवडणूक असे संबोधले जाईल. ज्या चार उमेदरावांना दलितांची अधिक मते मिळतील ते उमेदवार सामान्य मतदाराद्वारे निवडणूकीसाठी उमेदवार म्हणून पात्र ठरतील.

३) परिच्छेद–२ मध्ये प्रांतीय विधानमंडळात दलितांच्या प्रतिनिधित्वासाठी जी प्राथमिक निर्वाचनाची पध्दती स्वीकारली आहे. तीच केंद्रीय विधानमंडळाच्या प्रतिनिधित्वासाठी स्वीकारली जाईल.

४) केंद्रीय विधानमंडळात ब्रिटिश हिंदुस्थानसाठी एकूण जेवढ्या जागा आहेत, त्यापैकी १८% जागा दलितांच्यासाठी राखीव ठेवल्या जातील.

५) केंद्रीय आणि प्रांतीय विधानमंडळात उमेदवारांच्या समूहाच्या प्राथमिक निवडणूकीची व्यवस्था खालील परिच्छेद–६ नुसार परस्पर सहमताने ही व्यवस्था अगोदर समाप्त करण्यात आली नाही तर प्रथम दहा वर्षानंतर ती समाप्त केली जाईल.

६) प्रांतीय आणि केंद्रीय विधानमंडळात दलितांना राखीव जागाच्या माध्यमातून प्रतिनिधित्वाची परिच्छेद १ व ४ नुसार निश्चित पध्दती ही कराराशी संबंधित प्रश्नांच्या सहमतीने जोपर्यंत समाप्त केली जाणार नाही तोपर्यंत सुरूच राहील.

७) दलितांना केंद्रीय आणि प्रांतीय विधानमंडळाच्या निवडणूकीसाठी मतदानाचा अधिकार हा लोशियन कमिटीच्या तरतूदीनुसार निश्चित केला जाईल.

८) दलित वर्गाच्या प्रतिनिधींना स्थानिक निवडणूका आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये अस्पृश्य असल्याने अयोग्य ठरवले जाऊ नये. दलितांना योग्य प्रतिनिधित्व मिळावे म्हणून आवश्यक ते सर्व प्रकारचे प्रयत्न केले जातील आणि सरकारी नोकऱ्यांसाठी ठरवून दिलेली शैक्षणिक पात्रता त्यांच्याकडे असल्यास त्यांची नेमणूक केली जाईल.

९) प्रत्येक प्रांताला जे शैक्षणिक अनुदान दिले जाते त्यापैकी एक निश्चित व योग्य रक्कम दलितांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी राखून ठेवली जाईल.

वरीलप्रमाणे पुणे करारामधील तरतुदी म. गांधी आणि डॉ. आंबेडकर यांनी स्वीकारल्या. २४ सप्टेंबर, १९३२ ला पुणे करारावर सह्या करण्यात आल्या. पुढे पुणे करार गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्टचा भाग म्हणून जातीय निवाड्याएवेजी समाविष्ट करण्यासाठी शासनाला सादर करण्यात आला. पुणे करारावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.

जातीय निवाड्यात पंतप्रधानांनी अस्पृश्यांना ७८ जागा दिल्या होत्या त्याऐवजी पुणे कराराने या अस्पृश्यांच्या जागेत वाढ करून १४८ जागा मिळाल्या. यावरून अस्पृश्यांना जातीय निवाड्याने जे दिले होते त्यापेक्षा पुणे कराराने अधिक दिले असे काही मंडळी म्हणू लागली. पण वास्तवतेचा विचार करता पुणे कराराने अनुसूचित जातींना त्यांच्या खऱ्या प्रतिनिधित्वापासून दूर नेले. कारण प्राथमिक निवडणूकीत ज्या उमेदवारांना अस्पृश्यांनी नाकारले तेच उमेदवार सवर्ण हिंदूच्या मताच्या आधारे अंतिम निवडणूकीत विजयी झाले. या गफलत करणाऱ्या निवडणूक पध्दतीमुळे डॉ. आंबेडकर दोनदा निवडणूकीत पराभूत झाले. पुणे करारातील तरतूदींची अंमलबजावणी व १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीतील काँग्रेसची भूमिका यामुळे डॉ. आंबेडकरांनी पुणे करार व संयुक्त मतदारसंघाचा धिक्कार केला. कारण पुणे करार दलितांच्या राजकीय हक्कांच्या संघर्षाचा मृत्यूलेख ठरला.

### ⁕ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ ⁕

❑ **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. जातीय निवाड्याने दलित वर्गीय मतदाराला किती मते देण्याचा अधिकार होता?

२. अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघाची संकल्पना ब्रिटिश पंतप्रधानांनी का प्रतिपादन केली?

३. जातीय निवाड्यामध्ये कोणत्या कराराने बदल करण्यात आला?

४. जातीय निवाड्यात अस्पृश्यांसाठी किती जागा दिल्या होत्या?

५. पुणे कराराने अस्पृश्यांसाठी किती जागा राखीव ठेवल्या?

## २.२.५ पुणे कराराचा आरक्षणाच्या राजकारणावरील परिणाम

पुणे कराराने आरक्षित जागांमध्ये वाढ केली. जातीय निवाड्याने अस्पृश्यांना फक्त ७८ राखीव जागा मिळाल्या होत्या. त्या पुणे कराराने १४८ राखीव जागा झाल्या. पण जातीय निवाड्याने अस्पृश्यांना अत्यंत महत्त्वाचे दोन लाभ दिले होते ते पुणे कराराने नष्ट झाले. जातीय निवाड्याने अस्पृश्यांना (१) विभक्त किंवा स्वतंत्र मतदारसंघाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या जागांचा निश्चित कोटा निवडला जाणार होता ज्याची पूर्तता अस्पृश्यांद्वारेच केली जाणार होती. २) अस्पृश्यांना दोन मतांचा अधिकार मिळाला होता. एकमत विभक्त मतदारसंघासाठी आणि दुसरे मत सर्वसाधारण मतदारसंघासाठी

उपयोगात आणता येणार होते. या तरतुदीमुळे अस्पृश्यांना आपले खरेखुरे प्रतिनिधी विधानमंडळात पाठविता येणार होते, कारण त्यांचे विभक्त मतदारसंघ तयार करून त्यातून अस्पृश्य उमेदवार उभे राहतील व त्यांना अस्पृश्य मतदारच फक्त मतदान करतील. त्यामुळे या विभक्त मतदारसंघातून निवडून गेलेले प्रतिनिधी अस्पृश्यांच्या व्यथा-वेदना सभागृहात व्यक्त करतील, अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात दाद मागतील व त्या अन्यायाचे परिमार्जन करतील अशी त्यांच्याकडून व्यापक अपेक्षा होती. विभक्त मतदारसंघातून निवडून गेलेला प्रतिनिधी हा फक्त अस्पृश्यांच्या मतदारांकडून निवडला जाणार असल्याने, त्यांच्याप्रती तो प्रामाणिक व निष्ठेने कार्य करील. त्यांचे खरेखुरे प्रतिबिंब सभागृहात उमटवेल अशी अपेक्षा होती. इतकी महत्त्वाची संधी जातीय निवाड्याने अस्पृश्यांना मिळणार होती.

तसेच सर्वसाधारण मतदारसंघात अस्पृश्यांच्या मतांचे प्रमाण एकूण मतांच्या संख्येच्या दहावा भाग होते. त्यामुळे सर्वसाधारण मतदारसंघाच्या निवडणूकीतही आपल्या मतांच्या अधिकारामुळे अस्पृश्य आपली स्थिती चांगली बनवू शकत होते. त्यामुळे सर्वसाधारण मतदारसंघात सवर्ण हिंदू अस्पृश्यांची उपेक्षा करण्यास धजले नसते किंवा अस्पृश्यांच्या मतांवर अवलंबून राहावे लागणार असल्याने अस्पृश्यांबरोबर सूड बुध्दीने वागले नसते. परिणामी अस्पृश्यांना राजकीय अवकाश योग्यरित्या उपलब्ध झाला असता. पुणे कराराने ह्या सर्व बाबी काढून घेतल्या व फक्त अधिक राखीव जागा दिल्या एवढेच झाले. आता निवडून येणारा प्रत्येक उमेदवार अस्पृश्यांप्रती आक्रमक झाला नाही तरी उदासीन मात्र निश्चित बनेल. ज्यामध्ये अस्पृश्यांचे नुकसानच आहे. जातीय निवाड्यातील दोन मतांचा अधिकार राहिला असता, तर अस्पृश्यांना जागा कमी मिळाल्या असत्या पण निवडून येणारा प्रत्येक उमेदवार हा अस्पृश्यांप्रती निष्ठावान व आस्थावान राहिला असता. विभक्त मतदारसंघ आणि दोन मतांचा अधिकार गमावल्याने झालेली हानी कशानीही भरून निघणारी नाही. अशाप्रकारे पुणे कराराने आरक्षित जागाच्यांमधून अस्पृश्यांचे योग्य व खरेखुरे प्रतिनिधित्व निवडून येण्याच्या प्रक्रियेला नेस्तनाबूत केले.

पुणे कराराप्रती हिंदूनीही उत्सव साजरा केला नाही. कारण तो त्यांना पूर्णांवशाने आवडला नाही असेच म्हणावे लागेल. म. गांधीजींचे प्राण वाचविण्याच्या अतिभावनाविवशतेत पुणे करारामध्ये दिलेली किंमत फारच जास्त आहे असा काँग्रेसमध्ये अंत:प्रवाह होता. पण काँग्रेसमधील कोणाचेही पुणे करारातील अटी नाकारण्याचे धाडस नव्हते. अशा प्रकारे हिंदूंना हा करार पसंत नव्हता आणि अस्पृश्यांच्या हक्कांच्या विरोधी होता. तरी पुणे कराराला दोन्ही बाजूनी नाइलाजाने मान्यता दिली आणि हा करार गव्हर्नर ऑफ इंडिया ॲक्टमध्ये सामील केला गेला.

पुणेकरार घाईगडबडीने तयार करण्यात आल्यामुळे त्यात अनेक बाबी स्पष्ट करणे राहून गेले होते. करारावर स्वाक्षऱ्या झाल्यानतंर मतदारसंघाचे निश्चितीकरण करण्यासाठी हॅमण्ड कमिटी नेमण्यात आली.प्रत्येक मतदारसंघात जागांची संख्या निश्चित करणे आणि नवीन राज्यघटनेंतर्गत विधानमंडळाच्या निवडणूकीसाठी मतदान पध्दती निर्धारित करण्याची जबाबदारी या कमिटीची होती. साहजिकच या कमिटीला आपल्या

कार्यामध्ये पुणे कराराची दखल घ्यावी लागली. आणि अस्पृश्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी योजना तयार करावी लागली. त्यासाठी पुणे करारामध्ये राहून गेलेल्या महत्त्वपूर्ण बाबींवर हॅमण्ड कमिटीला निर्णय घ्यावा लागला. त्यातील पहिली बाब म्हणजे (१) प्राथमिक निवडणूकीत जो चार सदस्यांचा समूह निवडावयाचा आहे त्यामध्ये जास्तीत जास्त चौघांचे कि कमीत कमी चौघांचे आणि (२) अंतिम निवडणूकीसाठी मतदानाची पध्दती कोणती असावी. या बाबी निश्‍चित करताना दोन्ही बाजूंनी दावे-प्रतिदावे झाले.

प्राथमिक निवडणूकीत चार सदस्यांचे पॅनेल यांचा अर्थ हिंदूच्या बाजूने कमीत-कमी चार सदस्यांचे असावे असा काढला आणि संतोष व्यक्त करण्यात आला. कारण अस्पृश्यांमधून जर चार उमेदवार पुढे येत नसतील तर निवडणूकच होऊ शकणार नाही. मग अस्पृश्यांच्या आरक्षित जागा रिकाम्या राहतील आणि अस्पृश्यांना प्रतिनिधित्व मिळणार नाही किंवा त्यांना प्रतिनिधित्वाशिवाय राहावे लागेल. अस्पृश्यांच्या बाजूने डॉ. आंबेडकरांना याची व्याख्या करण्यासाठी बोलाविण्यात आले. या वादग्रस्त मुद्यावर डॉ. आंबेडकर म्हणाले, चार म्हणजे चारपेक्षा अधिक नाही असा त्याचा अर्थ आहे. त्यामुळे चारपेक्षा कमी किंवा एक जरी उमेदवार निवडणूक रिंगणात उतरला, तरी निवडणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आणि अस्पृश्यांना आपले प्राथमिक निवडणूकीत प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार मिळाला. परिणामी अस्पृश्यांचे प्रतिनिधी विधानमंडळात जाण्याची आशा पल्लवीत झाली.

दुसरा सिध्दांत म्हणजे मतदानाची पध्दती कोणती असावी? या विषयी संघर्ष होता. या प्रश्नावर सवर्ण हिंदूची भूमिका अशी होती की, मताचे अनिवार्य वितरण ही पध्दती अधिक योग्य आहे. तर अस्पृश्यांच्यावतीने डॉ. आंबेडकरांनी एकत्रित मतदान पध्दती अधिक योग्य असून तीच स्वीकारली जावी असे मत मांडले. हॅमण्ड कमिटीने डॉ. आंबेडकरांची भूमिका स्वीकारली.

सवर्ण हिंदूनी प्राथमिक निवडणूकीत उमेदवारांच्या समूहाची न्यूनतम संख्या चार असावी ही मागणी करण्याच्या पाठीमागे त्यांचा हेतू काय होता. याचे विश्लेषण करताना डॉ. आंबेडकर म्हणतात, प्राथमिक निवडणूकीत एकच उमेदवार उभा राहिला तर तो अस्पृश्यांप्रती प्रामाणिक असेल. पण पेक्षा जास्त उमेदवार उभे राहिल्यास सवर्ण हिंदूना हवा असणारा व अस्पृश्यांप्रती कमी निष्ठावान असणारा उमेदवार निवडणे सोयीचे व्हावे यासाठीच त्यांनी हॅमण्ड कमिटीसमोर उमेदवार समूहात उमेदवारांची संख्या किमान चार असावी असा त्याचा अर्थ काढला व तसाच आग्रह हॅमण्ड कमिटीसमोर धरला. म्हणजे या प्रतिनिधित्वाच्या पध्दतीमध्येच आपल्याला सोयीची असणारी भूमिका सवर्ण हिंदू घेताना दिसत होते.

मतदान पध्दतीच्याबाबत मत विभाजनाची पध्दती स्वीकारून अस्पृश्यांच्या उमेदवाराच्या निवडणूकीत हिंदू मताधिक्यामुळे तो उमेदवार निवडून येण्याची शक्यता अधिक होती. म्हणून हिंदूनी एकत्रित मतदान पध्दतीच्या तुलनेत विभाजनाच्या मतदान पध्दतीला प्राधान्य दिले होते. ज्यामुळे सवर्ण हिंदूद्वारा पुरस्कृत अस्पृश्य उमेदवाराची निवड नक्की व निश्‍चित व्हावी असा युक्तीवाद होता.

सवर्ण हिंदूच्याद्वारे केलेल्या डाव-प्रतिडावामुळे पुणे करार हा अस्पृश्यांच्या राजकीय आरक्षणावर केलेला प्रथम आघात होय असे म्हणण्याशिवाय दुसरा पर्याय शिल्लक नाही असे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे होते. हिंदूनाही पुणे करार आवडला नव्हता त्यामुळे जेव्हा संधी मिळेल तेव्हा अस्पृश्यांवर ते आघात करत होते. हॅमण्ड कमिटीसमोर त्यांनी जे दोन दृष्टीकोन ठेवले ते त्यांच्या अस्पृश्यांविरुध्दच्या कटकारस्थानाचे उत्कृष्ट पुरावे होते असे डॉ. आंबेडकरांचे मत होते. या कटकारस्थानाचा उद्देश असा होता की, पुणे करार रद्द करता येणे शक्य नाही. तर पुणे कराराने अस्पृश्यांना दिलेले लाभ त्यांना मिळणार नाहीत अशी व्यवस्था निर्माण करा.

अस्पृश्यांच्या प्रतिनिधीच्या निवडणूकीत त्यांना आरक्षित असलेल्या मतदारसंघात काँग्रेस हस्तक्षेप करणार नाही, असा काही अस्पृश्य नेत्यांचा भ्रम होता. उदा. एम.सी.राजा. त्यामुळे ती मंडळी पुणे कराराच्यावेळी काँग्रेसच्या बाजूने उभी राहिली होती. पण १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीतच या भ्रमाचा भोपळा फुटला. अस्पृश्यांसाठी राखीव जागांच्या निवडणूकीत काँग्रेसने हस्तक्षेप केला. आपले अस्पृश्य उमेदवार उभे केले. यामागे काँग्रेसचा पहिला उद्देश म्हणजे अस्पृश्यांच्या राखीव जागांवर काँग्रेसला कब्जा पाहिजे होता. कारण सरकार बनविण्यासाठी बहुमत हवे होते व दुसरा उद्देश म्हणजे काँग्रेसने दिलेले अस्पृश्य उमेदवार निवडून आल्यास, काँग्रेसच अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व करते आणि अस्पृश्यांचा काँग्रेसवरच विश्वास आहे हा म. गांधीजींचा दावा खरा ठरवायचा. म्हणून काँग्रेसने सर्व ताकदीनिशी अस्पृश्य प्रतिनिधीच्या निवडणूकीत सहभाग घेतला. अस्पृश्यांच्या राखीव जागांवर जे अस्पृश्य काँग्रेसच्या कार्यक्रमाशी एकनिष्ठ होते, अशांना काँग्रेसच्या तिकीटावर उमेदवारी दिली. या सर्व घडामोडीत अस्पृश्यांचे खरेखुरे प्रतिनिधित्व विधानमंडळामध्ये जाण्यापासून रोखण्यात काँग्रेस यशस्वी झाली.

१९३५ च्या कायद्यानुसार बिहार व ओरिसातील जागांच्या पुनर्वितरणासह अस्पृश्यांना १५१ जागा आरक्षित मिळाल्या होत्या. त्यापैकी काँग्रेसने ७८ जागा जिंकल्या व फक्त ७३ जागा अस्पृश्यांच्या खऱ्या आणि स्वतंत्र प्रतिनिधींच्या वाट्याला आल्या. त्यामुळे जातीय निवाड्याने जी परिस्थिती अस्पृश्यांच्या वाट्याला आली असती, त्यापेक्षा वाईट परिस्थिती पुणे कराराने अस्पृश्चांच्या वाट्याला आणली. परिणामकारक प्रतिनिधित्वाच्या संदर्भात जातीय निवाड्याने जेवढे प्रतिनिधित्व बहाल केले होते, त्याहीपेक्षा कमी जागा पुणे कराराने अस्पृश्यांच्या वाट्याला आल्या होत्या. याउलट काँग्रेसला मोठा फायदा झाला. कारण पुणे कराराने अस्पृश्यांना १५१ जागा दिल्या असल्या तरी त्यातील ७८ जागा काँग्रेसने परत मिळविल्या व राजकीय व्यापारात भरपूर नफा कमविला होता.

१९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर काँग्रेसने अस्पृश्यांवर दुसरा मोठा आघात केला. तो म्हणजे काँग्रेसने अस्पृश्यांना मंत्रिमंडळात कोणतेही स्थान दिले नाही. पुणे करारानुसार काँग्रेस मंत्रिमंडळात

अस्पृश्यांना प्रतिनिधित्व देण्यास वचनबध्द होती. पण अस्पृश्यांना मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व नाकारण्यासाठी पुढे केलेल्या कारणांपैकी एक म्हणजे मंत्रिमंडळ हे पक्षाचे असते व मंत्रिमंडळाने सामूहिक जबाबदारीचे तत्त्व स्वीकारावे असे वाटत असल्यास अल्पसंख्यांकांनी किंवा अस्पृश्यांनी काँग्रेसमध्ये यावे. ते काँग्रेसमध्ये आले तर त्यांना मंत्रीमंडळात प्रतिनिधित्व देवू. पण प्रत्यक्षात काँग्रेसच्या तिकिटावर अस्पृश्यांचे ७८ प्रतिनिधी विधानमंडळात निवडून आले होते. ज्यांची काँग्रेसच्या ध्येयधोरणावर निष्ठा होती. तरीही त्यांचा मंत्रीमंडळात समावेश केला नाही. त्यामुळे या सर्वाचा एकच अर्थ होता की, मंत्रिमंडळात अस्पृश्यांचे प्रतिनिधित्व नाकारण्याचेच काँग्रेसचे धोरण होते व या धोरणाला म. गांधीजींचा आशीर्वाद होता असे डॉ. आंबेडकरांचे म्हणणे होते. त्याचा पुरावा मध्यप्रांतातील काँग्रेसच्या मंत्रिमंडळाचे प्रधानमंत्री डॉ. खरे होते. मंत्रिमंडळातील अंतर्गत कलहामुळे त्यांनी मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला व काही बदल करून नवीन मंत्रिमंडळ बनविले. त्या नवीन मंत्रिमंडळात अस्पृश्य असलेले विधानमंडळाचे सभासद अग्निभोज यांचा समावेश केला. म्हणून २६ जुलै, १९३८ च्या काँग्रेस कार्यकारिणीच्या वर्धा बैठकीत डॉ. खरे यांचा निषेध करणारा ठराव संमत करण्यात आला. डॉ. खरे यांच्यावर त्यासाठी शिस्तभंगाची कारवाई करावी असे म्हटले. म्हणजेच डॉ. खरेनी अस्पृश्याला मंत्रिमंडळात घेण्याची जी कृती केली होती, ती कृती म्हणजे शिस्तभंग आहे असे म. गांधीजींचे मत होते असे डॉ. खरेनी जाहीरपणे स्पष्ट केले होते.

अस्पृश्यांना फक्त विधानमंडळात प्रतिनिधित्वाचा अधिकार असावा असे नाही, तर त्यांना मंत्रिमंडळातही प्रतिनिधित्व मिळण्याचा अधिकार असावा अशी डॉ. आंबेडकर गोलमेज परिषदेत मागणी करीत होते. कारण अस्पृश्यांची वाईट स्थिती कायदे वाईट आहेत म्हणून नाही तर ती प्रशासनाच्या आक्रमक दृष्टीकोनामुळे वाईट आहे. त्यासाठी सार्वजनिक सेवा अस्पृश्यांप्रती कमी वाईट व अधिक उत्तरदायी बनविण्याचा एकमेव मार्ग म्हणजे सार्वजनिक सेवांच्या उच्च पातळीवर प्रशासनात अस्पृश्यांनाही स्थान असावे. यासाठी १९३५ च्या कायद्यात अशी तरतूद करण्यात आली की, गव्हर्नरने आपल्या मंत्रीमंडळाची नियुक्ती करताना बहुमताचा विश्वास संपादन केलेल्या व्यक्तीच्या सल्ल्यानुसार अशा व्यक्तींना मंत्री म्हणून निवडावे की जे सामूहिकरित्या विधानमंडळाच्या विश्वासास पात्र ठरतील असे करताना शक्यतो महत्त्वाच्या अल्पसंख्यांक समुदायांना त्यात प्रतिनिधित्व मिळेल हे पाहण्याचे उत्तरदायित्व गव्हर्नर महोदयाचे असेल, असे प्रावधान समाविष्ट केले होते.

कायद्याने गव्हर्नरला दिलेले हे अधिकार काँग्रेसला नको होते. म्हणून त्यांनी १९३५ च्या कायद्यातील राज्यघटना नाकारण्याची धमकी दिली. या संघर्षात ब्रिटिश सरकार आणि काँग्रेस हायकमांड यांच्यात वाटाघाटी झाल्या. या वाटाघाटीत गव्हर्नरला देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर ते प्रांतिय शासनाच्या दैनंदिन कारभारात हस्तक्षेपासाठी करणार नाहीत असा लेखी प्रलेख ब्रिटिश शासनाकडून काँग्रेसने घेतला व या प्रलेखाची व्याप्ती गव्हर्नरच्या मंत्रीमंडळात अल्पसंख्यांक प्रतिनिधी समाविष्ट केला

जातो की नाही हे पाहण्याचा अधिकार गव्हर्नरनी वापरू नये इतकी वाढवली. त्याचा परिणाम म्हणून अस्पृश्य व अन्य अल्पसंख्यांकांना मंत्रीमंडळातील प्रतिनिधित्वापासून काँग्रेसने बाजूला ठेवले.

तसेच काँग्रेसने काँग्रेसमध्ये असणाऱ्या अस्पृश्यांवर कठोर पक्षीय शिस्तीचे बंधन घातले. हे अस्पृश्य सदस्य काँग्रेस पक्षाच्या कार्यकारिणीच्या नियंत्रणात होते. कार्यकारिणीला न आवडणारे प्रश्न सुध्दा ते विचारू शकत नव्हते. इतकेच काय आपल्या मर्जीप्रमाणे ते मतही देऊ शकत नव्हते. त्यांना योग्य वाटेल ते बोलताही येत नव्हते. इतकी अस्पृश्य काँग्रेस प्रतिनिधींची अवस्था काँग्रेसने बिकट केली होती.

सद्यकालीन राजकारणातही आरक्षित जागांवर निवडून येणाऱ्या अस्पृश्य प्रतिनिधीची अवस्था यापेक्षा वेगळी नाही. कोणत्याही राजकीय पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेला अस्पृश्य प्रतिनिधी हा त्या-त्या राजकीय पक्षाचीच भाषा बोलतो, त्यांच्या कार्यक्रमाशीच प्रामाणिक असतो, पक्ष सांगेल तसेच प्रस्ताव मांडतो, पक्ष सांगेल त्यालाच मत देतो व पक्ष सांगेल त्या पध्दतीनेच बोलतो. परिणामी अस्पृश्यांना राजकीय आरक्षण देण्यापाठीमागचा मुख्य हेतू त्यांनी विधानमंडळाच्या सभागृहाचा वापर करून अस्पृश्यांच्या व्यथा-वेदना व्यक्त कराव्यात, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात दाद त्यांनी मागावी व अस्पृश्यावरील अन्यायाचे-अत्याचाराचे परिमार्जन करावे. अस्पृश्यांचे दु:ख नष्ट करून, त्यांचा विकास साधणाऱ्या उपाययोजना मांडाव्यात. त्या विधानमंडळात पास करून घेऊन तसे कायदे तयार करावेत अशी खऱ्या अस्पृश्य प्रतिनिधींकडून अपेक्षा होती.

पण पुणे करारामुळे बहुसंख्य हिंदूच्या मतावर निवडून यावे लागत असल्यामुळे अस्पृश्य प्रतिनिधी मते मिळविण्यासाठी व पक्षीय निष्ठेच्या ओझ्याखाली अस्पृश्यांच्या खऱ्या प्रश्नापासून दूर गेलेले दिसतात. १९३७ च्या निवडणूकीच्या विश्लेषणानंतर डॉ. आंबेडकरांनी पुणे कराराचा व त्यातून आलेल्या संयुक्त मतदार संघाचा धिक्कार केला होता. कारण संयुक्त मतदार संघातून अस्पृश्यांचे खरेखुरे प्रतिनिधी निवडून येत नाहीत. तर प्रस्थापित राजकीय पक्षांनी तयार केलेले त्यांच्या विचारांचे अस्पृश्य निवडून येतात. भारतीय राजकारणातील या अस्पृश्य प्रतिनिधींच्या स्थितीची अलोचना मा. कांशीरामजी यांनी 'चमचा युग' अशी केली आहे. हे अस्पृश्य प्रतिनिधी आपल्या समुदायाशी निष्ठावान व प्रामाणिक न राहता ज्या प्रस्थापित राजकीय पक्षाने तिकिट दिले. त्यांच्याशी प्रामाणिक राहण्यात व त्यांच्याशी निष्ठा बाळगण्यात स्वत:ला अन्य मानतात. ही चमचा युगाची सुरूवात पुणे करारातील संयुक्त मतदार संघामुळे झाली. या चमचा युगाचा शेवट करण्याचा मार्ग मात्र सापडत नाही. दलित नेतृत्व खऱ्या प्रतिनिधित्वासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करण्याच्या तयारीत नाही. तर दुसऱ्या बाजूला आरक्षण सोडून देऊन राजकारणाच्या मैदानात उतरल्यास विजय मिळेल याची खात्री नाही. कारण अजून तशी समताधिष्ठीत सामाजिक मानसिकता तयार झालेली नाही. त्यामुळे दोलायमान स्थितीतील दलितांच्या राजकारणाने त्यांचे स्वतंत्र अस्तित्व राजकारणात दिसत नाही.

## ✲ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-४ ✲

❑ **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.**

१. पुणे करारानंतर मतदारसंघाचे निश्चितीकरण करण्यासाठी कोणती कमिटी नेमली होती?

२. पुणे कराराच्या अंमलबजावणीबाबत सवर्ण हिंदू डाव-प्रतिडाव का करीत होते?

३. १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेसने अस्पृश्यांच्या आरक्षित जागांपैकी किती जागा जिंकल्या?

४. १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर काँग्रेसने अस्पृश्यांवर दुसरा कोणता मोठा आघात केला?

५. खऱ्या अस्पृश्य प्रतिनिधीकडून कोणती अपेक्षा होती?

# २.३ सारांश

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात डॉ. आंबेडकर भारतातील वेगवेगळ्या अल्पसंख्यांक समुदायाच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी आरक्षणाची मागणी करीत होते. त्यामुळे मतदानाचा अधिकार व्यापक पायावर मिळविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. गोलमेज परिषदेमध्ये अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. आंबेडकर सहभागी झाले. या परिषदेत भारताच्या भावी राज्यघटनेमध्ये अस्पृश्यांसाठी कोणत्या राजनैतिक अधिकारांची तरतूद करावी याचा आराखडा डॉ. आंबेडकरांनी गोलमेज परिषदेसमोर ठेवला होता.

पण गोलमेज परिषदेतील अल्पसंख्याक समिती भारतातील सर्व अल्पसंख्यांक समुदायाचे समाधान करेल असा तोडगा किंवा समझोता तयार करू शकली नाही. याला म. गांधीजींची भूमिकाही कारणीभूत असल्याचे दिसून येते. पण गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनानंतर ब्रिटिश पंतप्रधानांनी १७ ऑगस्ट, १९३२ रोजी 'जातीय निवाडा' प्रसिध्द केला. जो भारतातील जातीयतेच्या समस्येवरील उपाय होता. ज्यामध्ये अस्पृश्यांना विभक्त मतदारसंघाची तरतूत करून, त्यांचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करण्यात आले होते. ब्रिटिश पंतप्रधानांना दिलेल्या लेखी संमतीनुसार हा जातीय निवाडा स्वीकारणे भारतातील सर्व प्रतिनिधींवर बंधनकारक होते.

पण जातीय निवाडा प्रसिध्द झाला आणि म. गांधीजींनी त्याला विरोध करण्यासाठी आमरण उपोषणाचे अस्त्र उपसले. या जातीय निवाड्याने भारतातील सर्वच अल्पसंख्यांकांना विभक्त किंवा स्वतंत्र मतदारसंघ देण्यात आले होते. पण म. गांधीजींनी त्यातील फक्त अस्पृश्यांना मिळालेल्या स्वतंत्र मतदारसंघाच्या अधिकाराला विरोध केला. त्यासाठी त्यांनी आमरण उपोषण केले. त्यातून मार्ग

काढण्यासाठी पुणे करार करण्यात आला. पण पुणे कराराने अस्पृश्यांना खरे प्रतिनिधित्व बहाल करण्याएवेजी काँग्रेसच्या फायद्याची रचना अस्तित्वात आणली.

डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेले आरक्षणाच्या प्रक्रियेतील 'खरे व पुरेसे प्रतिनिधित्व' अस्पृश्यांच्या वाट्याला आलेच नाही. त्यामुळे पुणे कराराने अस्पृश्यांचे प्रश्न सोडविणारे, त्यांच्याशी निष्ठा असणारे प्रतिनिधी कायदेमंडळात प्रतिनिधी म्हणून निवडून आले नाहीत. तर ते कोणत्यातरी प्रस्थापित राजकीय पक्षाच्या विचारधारेचे पाईक बनून, अस्पृश्यांचे प्रतिनिधी म्हणून कायदेमंडळात बसले. त्यामुळे आरक्षणाचा मूळ हेतू सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हा सक्षमपणे समाजात तयार होत नाही असे दिसते.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **महत्तम** : जास्तीतजास्त.

२. **प्रतिकृती** : प्रतिबिंब.

३. **निर्बंध** : बंधने घालणे.

४. **अस्पृश्यता** : विशिष्ट लोकसमुदायाचा स्पर्श नाकारणारी प्रथा.

५. **आहुती** : आत्मसमर्पण.

६. **भ्रम** : कल्पना/काल्पनिक.

७. **निर्वाचन** : निवडणूक.

८. **विकल्प** : पर्याय.

९. **महत्प्रयास** : अतिशय कठिण परिस्थितीत प्रयत्न करून केलेले कार्य.

१०. **उपेक्षा** : वंचित ठेवणे.

११. **न्यूनतम** : कमीतकमी.

१२. **परिमार्जन** : नष्ट करणे.

१३. **तावडीतून** : विळख्यातून.

१४. **चमचा युग** : ज्यांचे प्रतिनिधित्व करतात त्यांच्याशी एकनिष्ठ न राहणाऱ्या प्रतिनिधींसाठी वापरलेली संज्ञा.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे

१. डॉ. आंबेडकरांच्या मते प्रतिनिधित्वाच्या निवडीवर उमेदवाराच्या जातीच्या सामाजिक दर्जाचा परिणाम होतो.

२. डॉ. आंबेडकरांच्या मते, स्वराज्य निर्माण करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीस मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे. तसेच निवडणूकीच्या पध्दतीने संख्येच्या व गरजेच्या प्रमाणात जातवार प्रतिनिधित्व दिले पाहिजे.

३. समानांना-समतेने व असमानांना-असतेने वागविणे म्हणजे समता प्रस्थापित करणे ही डॉ. आंबेडकरांच्या आरक्षण मागणीची सैध्दांतिक बैठक आहे.

४. अस्पृश्यांना हिंदू पासून वेगळे करून डॉ. आंबेडकरांना ब्राह्मण्यावर मारा करावयाचा होता. ब्राह्मण्य नष्ट करून त्यांना संपूर्ण देण्याची ब्राह्मण्याच्या तावडीतून सुटका करावयाची होती.

५. स्वराज्यात अल्पसंख्यांकांना सत्ता दिली नाही तर संपत्ती, शिक्षण व सामाजिक दर्जा प्राप्त असणाऱ्या सरंजामदारांच्या हाती सर्व सत्ता जाईल असे डॉ. आंबेडकरांचे मत होते.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे

१. १२ नोव्हेंबर, १९३० रोजी पहिली गोलमेज परिषद सुरू झाली.

२. गोलमेज परिषदेत (१) डॉ. बी. आर. आंबेडकर व (२) दिवाण बहादूर आर. श्री. निवासन हे अस्पृश्यांचे दोन प्रतिनिधी होते.

३. ब्रिटिश पंतप्रधानांनी जातीय निवाडा १७ ऑगस्ट, १९३२ रोजी प्रसिध्द केला.

४. म. गांधीजींनी काँग्रेस फक्त मुसलमान व शीख यांना जो समझोता मान्य असेल त्याचा स्वीकार करेल असे स्पष्ट केले.

५. म. गांधीजींनी सर सॅम्युल होअर यांना पाठविलेल्या ११ मार्च १९३२ च्या पत्रात अस्पृश्यांसाठी स्वतंत्र निवडणूकांचा स्वीकार केला तर त्याला विरोध करण्यासाठी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला होता.

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे

१. जातीय निवाड्याने दलित वर्गीय मतदाराला (१) स्वतंत्र मतदार संघातील उमेदवाराला व (२) सर्वसाधारण मतदारसंघातील उमेदावाराला अशी दोन मते देण्याचा अधिकार होता.

२. अस्पृश्यांना त्यांचे खरेखुरे प्रतिनिधित्व द्यावयाचे असेल तर स्वतंत्र मतदार संघाचीच आवश्यकता आहे यासाठी ब्रिटिश पंतप्रधानांनी स्वतंत्र मतदारसंघाची संकल्पना प्रतिपादन केली.

३. जातीय निवाड्यामध्ये पुणे कराराने बदल करण्यात आला.

४. जातीय निवाड्यात अस्पृश्यांसाठी ७८ जागा दिल्या होत्या.

५. पुणे कराराने अस्पृश्यांसाठी १४८ जागा राखीव ठेवल्या होत्या.

## ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे

१. पुणे करारानंतर मतदारसंघाचे निश्चितीकरण करण्यासाठी हॅमण्ड कमिटी नेमली होती.

२. पुणे करार रद्द करता येत नाही तर पुणे कराराने अस्पृश्यांना दिलेले लाभ त्यांना मिळणार नाहीत अशी व्यवस्था निर्माण करण्यासाठी सवर्ण हिंदू डाव-प्रतिडाव करीत होते.

३. १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेसने अस्पृश्यांच्यासाठी आरक्षित जागांपैकी ७८ जागा जिंकल्या.

४. १९३७ च्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर काँग्रेसने अस्पृश्यांवर दुसरा मोठा आघात केला तो म्हणजे अस्पृश्यांना मंत्रिमंडळामध्ये कोणतेही स्थान दिले नाही. त्यांचे प्रतिनिधित्व नाकारले गेले.

५. विधानमंडळाच्या सभागृहाचा वापर करून अस्पृश्यांच्या व्यथा-वेदना व्यक्त करणे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात दाद मागणे व त्याचे परिमार्जनकरणे, अस्पृश्यांचे दुःख नष्ट करून, त्यांच्या विकास साधणाऱ्या योजना तयार करणे, योजना विधानमंडळात पास करून त्यांचे कायद्यात रूपांतर करणे, अस्पृश्यांप्रती निष्ठा व प्रामाणिकपणा बाळगणे ह्या खऱ्या अस्पृश्य प्रतिनिधीकडून अपेक्षा होती.

# २.६ सरावासाठी स्वाध्याय

१. आरक्षणसंबंधीचा डॉ. बी. आर. आंबेडकर यांचा दृष्टीकोन स्पष्ट करा.

२. जातीय निवाडा आणि म. गांधीजींची भूमिका याची चिकित्सा करा.

३. पुणे कराराचा आरक्षणाच्या राजकारणावरील परिणाम विशद करा.

४. गोलमेज परिषदेतील अस्पृश्यांच्या अधिकारांबाबतची म. गांधीजींची भूमिका स्पष्ट करा.

५. गोलमेज परिषदेत अस्पृश्यांच्या राजनैतिक अधिकाराबाबत डॉ. आंबेडकर यांनी मांडलेल्या तरतूदी विशद करा.

## २.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. भीमराव रामजी आंबेडकर** : काँग्रेस व गांधीजी यांनी अस्पृश्यांप्रति काय केले?

२. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर** : पुणे करार.

३. **ॲड. बी. सी. कांबळे** : समग्र आंबेडकर चरित्र : खंड-९.

४. **संपादन : शंकरराव खरात** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रे.

५. **प्रदीप गायकवाड (संपादक)** : आरक्षण-डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे व लेख.

६. **डॉ. कृष्णा किरवले** : आरक्षणतत्त्व वास्तव आणि विपर्यास.

७. **प्रा. डॉ. शेषराज गजभिये** : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राजकीय तत्त्वज्ञान.


❍❍❍

सत्र–४ : घटक–३

# भारतीय संविधान आणि आरक्षण
# (Indian Constitution and Reservation)

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ संविधानाचे चर्चा विश्‍व आणि आरक्षण

३.२.२ आरक्षणाच्या घटनात्मक तरतुदी

३.२.३ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीबाबत आरक्षणाचे धोरण

३.२.४ पहिली घटनादुरुस्ती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांना आरक्षण

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्‍न

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्ट्ये

भारतीय संविधान आणि आरक्षण या अभ्यास घटकाच्या अध्ययनाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. भारतीय संविधानातील आरक्षणाच्या तरतुदींचा अभ्यास करणे.

२. भारतीय संविधान निर्मितीवेळी आरक्षणाबाबत घटना परिषदेत झालेली चर्चा समजावून घेणे.

३. भारतीय संविधानातील अनुसूचित जाती व अनुसूचीत जमातीना दिलेले आरक्षण समजावून घेणे.

४. पहिली घटना दुरुस्ती व आरक्षणाच्या तरतूदी जाणून घेणे.

५. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीयांना भारतीय राज्य घटनेपुढे आरक्षणासंबंधी माहिती देणे.

## ३.१ प्रास्ताविक

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नवे संविधान अस्तित्वात आले. लोकशाही व्यवस्था स्वीकारल्यामुळे राजकीय व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीस कायद्याने समान लेखले आहे. कायद्याच्यादृष्टीने जरी सर्व व्यक्ती समान मानल्या असल्या तरी व्यवहारात मात्र असमानता आढळते. सामाजिक परंपरा व अन्य ऐतिहासिक कारणांमुळे समाजात नागरिकांचे काही वर्ग पराकोटीचे मागासलेले असून विकास व प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची कोणतीही संधी त्यांच्यासमोर उपलब्ध नाही. संविधानाचे उद्दिष्टच मुळात समता प्रस्थापित करण्याचे असल्यामुळे समाजात असलेली विषमता नष्ट करून समतेवर आधारलेला समाज निर्माण करण्यासाठी आरक्षणाची तरतूद त्यात करण्यात आलेली आहे.

भारतीय समाजात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, स्त्री-पुरुष व प्रादेशिक अशा स्वरूपात विषमता आहेत. समाजातील विषमता नष्ट व्हावी आणि समता प्रस्थापित व्हावी, हे ध्येय भारतीय संविधानाने स्वीकारलेले आहे. समाजात नागरिकांचे काही वर्ग पराकोटीचे मागासलेले असून विकास व प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्याची कोणतीही संधी त्यांच्यासमोर उपलब्ध नाही. हे लक्षात घेऊन भारतीय संविधानात मागासलेल्या नागरिकांसाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आलेली आहे. आरक्षण हा विषमता नाहीसा करण्याच्या अनेक मार्गापैकी एक मार्ग आहे. जे मागासलेले आहेत त्यांना विशेष सोयी, सवलती, संधी देऊन त्यांचा विकास घडवून आणण्याची जबाबदारी शासनावर आहे. हे शासनाचे कर्तव्य आहे, असा संविधानाचा उद्देश आहे.

भारतीय समाजातील जातीवर आधारित असलेली विषमता संपवून समाजात समता प्रस्थापित करण्याचे साधन म्हणून घटनाकारांनी आरक्षणाची तरतूद संविधानात केलेली आहे. आरक्षण समाजातील असमानता दूर करण्याच्या अनेक मार्गांपैकी एक महत्त्वाचा मार्ग आहे. स्वतंत्र भारतात मागासवर्गीय लोकांना कायदेमंडळ, प्रशासन आणि नोकरीमध्ये प्रतिनिधित्व मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. म्हणून लोकशाहीमध्ये दुर्बल, वंचित घटकांना, प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीने आरक्षण धोरण महत्त्वाचे आहे. आरक्षण धोरणामुळे समताधिष्ठीत समाजाची स्थापना करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू होईल आणि प्रस्थापित वर्गाच्या लोकांप्रमाणेच स्वत:चा विकास करणे शक्य होईल.

राजकीय स्वातंत्र्यास खरा अर्थ प्राप्त होण्यासाठी सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबी देखील बळकट असाव्या लागतात. असा विचार घटना समितीने केला असल्याने भारतीय घटनेमध्ये १५(४), १६(४), ४६, १६४, २४३, ३३५, ३४०, ३४१, ३४२ या अनुच्छेदानुसार दुर्बल असणाऱ्या घटकाचे

सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी व सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी आरक्षणाची तरतूद त्यामध्ये करण्यात आली आहे.

भारतातील लोकशाहीत 'कायद्यापुढे सर्व समान' हा सर्वात मोठा अधिकार लोकांना मिळालेला आहे. संविधानकर्त्यांनी संविधानात १४, १५, ४६, ३३५, ३३८, ३४०, ३४१ व ३४२ इत्यादी कलमांचा समावेश केला. या कलमास अनुसरून मागास जातींची स्थिती जाणून घेण्यासाठी व सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग कोणते आहेत? याची पाहणी करून. त्याच्या अडचणी दूर करण्यासाठी व उपाय सुचविण्यासाठी संविधानाच्या ३४० अनुच्छेदानुसार आयोग नेमण्याची जबाबदारी राष्ट्रपतीकडे सोपविण्यात आलेली आहे.

भारतीय संविधानामध्ये धार्मिक, जातिभेदाचा निषेध करून धर्माच्या तुलनेमध्ये राज्याला सर्वोच्च स्थान दिले गेले. भारतीय संविधानामध्ये प्रथमच अशिक्षित, कमकुवत, गरीब, मागासलेले, दलित व स्त्रिया यांना सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार प्राप्त करून दिले. संविधानात वर्णव्यवस्था व जातिभेद कालबाह्य ठरविले. अर्थात तेवढ्यानेही उद्देश सफल होऊ शकत नाही. निरोगी समाजरचनेच्या अनुकूल आर्थिक परिस्थितीने आणि योग्य वयात योग्य संस्कार केल्याने जन्मावर आधारलेली श्रेणीबध्द चौकट नाहीशी होऊ शकते. मनावरी योग्य संस्कार, शिक्षणाचा प्रसार आणि आर्थिक उन्नतीकरिता योग्य मदत यासारख्या उपायांनी वर्णव्यवस्थेचे अवशेष नाहीसे होऊन निरोगी समाजव्यवस्था निर्माण होऊ शकते यावर त्याचा विश्वास होता.

घटना निर्मितीच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अजोड कार्य केलेले आहे. नोकऱ्यांतील आरक्षण जागांचा प्रश्न जेव्हा घटना समितीने विचारासाठी घेतला तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेला प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला. त्यापुढेही जाऊन बाबासाहेब म्हणतात, जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात विषमता असेल तोपर्यंत आरक्षणाचे धोरण राबवावे लागेल. भारतीय राज्यघटनेच्या ३४० व्या कलमानुसार इतर मागासवर्गीयांना आरक्षण दिले आहे. त्याच्या अंमलबजावणीसाठी १९५३ साली काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोगाची नियुक्ती केली. या आयोगाने १९५५ साली आपला अहवाल दिला. या आयोगाने बहुमताने इतर मागासवर्गीयांना आरक्षण देण्याची शिफारस केलेली होती, परंतु स्वत: अध्यक्ष काका कालेलकरांनीच अहवालाच्या विरोधात राष्ट्रपतींना पत्र लिहून हा अहवाल फेटाळण्याची शिफारस केली. त्यानुसार हा अहवाल फेटाळला गेला. त्यानंतर १९७८ साली बी.पी.मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग नेमण्यात आला होता. या आयोगाने आपला अहवाल १९८० साली सादर केला. दरम्यान सत्तांतर होऊन सत्तेवर आलेल्या काँग्रेसने पूर्वीप्रमाणेच इतर मागासवर्गीय विरोधी धोरण अवलंबून अहवाल अंधारातच ठेवला गेला. १९८९ साली व्ही. पी. सिंग यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर १९९० साली

मंडल आयोगाचा अहवाल सरकारने स्विकारला आणि १९९३ सालापासून मंडल आयोगाच्या अहवालाची अंशत: अंमलबजावणी सुरू झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, 'Reservation, for those are not Adequately Represented' म्हणजेच 'ज्यांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले नाही, त्यांना आरक्षण' किंवा 'ज्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात पर्याप्त प्रतिनिधीत्व मिळाले नाही, त्यांना आरक्षण'. भारतीय समाजात देण्यात येणाऱ्या आरक्षणाचा आधार हा आर्थिक मानला गेलेला नाही म्हणून संविधानात देखील त्याचा उल्लेख केलेला आढळून येत नाही. भारतीय समाजव्यवस्थेने स्वातंत्र्यानंतर आरक्षणाचे तत्त्व स्विकारलेले असले किंवा भारतीय संविधानात याचा समावेश केलेला असला तरी आरक्षणविषयक दृष्टीकोणात विभिन्नता असलेली दिसून येते. ही शिथिलता समाजातील उच्च पदावर असणाऱ्या व्यक्तीमध्ये राजकीय आणि सामाजिक नेत्यामध्येही आढळून येते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ संविधानाचे चर्चाविश्व आणि आरक्षण

१५ ऑगस्ट १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर राष्ट्राच्या भविष्यकालीन वाटचालीच्या आराखडा तयार करण्यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली संविधान तयार करण्यासाठी लोकप्रतिनिधींची संविधान समिती निर्माण करण्यात आली. संविधान तयार करताना प्रमुख विषयासंबंधात १२ समित्या स्थापन केल्या गेल्या, त्यात प्रारुप समिती महत्त्वपूर्ण होती. तिला मसुदा समिती म्हटले गेले. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मसुदा समिती नेमण्यात आली. दोन वर्षे ११ महिने १८ दिवस या समितीने कार्य केले. या समितीने एकूण ११ बैठका घेतल्या. संविधान समितीने व्यापक विचार व चर्चा करून भारतीय परिस्थितीसाठी सर्वाधिक अनुकूल संसदीय शासन पध्दतीचा स्विकार करण्यात आला.

९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक झाली. ११ डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत डॉ. राजेंद्रप्रसाद यांची संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. १३ डिसेंबरला पंडित जवाहरलाल नेहरूंनी 'उद्दिष्टांचा ठराव' मांडला होता. त्यात घटना समितीच्या कार्याचा व कार्यक्रमाचा कच्चा आराखडा व्यक्त झाला होता. भारतीय जनतेला सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळवून देणे, विचार, अभिव्यक्ती, संघटन, उपासनेचे स्वातंत्र्य देणे, अल्पसंख्यांक व मागास विभागांसाठी, आदिवासी वस्ती असलेल्या प्रदेशासाठी तसेच बहिष्कृत वर्गासाठी व अन्य मागासलेल्या वर्गासाठी संरक्षक तरतुदी केल्या जातील असे अभिवचन दिले होते. १७ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेत

भाषण करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले, ''अल्पसंख्यांक आणि मागासवर्गीयांसाठी केलेल्या तरतुदी पुरेशा असाव्यात तसेच शीख आणि अन्य अल्पसंख्यांक यांना त्या समाधानकारक वाटावयास हव्या.''

अल्पसंख्यांक समितीचे अध्यक्ष सरदार पटेल म्हणाले, ''एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात अल्पसंख्यांकाना प्रतिनिधित्व व आरक्षण असावे असा आम्ही निर्णय घेतला आहे. विशेषत: अँग्लो इंडियन आणि अनुसूचित जातीसाठी सरकारी जागा राखून ठेवाव्यात याबाबत आमचे एकमत झाले आहे.'' २१ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ. आंबेडकरांनी घटनेचा ३१५ कलमी सुधारित मसुदा राजेंद्रप्रसाद यांना सादर करताना लिहिले होते. ''विधानमंडळातील जागा आणि सार्वजनिक सेवामधील पदे अल्पसंख्यांकासाठी राखीव ठेवण्याबाबत संविधानसभेने आणि सल्लागार समितीने घेतलेले निर्णय मसुद्यात नोंद केले आहेत.

१९४७ साली त्यांनी घटना कशी असावी? याचा एक मसुदा सरकारला सादर केला तो 'राज्य आणि अल्पसंख्यांक' या नावाने आज ओळखला जातो. यातही आरक्षणाची मागणी त्यांनी केलेली होती. घटना निर्मितीच्या काळात मसुदा समितीने अध्यक्ष म्हणूनही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अजोड कार्य केलेले आहे. नोकऱ्यातील राखीव जागांचा प्रश्न जेव्हा घटना समितीने विचारासाठी घेतला, त्यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सुचविलेला प्रस्ताव एकमताने मान्य करण्यात आला. त्याही पुढे जाऊन बाबासाहेब म्हणतात, 'जोपर्यंत सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात विषमता असेल, तोपर्यंत आरक्षणाचे धोरण राबवावेच लागेल याचा अर्थ आरक्षण हे भिक, दया, माया नसून तो घटनात्मक अधिकार आहे हे त्यांनी जगाला पटवून दिले.'

२० नोव्हेंबर १९४८ ला संविधान सभेच्या बैठकीत कलम १०(३) वर जोरदार चर्चा झाली. कारण कलम १०(३) मध्ये नव्याने शब्द समाविष्ट करण्यासाठीची मुदत दहा वर्षाची होती, त्यानुसार हृदयनाथ कुंजरू यांनी 'मागास' या शब्दाची संज्ञा केलेली नाही, त्यामुळे त्याचा अर्थ अस्पष्ट आहे. तरी अजीम अहमद खान यांनी 'मागास' हा शब्द काढून टाकणारी दुरुस्ती सादर केली. यावर कलम १०(३) ची आवश्यकता विशद करताना संविधान सभेचे उपाध्यक्ष डॉ. एस. सी. मुखर्जी यांनी हे कलम भारतातील भूतकाळात ज्या लोकांशी समाजाने निर्दयतापूर्ण व्यवहार केला, त्यांना राज्याद्वारे भरपाई मिळावी यासाठी आपण तयार असले पाहिजे म्हणून संविधानात तरतूद केली आहे. या चर्चेवेळी डॉ. धर्मप्रकाश पी. कक्कन, टी चैन्नैया, शांतनुकुमार दास, टी कृष्णम्माचारी यांनी सकारात्मक मते मांडली. डॉ. आंबेडकरांनी यावर उत्तर देताना मागासवर्गासाठी केलेल्या तरतुदीचे समर्थन केले. अखेरीस कलम १०(३) मध्ये मागास शब्द वर्ग शब्दाशी जोडून संविधान सभेने मंजूरी दिली. तसेच संविधान सभेमध्ये कलम १६(४) अंतर्गत अनुसूचित जाती व जमातीना सरकारी सेवेमध्ये आरक्षण देण्याच्या तरतुदीवरूनही विस्तृत चर्चा घडून आली होती, त्याचे समर्थन कलम १०(३) बाबत घेतलेल्या आक्षेपावेळी केले गेले.

२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान स्वीकृत करण्याची घोषणा करण्यात आली व २६ जानेवारी १९५० रोजी 'भारतीय संविधाना'चा स्विकार करण्यात आला. ''राज्याच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकासासाठी काही निश्चित नियमांची आवश्यकता असते. त्या नियमांच्या सर्वमान्य समुच्चयालाच संविधान असे म्हटले जाते.'' भारतीय संविधानाच्या लिखित प्रतिज्ञापत्रातच आम्ही शपथ घेतलेली आहे की, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता प्रस्थापित करण्यासाठी वचनबध्द आहोत, याचा अर्थ संधीची समानता व्यावसायिक गतिशीलता, सामाजिक न्याय, बंधूता इत्यादी बाबींना संविधानाने संरक्षण घेण्याची हमी दिलेली आहे. ज्यामुळे समाज परिवर्तन व गतिशीलता या तत्त्वाना पूरक वातावरण मिळेल. विषमतेने बरबटलेल्या समाजात संधीची समानता ही संकल्पना भीषण विषमता ठरू शकते याची जाणीव संविधान निर्मात्यांना होती म्हणून भारतीय संविधानात ३३८, ३३८ क, ३३९ व ३४०, या अनुच्छेदाचा समावेश करण्यात आलेला आहे. या अनुच्छेदांतर्गत राष्ट्रपतींना आयोग नेमता येतो. संविधानातील तरतुदीनुसार राष्ट्रपतींनी विविध आयोग नेमले.

संविधान सभेचे कामकाज चालू असताना इतर मागास वर्गीयांच्या आरक्षणासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एक मसूदा तयार केला. या मसुद्यानुसार ३०१ व्या अनुच्छेदाने, राष्ट्रपतींना घटना अंमलात आल्यावर दहा वर्षाने, मागासलेले विभाग व जाती यांच्या परिस्थितीवर रिपोर्ट तयार करण्यासाठी एक कमिशन नेमण्याचा अधिकार दिला. केंद्र सरकार आपल्या अधिकारात, प्रांताना त्या विभागातील मागासलेल्या जातीच्या उन्नतीबद्दल योजना तयार करण्यास मार्गदर्शन करील. मूळ अनुच्छेद फक्त प्रांतानाच लागू होणार होते पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सूचनेवरून त्यात संस्थानांचाही समावेश करण्यात आला. यानंतर सभागृहाने अनुच्छेद ३०१ मंजूर केले. या अनुच्छेदाचा आवशय असा आहे की, राष्ट्रपतींनी एक कमिशन नेमून भारतामधील सामाजिक व शैक्षणिक बाबतीत मागासलेल्या जातींच्या परिस्थितीचे संशोधन करावे. त्यांच्या अडीअडचणी व त्या दूर करण्याचे उपाय, त्याकरिता घ्यावयाची मदत, ती मदत देण्याचे नियम यावरही आपले संशोधन करून कमिशनने ते राष्ट्रपतींला द्यावे. राष्ट्रपतीने या रिपोर्टची एक प्रत व केलेले काम सभागृहासमोर मांडावे. याप्रकारे दिनांक १६ जून १९४९ ला अनुच्छेद ३०१ संविधानाचे अंग बनले. नंतर संविधानाला अंतिम रूप देत असताना ३०१ या अनुच्छेदाला ३४० या अनुच्छेदामध्ये परावर्तीत करण्यात आले.

आरक्षणाच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदामंत्री असताना, आरक्षणामधील पोट कलमाच्या भाषेतच 'सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले वर्ग' अशी उपसूचना मांडली. तेव्हा या उपसूचनेस जवाहरलाल नेहरूंनी 'सामाजिक' या शब्दावर आक्षेप घेऊन विरोध दर्शविला. त्याऐवजी 'आर्थिक' हा शब्द घालावा असे सुचविले होते. डॉ. आंबेडकरांनी त्यांची सूचना फेटाळताना 'सामाजिक' हा शब्द अधिक व्यापक आहे, त्यात 'आर्थिक' घटकाचाही अंतर्भाव होतो असे स्पष्टीकरण दिले.

भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्य, समता, बंधूता व सामाजिक न्यायाच्या हेतूने लोकशाहीचे तत्त्व अवलंबिले. लोकशाही व्यवस्था मानल्यामुळे राजकीय व्यवस्थेमध्ये प्रत्येक व्यक्तीस 'एक व्यक्ती-एक मत' असा अधिकार मिळाला. यामुळे सर्वांना कायद्याने समान लेखले आहे. कायद्याच्या दृष्टीने जरी, सर्व व्यक्ती समान मानल्या असल्या तरी, व्यवहारात त्या समान आहेत का? या प्रश्नाचे उत्तर आपणास नक्कीच नकारार्थी द्यावे लागते. कारण जर त्या व्यावहारिक पातळीवर समान असत्या, तर त्यांना 'आरक्षण' देण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता. यामुळे राजकीय स्वातंत्र्यास खरा अर्थ प्राप्त होण्यास सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक बाबी देखील बळकट असाव्या लागतात हे स्पष्टच होते. अन्यथा, लोकशाही असूनही ती हुकूमशाहीच ठरू शकते. असा विचार घटनासमितीने केला असल्याने आरक्षण योजना मान्य करण्यात आली.

असा विचार केल्याने भारतीय घटनेमध्ये १५(४), ४६, २४३, ३३५, ३४०(१), ३४१(१), ३४२(१) या कलमानुसार दुर्बल असणाऱ्या घटकांचे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपण दूर करण्यासाठी तसेच असणारी सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी शासनाने आरक्षणाची तरतूद मान्य केली.

## ३.२.२ आरक्षणाच्या घटनात्मक तरतुदी

भारतीय संविधानातील आरक्षणाच्या बाबतीत संविधानिक तरतूदी असलेल्या अनुच्छेदांची माहिती प्रस्तुत मांडणीचा विषय आहे. कायद्यापुढे भारतातील प्रत्येक व्यक्ती समान आहे अशी हमी घटनेतील अनुच्छेद १४ आम्हाला देते. याशिवाय घटनाकारांनी याच्या जोडीला अनुच्छेद १६ ची निर्मिती केलेली आहे. १६(४) या अनुच्छेदानुसार राज्यातील शासकीय नोकऱ्यांमध्ये सर्वांना समान संधी मान्य करण्यात आली व ३३५ अनुच्छेदानुसार संघराज्य व राज्यातील शासकीय नोकऱ्यांमध्ये पदोन्नतीसाठी आरक्षणाची तरतूद केलेली आहे. अनुच्छेद १५(४) व अनुच्छेद ३४० नुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या 'मागासलेले वर्ग' कोण आहेत. त्यांच्या प्रगतीसाठी कोणते खास उपाय योजावेत. त्यांची पाहणी करून त्यांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी आयोग नेमण्याची जबाबदारी राष्ट्रपतीवर सोपविण्यात आलेली आहे. या आयोगाने केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करणे ही जबाबदारी केंद्र सरकारवर असून त्यानुसार ज्या क्षेत्रात इतर मागासवर्गीयांना पुरेसे प्रतिनिधीत्व नाही त्या क्षेत्रात राखीव जागा ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. अनुच्छेद ४६ नुसार 'दुर्बल घटक' यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्वप्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील. अनुच्छेद १६४ नुसार राज्यातील एका मंत्र्याकडे इतर मागासवर्गीयांचे कल्याण कार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रभार असेल. अनुच्छेद २४३ नुसार शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला व मागासवर्गीय लोकांकरिता आरक्षणाची तरतूद केलेली आहे. संविधानातील अनुच्छेदांद्वारे

प्रस्थापित जातीव्यवस्थेत परिवर्तन घडवून आणण्यासाठी व विषमता नष्ट करण्यासाठी आरक्षणांच्या तरतूदी महत्त्वाच्या ठरतात.

## भाग ३ : मुलभूत अधिकार :-

### अनुच्छेद (१४) :

राज्य, कोणत्याही व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्यांचे समान संरक्षण नाकारणार नाही.

### अनुच्छेद (१५) :

(१) राज्य, केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

(२) केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून कोणताही नागरिक-

क) दुकाने, सार्वजनिक उपाहरगृहे, हॉटेल आणि सार्वजनिक करमणुकीची स्थाने यात प्रवेश अथवा,

ख) पूर्णत: किंवा अंशत: राज्याच्या पैशाने राखलेल्या अथवा सर्वसाधारण जनतेच्या उपयोगाकरिता समर्पित अशा विहिरी, तलाव, स्नानघाट, रस्ते आणि सार्वजनिक राबत्याच्या जागा यांचा वापर, याविषयी कोणतीही नि:समर्थता, दायित्व, निर्बंध किंवा शर्ती यांच्या अधीन असणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, स्त्रिया व बालके यांच्याकरता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४) या अनुच्छेदातील किंवा अनुच्छेद २९ चा खंड (२) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या उन्नतीकरिता अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे किंवा अनुच्छेद १९ खंड (१) उपखंड (छ) यातील कोणत्याही गोष्टीमुळे नागरिकांपैकी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या कोणत्याही वर्गाच्या अथवा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उन्नतीकरिता, कोणतीही विशेष तरतूद करण्यास कायद्याने, त्यांच्या शैक्षणिक संस्थामधील प्रवेशांच्या संबंधाने,

अनुदानित किंवा विनाअनुदान खाजगी शैक्षणिक संस्थामधील प्रवेशांसहित, अनुच्छेद ३० खंड १ मध्ये नमूद अल्पसंख्यांक समाजाच्या शैक्षणिक संस्था वगळता, कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

**अनुच्छेद (१६) :**

(१) राज्याच्या नियंत्रणाखालील कोणत्याही पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यासंबंधीच्या बाबींमध्ये सर्व नागरिकांस समान संधी असेल.

(२) कोणताही नागरिक केवळ धर्म, वंश, जात, लिंग, कूळ, जन्मस्थान निवास या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्याच्या नियंत्रणाखालील कोणतेही सेवायोजन किंवा पद यांच्याकरता अपात्र असणार नाही अथवा त्यांच्याबाबतीत त्याला प्रतिकूल असा भेदभाव केला जाणार नाही.

(३) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, एखादे राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र यांच्या शासनाच्या अथवा त्यांच्यातील कोणत्याही स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील एखाद्या वर्गांच्या किंवा वर्गाच्या पदावरील सेवायोजन किंवा नियुक्ती यांच्या संबंधात अशा सेवायोजनाच्या किंवा नियुक्तीच्यापूर्वी त्या राज्यातील किंवा संघ राज्यक्षेत्रातील निवासाविषयी एखादी आवश्यकता विहित करणारा कोणताही कायदा करण्यास संसदेला प्रतिबंध होणार नाही.

(४) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या सेवांमध्ये नागरिकांच्या ज्या कोणत्याही मागासवर्गाला राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही अशा वर्गाकरता नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी कोणतीही तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

(४क) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये ज्या अनुसूचित जातींना किंवा अनुसूचित जनजातींना त्या राज्याच्या मते पर्याप्त प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नसेल त्यांना राज्याच्या नियंत्रणाखालील सेवा संबंधातील कोणत्याही वर्गामध्ये किंवा वर्गामध्ये परिणामस्वरूप ज्येष्ठतेसह पदोन्नती देण्यासंबंधात आरक्षण करण्यासाठी राज्याला कोणतीही तरतूद करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(४ख) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, राज्याला, खंड (४) किंवा (४क) अन्वये आरक्षणासाठी केलेल्या कोणत्याही तरतुदीनुसार भरण्यासाठी म्हणून एखाद्या वर्षांत राखून ठेवलेल्या परंतु त्या जागांचा एक स्वतंत्र वर्ग म्हणून विचारात घेण्यास प्रतिबंध होणार नाही आणि अशा वर्गातील रिक्त जागा, ज्या वर्षामध्ये त्या भरण्यात येतील त्या वर्षातील रिक्त

जागांच्या पन्नास टक्के इतकी आरक्षणाची मर्यादा ठरविण्याकरिता, त्या वर्षातील इतर रिक्त जागांबरोबर जमेस धरल्या जाणार नाहीत.

(५) या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टींमुळे, एखाद्या धार्मिक किंवा सांप्रदायिक संस्थेच्या कारभाराशी संबंधित असलेल्या पदाचा किंवा तिच्या शासक मंडळाचा कोणताही सदस्य म्हणजे विशिष्ट धर्माची अनुयायी असणारी किंवा एखाद्या विशिष्ट संप्रदायाची व्यक्ती असली पाहिजे, अशी तरतूद करणाऱ्या कोणत्याही कायद्याच्या प्रवर्तनावर परिणाम होणार नाही.

**अनुच्छेद (१७) :**

'अस्पृश्यता' नष्ट करण्यात आली आहे व तिचे कोणत्याही स्वरुपातील आचरण निषिध्द करण्यात आले आहे. अस्पृश्यतेतून उद्‌भवणारी कोणतीही नि:समर्थता लादणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध आहे.

**अनुच्छेद (२३) :**

(१) माणसांचा अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरुपातील वेठ यांना मनाई करण्यात आली आहे आणि उपबंधाचे कोणत्याही प्रकारे व्यतिक्रमण करणे हा कायद्यानुसार शिक्षापात्र अपराध असेल.

(२) सार्वजनिक प्रयोजनाकरिता सक्तीने सेवा करायला लावण्यास राज्याला या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही व असे सेवाबंधन लादताना केवळ धर्म, वंश, जात या वर्ग या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून राज्य कोणताही भेदभाव करणार नाही.

**अनुच्छेद (२६) :**

सार्वजनिक सुव्यवस्था, नितीमत्ता व आरोग्य यांच्या अधिनतेने, प्रत्येक धार्मिक संप्रदायास अथवा त्यांच्यापैकी कोणत्याही गटास-

(क) धार्मिक व धर्मादायी प्रयोजनाकरिता संस्थांची स्थापना करून त्या स्वखर्चाने चालवण्याचा;

(ख) धार्मिक बाबीत आपल्या व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचा.

(ग) जंगम व स्थावर संपत्ती मालकीची असण्याचा व ती संपादन करण्याचा, आणि

(घ) कायद्यानुसार अशा संपत्तीचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

**अनुच्छेद (२९) :**

(१) भारताच्या राज्यक्षेत्रात किंवा त्याच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या ज्या कोणत्याही नागरिक

गटाला आपली स्वत:ची विभिन्न भाषा, लिपी वा संस्कृती असेल त्याला ती जतन करण्याचा अधिकार असेल.

(२) राज्याच्या खर्चाने चाललेल्या किंवा राज्याच्या पैशातून साहाय्य मिळत असलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरिकास केवळ धर्म, वंश, जात, भाषा या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही.

**अनुच्छेद (३०) :**

(१) धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या सर्व समाजाना आपल्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा व त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार असेल.

(१क) खंड (१) मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे एखाद्या अल्पसंख्यांक समाजाने स्थापन केलेल्या व प्रशासिलेल्या शैक्षणिक संस्थेच्या कोणत्याही संपत्तीचे सक्तीने संपादन करण्याचा उपबंध करणारा कोणताही कायदा करताना, राज्य हे अशा संपत्तीच्या संपादनाबद्दल अशा कायद्याने निश्चित केलेल्या किंवा त्याखाली ठरवलेल्या रकमेमुळे त्या खंडाखाली हमी दिलेला अधिकार निर्बंधित किंवा निराकृत होणार नाही अशा प्रकारची ती रक्कम असेल अशी खात्रीलायक तजबीज करील.

(२) शैक्षणिक संस्थांना सहाय्य देतांना राज्य, एखादी शैक्षणिक संस्था ही धर्म किंवा भाषा या निकषानुसार अल्पसंख्यांक असलेल्या एखाद्या समाजाच्या व्यवस्थापनाखाली आहे या कारणावरून तिला प्रतिकूल होईल अशाप्रकारे भेदभाव करणार नाही.

## भाग ४ : राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे :-

**अनुच्छेद (४६) :**

राज्य हे दुर्बल तर जनवर्ग आणि विशेषत: अनुसूचित जाती व जनजाती यांचे विशेष काळजीपूर्वक शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय व सर्व प्रकारचे शोषण यापासून त्यांचे संरक्षण करील.

## भाग ६ : राज्ये :-

**अनुच्छेद (१६४) :**

(१) मुख्यमंत्री राज्यपालाकडून नियुक्त केला जाईल आणि इतर मंत्री राज्यपालाकडून मुख्यमंत्र्याच्या सल्ल्यावरून नियुक्त केले जातील आणि राज्यपालांची मर्जी असेपर्यंत मंत्री अधिकारपदे

धारण करतील. परंतु छत्तीसगढ, झारखंड, मध्यप्रदेश व ओरिसा या राज्यांमध्ये एका मंत्र्याकडे जनजातीच्या कल्याण कार्याचा प्रभार असेल व त्याशिवाय त्याच्याकडे अनुसूचित जातीचे व मागासवर्गाचे कल्याणकार्य किंवा अन्य कोणतेही काम यांचा प्रभार असेल.

**भाग ९ : पंचायती :–**

**अनुच्छेद २४३ (घ) :**

(१) प्रत्येक पंचायतीमध्ये–

क) अनुसूचित जातींसाठी आणि;

ख) अनुसूचित जनजातींसाठी जागा राखून ठेवण्यात येतील आणि अशाप्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या जागांच्या संख्येचे त्या पंचायतीमध्ये थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे शक्य होईल तेथवर, त्या पंचायत क्षेत्रामधील अनुसूचित जातींच्या किंवा त्या पंचायत क्षेत्रातील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्रामधील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तेच असेल आणि पंचायतीमधील विविध मतदार संघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल;

(२) खंड (१) खाली राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांपेक्षा कमी नसतील एवढ्या जागा अनुसूचित जातींच्या, किंवा प्रकरणपरत्वे, अनुसूचित जनजातींच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) प्रत्येक पंचायतीमध्ये थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढ्या जागा अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जनजातींच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील आणि पंचायतीमधील विविध मतदारसंघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(४) ग्राम किंवा अन्य कोणत्याही पातळीवरील पंचायतीमधील सभापतीची पदे, राज्य विधानमंडळ कायद्याद्वारे उपबंधित करील अशा रीतीने अनुसूचित जातीं, अनुसूचित जनजातीं आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतील.

परंतु कोणत्याही राज्यामधील प्रत्येक पातळीवरील पंचायतीमधील अनुसूचित जाती, अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवलेल्या सभापतींच्या पदांच्या संख्येचे प्रत्येक पातळीवरील पंचायतीमधील अशा पदांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे, शक्य होईल तेथवर,

राज्यामधील अनुसूचित जातींच्या किंवा राज्यामधील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे राज्याच्या एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणाएवढे असेल.

परंतु आणखी असे की, प्रत्येक पातळीवरील पंचायतीमधील सभापतीच्या पदांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढी पदे महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील. तसेच या खंडाखाली राखून ठेवलेल्या या पदांचे, प्रत्येक पातळीवरील विविध पंचायतीमध्ये आळीपाळीने वाटप करण्यात येईल.

(५) खंड (१) आणि (२) खालील जागांचे आरक्षण आणि खंड (४) खालील सभापतीच्या पदाचे आरक्षण हे (महिलांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त) अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर परिणामक असल्याचे बंद होईल.

(६) या भागातील कोणत्याही गोष्टीमुळे, कोणत्याही राज्याच्या विधानमंडळास, मागासवर्गीय नागरिकांसाठी कोणत्याही पंचायतीमध्ये जागा राखून ठेवण्याकरिता किंवा कोणत्याही पातळीवरील पंचायतीमधील सभापतीची पदे राखून ठेवण्याकरिता कोणताही उपबंध करण्यास प्रतिबंध होणार नाही.

## भाग ९ (क) : नगरपालिका :-

### अनुच्छेद २४३ (न) :

(१) प्रत्येक नगरपालिकांमध्ये अनुसूचित जातीसाठी आणि अनुसूचित जनजातीसाठी जागा राखून ठेवण्यात येतील आणि अशाप्रकारे राखून ठेवण्यात आलेल्या जागांच्या संख्येचे त्या नगरपालिकेमध्ये थेट निवडणूकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे शक्य होईल तोवर, त्या नगरपालिका क्षेत्रामधील अनुसूचित जातीच्या किंवा त्या नगरपालिका क्षेत्रातील अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येचे त्या क्षेत्रातील एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल तेच असेल आणि नगरपालिकेतील विविध मतदार संघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(२) खंड (१) खाली राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांपेक्षा कमी नसतील एवढ्या जागा अनुसूचित जातींच्या, किंवा प्रकरणपरत्वे, अनुसूचित जनजातींच्या महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील.

(३) प्रत्येक नगरपालिकेमधील थेट निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या एक तृतीयांशापेक्षा कमी नसतील एवढ्या जागा (अनुसूचित जातींच्या व अनुसूचित जनजातींच्या

महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागा धरून) महिलांसाठी राखून ठेवण्यात येतील आणि नगरपालिकेतील विविध मतदारसंघामध्ये आळीपाळीने अशा जागांचे वाटप करण्यात येईल.

(४) नगरपालिकांमधील सभापतीची पदे, राज्य विधान मंडळ कायद्याद्वारे उपबंधित करील अशा रीतीने अनुसूचित जातीं, अनुसूचित जनजातीं आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतील.

(५) खंड (१) आणि (२) खालील जागांचे आरक्षण आणि खंड (४) खालील सभापतींच्या पदाचे आरक्षण हे (महिलांसाठी असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त) अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी समाप्त झाल्यावर परिणामकारकता बंद होईल.

(६) या भागातील कोणत्याही गोष्टीमुळे कोणत्याही राज्याच्या विधानमंडळास, मागासवर्गीय नागरिकांसाठी कोणत्याही नगरपालिकेमध्ये जागा राखून ठेवण्याकरिता किंवा सभापतीची पदे राखून ठेवण्यासाठी कोणताही उपबंध करण्यास प्रतिबंध होणार नाही.

## भाग १५ : निवडणूका :-

### अनुच्छेद (३२५) :

संसदेच्या दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या अथवा राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या किंवा दोहोंपैकी कोणत्याही सभागृहाच्या निवडणूकीकरता प्रत्येक क्षेत्रीय मतदार संघासाठी एक सर्वसाधारण मतदार यादी असेल आणि कोणतीही व्यक्ती, केवळ धर्म, वंश, जात, लिंग या किंवा यापैकी कोणत्याही कारणावरून अशा कोणत्याही मतदार यादीत समाविष्ट होण्यास अपात्र असणार नाही अथवा तिला अशा कोणत्याही मतदार संघासाठी असलेल्या कोणत्याही खास मतदार यादीत समाविष्ट होण्यास अपात्र असणार नाही अथवा तिला अशा कोणत्याही मतदार संघासाठी असलेल्या कोणत्याही खास मतदार यादीत समाविष्ट केले जाण्याची मागणी करता येणार नाही.

## भाग १६ : विवक्षित वर्गासंबंधी विशेष उपबंध :-

### अनुच्छेद (३३०) :

(१) लोकसभेत;

क) अनुसूचित जाती;

ख) आसामच्या स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजाती खारीज करून इतर अनुसूचित जनजाती, आणि

ग) आसामच्या स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजाती यांच्याकरीता जागा राखून ठेवल्या जातील.

(२) ज्याच्या संबंधात खंड (१) खाली अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्याकरता जागा राखून ठेवल्या आहेत असे कोणतेही राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र यामधील अनुसूचित जातीच्या अथवा यथास्थिती, असे राज्य किंवा संघ राज्यक्षेत्र अथवा अशा राज्याचा किंवा संघ राज्यक्षेत्राचा भाग यामधील अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येचे त्या राज्यांच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या एकूण लोकसंख्येशी जितके प्रमाण असेल तितकेच जवळ जवळ, त्या राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रात अशाप्रकारे राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे लोकसभेत त्या राज्यात किंवा संघ राज्यक्षेत्रास नेमून दिलेल्या एकूण संख्येशी प्रमाण असेल.

(३) खंड (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आसामच्या स्वायत्त जिल्ह्यांमधील अनुसूचित जनजातींसाठी लोकसभेत राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे, त्या राज्याला नेमून दिलेल्या जागांच्या एकूण संख्येशी असावयाचे प्रमाण हे कमीत कमी उक्त स्वायत्त जिल्ह्यांमधील अनुसूचित जनजातीच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणाइतके असेल.

**अनुच्छेद ३३२ :**

(१) अनुसूचित जाती व आसामच्या स्वायत्त जिल्ह्यांमधील अनुसूचित जनजाती खारीज करून अनुसूचित जनजाती यांच्याकरता प्रत्येक राज्याच्या विधानसभेत जागा राखून ठेवल्या जातील.

(२) आसाम राज्याच्या विधानसभेत स्वायत्त जिल्ह्यांसाठी देखील जागा राखून ठेवल्या जातील.

(३) कोणत्याही राज्याच्या विधानसभेत खंड (१) अन्वये अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जनजाती यांच्यासाठी राखून ठेवण्यात आलेल्या जागांच्या संख्येचे विधानसभेतील एकूण जागांच्या संख्येशी असणारे प्रमाण हे, जवळजवळ त्या राज्यातील अनुसूचित जातीचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी अथवा यथास्थिती, अनुसूचित जनजातीचे त्या राज्यातील किंवा त्याच्या भागातील एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणाइतके असेल.

(३क) खंड (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम व नागालँड या राज्यांच्या विधानसभातील जागांच्या संख्येचे अनुच्छेद १७० अन्वये इ.स.

२०२६ नंतर पहिल्या जनगणनेच्या आधारे केलेले पुन:समायोजन अंमलात येईपर्यंत अशा कोणत्याही राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जनजातीसाठी राखीव जागा खालीलप्रमाणे असतील.

क) संविधान (सत्तावन्नावे विशोधन) अधिनियम. १९८७ अंमलात येण्याच्या दिनांकास अशा राज्याच्या विधानसभेतील यापुढे या खंडात सध्याची विधानसभा म्हणून उल्लेखिलेल्या सर्व जागा अनुसूचित जनजातीच्या सदस्यांनीच धारण केलेल्या असतील तर एक खारीज करून सर्व जागा.

ख) अन्य कोणत्याही बाबतीत, जागांच्या एकूण संख्येशी सध्याच्या विधानसभेतील अनुसूचित जनजातीच्या सदस्यांच्या संख्येचे (उक्त दिनांकास असलेल्या) सध्याच्या विधानसभेतील जागांच्या एकूण संख्येशी जे प्रमाण असेल, त्याहून कमी नाही एवढ्या प्रमाणात असतील इतक्या जागा.

३ख) खंड ३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्रिपुरा राज्याच्या विधानसभेतील जागांच्या संख्येचे इ.स. २०२६ नंतरच्या पहिल्या जनगणनेच्या आधारे, अनुच्छेद १७० अन्वये पुन: समायोजन करण्यात येईपर्यंत विधानसभेत अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येचे, संविधान अनुसूचित जनजातींसाठी राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येचे, संविधान (बहात्तरावे विशोधन) अधिनियम, १९९२ अंमलात येण्याच्या दिनांकास असलेल्या जागांचे एकूण संख्येशी असावयाचे प्रमाण हे उक्त दिनांकास अस्तित्त्वात असलेल्या विधानसभेतील अनुसूचित जनजातीच्या सदस्यांच्या संख्येचे त्या विधानसभेतील एकूण जागांच्या संख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणापेक्षा कमी नसेल.

(४) आसाम राज्याच्या विधानसभेत एखाद्या स्वायत्त जिल्ह्याकरता राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येचे त्या विधानसभेतील जागांच्या एकूण संख्येशी असावयाचे प्रमाण हे कमीत कमी त्या जिल्ह्याच्या लोकसंख्येचे त्या राज्याच्या एकूण लोकसंख्येशी असलेल्या प्रमाणाइतके असेल.

(५) आसामच्या कोणत्याही स्वायत्त जिल्ह्याकरिता राखून ठेवलेल्या जागांच्या मतदारसंघात त्या जिल्ह्याबाहेरील कोणतेही क्षेत्र समाविष्ट असणार नाही.

(६) आसाम राज्याच्या कोणत्याही स्वायत्त जिल्ह्यातील अनुसूचित जनजातीचा घटक नसलेली अशी कोणतीही व्यक्ती त्या जिल्ह्यातील कोणत्याही मतदार संघातून होणाऱ्या त्या राज्याच्या विधानसभेच्या निवडणुकीस पात्र असणार नाही.

परंतु आसाम राज्यातील विधिमंडळाच्या निवडणूकांकरिता अनुसूचित जनजाती अणि बिगर अनुसूचित जनजाती यांचे प्रतिनिधित्व, अधिनियमित बोडोलँड टेरिटोरियल एरियाज डिस्ट्रिक्टमध्ये समाविष्ट असलेले मतदार संघ आणि बोडोलँड टेरिटोरियल एरियाज डिस्ट्रिक्ट निर्मितीच्या आधी असलेले मतदार संघ यामध्ये कायम ठेवले पाहिजे.

**अनुच्छेद ३३४ :**

या भागाच्या पूर्वगामी उपबंधामध्ये काहीही असेल तरी–

(क) लोकसभेत व राज्याच्या विधानसभांत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजाती यांच्याकरिता जागा राखून ठेवणे आणि;

(ख) लोकसभेत राज्यांच्या विधानसभांत आंग्लभारतीय समाजाला नामनिर्देशनाद्वारे प्रतिनिधित्व असणे याविषयीचे या संविधानाचे उपबंध या संविधानाच्या प्रारंभापासून (सत्तर वर्षाचा) कालावधी संपताच परिणामक असल्याने समाप्त होईल.

परंतु, या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे लोकसभेतील किंवा राज्याच्या विधानसभेतील कोणत्याही प्रतिनिधित्वावर, त्यावेळी अस्तित्वात असलेल्या लोकसभेचे किंवा प्रकरणपरत्वे, विधानसभेचे विसर्जन होईपर्यंत, परिणाम होणार नाही.

**अनुच्छेद ३३५ :**

संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील सेवांमध्ये व पदांवर नियुक्ती करताना अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यामधील व्यक्तीचे हक्क प्रशासनाची कार्यक्षमता राखण्याशी सुसंगत असेल अशा रितीने विचारात घेतले जातील.

परंतु संघराज्य किंवा राज्य यांच्या कारभाराच्या संबंधातील कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या सेवांमध्ये किंवा पदांवर बढती देण्याच्या बाबतीत आरक्षण करण्याकरिता अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती यांमधील व्यक्तींसाठी कोणतीही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक असलेली गुणमर्यादा शिथिल करण्याच्या दृष्टीने किंवा मूल्यमापनासाठी आवश्यक असलेल्या गुणवत्तेचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने कोणतीही तरतूद करण्यासाठी या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.

**अनुच्छेद ३३८ :**

(१) अनुसचित जाती आणि अनुसूचित अनुच्छेद ३३८(क) यांच्याकरता असलेला राष्ट्रीय आयोग, म्हणून ओळखला जाणारा एक आयोग असेल.

(२) संसदेने याबाबतीत केलेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधाच्या अधिनतेने, हे आयोग अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर तीन सदस्य यांचा मिळून बनलेला असेल आणि असे नियुक्त केलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष व अन्य सदस्य यांच्या सेवेच्या शर्ती व पदावधी, राष्ट्रपती, नियमांद्वारे निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

(३) आयोगाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि इतर सदस्य यांची नियुक्ती, राष्ट्रपती, स्वाक्षरित व स्वमुद्रांकित अधिपत्राद्वारे करील.

(४) आयोगाला आपल्या कार्यपध्दतीचे विनियमन करण्याची शक्ती असेल.

**अनुच्छेद ३३९ :**

(१) राष्ट्रपतीला आदेशाद्वारे राज्यांमधील अनुसूचित क्षेत्रांचे प्रशासन व अनुसूचित जनजाती संबंधीचे कल्याणकार्य यावर अहवाल देण्याकरिता एक आयोग कोणत्याही वेळी नियुक्त करता येईल. मात्र या संविधानाच्या प्रारंभापासून दहा वर्षे संपताच तो नियुक्त करावा लागेल. त्या आदेशाद्वारे आयोगाची रचना, अधिकार व कार्यपध्दती निश्चित करता येईल आणि त्यात राष्ट्रपतीस आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा अनुषंगिक किंवा सहाय्यभूत तरतुदी अंतर्भूत असू शकतील.

(२) राज्यातील अनुसूचित जातींच्या कल्याणासाठी आवश्यक असलेल्या म्हणून निर्देशात विनिर्दिष्ट केलेल्या योजना तयार करण्याच्या व त्यांची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, राज्याला निर्देश देणे हे संघराज्याच्या कार्यकारी अधिकाराच्या कक्षात येईल.

**अनुच्छेद ३४० :**

(१) भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गांच्या स्थितीचे व त्यांना ज्या अडचणी सोसाव्या लागतात त्यांचेअन्वेषण करणे आणि अशा अडचणी दूर करण्यासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी संघराज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणत्या उपाय योजना कराव्या त्यासंबंधी व त्या प्रयोजनाकरता संघ राज्याने किंवा कोणत्याही राज्याने कोणती अनुदाने द्यावीत व कोणत्या शर्तींच्या अधीनतेने अशी अनुदाने द्यावीत, त्यासंबंधी शिफारशी करणे याकरिता राष्ट्रपतीला त्यास योग्य वाटतील अशा व्यक्ती मिळून बनलेला आयोग आदेशाद्वारे नियुक्त करता येईल आणि असा आयोग नियुक्त करता येईल आणि असा आयोग नियुक्त करणाऱ्या आदेशाद्वारे आयोगाने अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यात येईल.

(२) याप्रमाणे नियुक्त केलेला आयोग त्याच्याकडे निर्देशिलेल्या बाबींचे अन्वेषण करील आणि त्या आढळून येईल अशी वस्तुस्थिती मांडणारा व त्याला उचित वाटतील अशा शिफारशी करणारा अहवाल राष्ट्रपतीस सादर करील.

(३) राष्ट्रपती याप्रमाणे सादर केलेल्या अहवालाची प्रत, त्यावर केलेल्या कारवाईचे स्पष्टीकरण करणाऱ्या निवेदनासहित, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

**अनुच्छेद ३४१ :**

(१) राष्ट्रपतीला कोणत्याही राज्याच्या किंवा संघराज्यक्षेत्राच्या बाबतीत आणि ते राज्य असेल तर त्यांच्या राज्यपालाचा विचार घेतल्यानंतर जाहीर अधिसूचनेद्वारे त्या राज्यात किंवा प्रकरणपरत्वे, संघराज्यक्षेत्रात या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जाती म्हणून मानल्या जातील त्या जाती, दंश किंवा जनजाती अथवा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा गट विनिर्दिष्ट करता येतील.

(२) संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जात, वंश किंवा जनजाती अथवा कोणतीही जात, वंश किंवा जनजाती यांचा भाग किंवा त्यातील गट खंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जातींच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा तीमधून वगळता येईल, पण उक्त खंडाखाली काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा फरक केला जाणार नाही.

**अनुच्छेद ३४२ :**

(१) राष्ट्रपती कोणत्याही राज्याच्या किंवा संघराज्यक्षेत्राच्या बाबतीत आणि ते राज्य असेल तर त्याच्या राज्यपालाचा विचार घेतल्यानंतर जाहीर अधिसूचनेद्वारे, त्या राज्यात किंवा प्रकरणपरत्वे, संघक्षेत्रात या संविधानाच्या प्रयोजनार्थ अनुसूचित जनजाती म्हणून मानल्या जातील त्या जनजाती किंवा जनजाती-समाज अथवा जनजाती किंवा जनजाती समाज यांचे भाग किंवा त्यातील गटत विनिर्दिष्ट करता येतील.

(२) संसदेला कायद्याद्वारे कोणतीही जनजाती किंवा जनजाती समाज अथवा कोणतीही जनजाती किंवा जनजाती समाज यांचा भाग किंवा त्यातील गट खंड (१) खाली काढलेल्या अधिसूचनेत निनिर्दिष्ट केलेल्या अनुसूचित जनजातीच्या सूचीत समाविष्ट करता येईल किंवा ती मधून वगळता येईल. पण उक्त खंडाखाली काढलेल्या अधिसूचनेत नंतरच्या कोणत्याही अधिसूचनेद्वारे पूर्वोक्तानुसार असेल त्याहून अन्यथा फरक केला जाणार नाही.

याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या द्रष्ट्या नेत्यास भविष्यातील घडामोडीची जाणीव होती म्हणूनच संविधान ३४० चे कलम घालून आपल्या शेवटच्या भाषणात बजावले होते की, 'आपण आज राजकीय समानता निर्माण करीत आहोत. पण त्याचबरोबर आपल्या समाजातील सामाजिक आणि आर्थिक विषमताही शिल्लक आहे. या दोहोमधील अंतर्विरोध जर आम्ही नष्ट केला नाही तर ते लोक सामाजिक आणि आर्थिक विषमतेने पिचले गेले आहे तेच लोक मोठ्या प्रयासाने आम्ही निर्माण केलेली राजकीय लोकशाही उद्ध्वस्त करतील.

भारतीय संविधानाच्या वरील विविध कलमाद्वारे मुलभूत अधिकाराबरोबरच विकासाच्या प्रक्रियेपासून वंचित असणारा समाज जो अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणून ओळखला जातो, त्या समाजाच्या उत्थानासाठी संविधानातील कलम ३३० ते ३४२ पर्यंत आरक्षणाची तरतूद केली आहे. या तरतुदीनुसार मागासवर्गीयांना खालील बाबींमध्ये आरक्षण मिळाले आहे.

## १. राजकीय आरक्षण :–

राजकीय आरक्षण हे समतेच्या तत्वास पोषक आहे. संविधानाच्या ३३०, ३३१ ते ३३२ या कलमानुसार लोकसभा व (विधावस्थेत) मागासवर्गीयांच्या जनगणनेतील लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. ७३ व्या घटना दुरुस्ती अन्वये कलम २४३ घ व कलम २४३ न नुसार शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये मागासवर्गीयांना जागा आरक्षित ठेवल्या आहेत.

## २. शैक्षणिक आरक्षण :–

भारतीय संविधानाने कोणत्याही सरकारी व खाजगी शिक्षण संस्थामध्ये प्रवेशावेळी धर्म, पंथ, लिंग या आधारे भेदभाव करू नये, असा कायदा करून सर्वांना समानतेच्या पातळीवर आणले. अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन व शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी घटनेच्या ३३१ (१) कलमानुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राष्ट्रीय आयोग नेमण्याचा अधिकार राष्ट्रपतींना देत हा आयोग मागासवर्गीयांच्या शैक्षणिक व सामाजिक स्थितीचे अवलोकन करतो त्याची स्थिती सुधारण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात ते सुचवेल, त्यांना कोणत्या शर्तीच्या आधारे अनुदाने द्यावीत याची शिफारस करेल. ३३९(१) व ३४०(१) या कलमाद्वारेही अनुसूचित जाती-जमातींना शैक्षणिक आरक्षण मिळाले आहे.

## ३. नोकरीतील आरक्षण :–

भारतीय राज्यघटनेतील ३३८(५) नुसार अनुसूचित जाती व जमातीचे संरक्षण, कल्याण, विकास

व अभिवृध्दी याबाबत संसदेने केलेल्या कायद्याच्या अधीन राहून राष्ट्रपती नियमाद्वारे निर्देशीत करतील ती कामे पार पाडणे या तरतुदीकडे मागासवर्गीयांना सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक व इतर स्वायत्त संस्था यांना सरकारकडून मदत व अनुदान मिळते. अशा संस्थांमध्ये अनुसूचित जाती व जमातीना लोकसंख्येच्या प्रमाणात नोकरीमध्ये आरक्षण मिळाले आहे. १९५७ नंतर नोकरीतील आरक्षणाबरोबरच पदोन्नतीमध्ये आरक्षणाची तरतूद लागू केली आहे.

वरील तिन्ही प्रकारच्या आरक्षणाच्या तरतूदीमध्ये अनुसूचित जाती जमातीच्या लोकांच्या जीवनमानात, राहणीमानात आमूलाग्र बदल घडवून आणण्याची संधी प्राप्त झाली त्याचा फायदा या समाजघटकांना स्वातंत्र्योत्तर काळात होऊन सामाजिक विषमता नष्ट होण्याच्या प्रक्रियेला चालना मिळाली आहे.

## ३.२.३ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीबाबत आरक्षणाचे धोरण

भारतीय संविधानातील कलम १४, १५, १६, ३७, ४०, २७५, ३२४, ३३०, ३३१, ३३४, ३३५, ३३९, ३४०, ३४१ व ३४२ मार्गदर्शक तत्वातील कलम ४६ यामध्ये अनुसूचित जाती व जमातीबाबत आरक्षणाच्या धोरणाच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या तरतुदीच्या आधारे अनुसूचित जाती-जमातीचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकास घडून यावा व समताधिष्ठीत समाजरचना निर्माण व्हावी हा उद्देश आहे.

कलम १४ नुसार कायद्यापुढे समानता कलम १५ भेदभाव करण्यास मनाई कलम १६ नुसार सार्वजनिक सेवा व योजनामध्ये समान संधी दिली जाईल, परंतु १९५६ ला सातव्या घटनादुरुस्तीने प्रत्येक घटक राज्याला राज्यक्षेत्रात वास्तव्याच्या आधारे ठराविक जाती-जमातींना स्वतंत्र आरक्षण देण्यासाठी कायदा करू शकते. राज्याच्या सेवामध्ये ज्या नागरिकांना मागासप्रवर्गाना पर्याप्त प्रतिनिधीत्व नाही, अशा वर्गासाठी नियुक्ती किंवा पदे राखून ठेवण्यासाठी तरतूद करू शकते. राज्याच्या नियंत्रणाखालील क्षेत्रामध्ये अनुसूचित जाती-जमातींना पर्याप्त प्रतिनिधीत्व देण्यात आलेले नसेल तर पदोन्नती देण्यासंदर्भात आरक्षण देऊ शकते. तसेच एखाद्या वर्षी आरक्षित ठेवलेल्या जागा भरल्या न गेल्यास त्या पुढीलवर्षी भरल्या जातील. कलम ३७ मध्ये सामाजिक न्यायासाठी राज्याने पार पाडावयाचे कर्तव्य सांगितले आहे तर कलम ३८ नुसार राज्य लोककल्याणासाठी संवर्धनासाठी प्रयत्नशील असे?

कलम ४७ नुसार राज्यास अनुसूचित जाती व जमातीचे राहणीमान व पोषणमान उंचावण्यासाठी आरक्षणाची स्वतंत्र तरतूद करता येऊ शकेल. कलम ३३० नुसार लोकसभेमध्ये अनुसूचित जाती-जमातीसाठी जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. कलम ३३२ नुसार विधानसभेत जागा राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आली आहे. कलम ३३० व ३३२ नुसार लोकसंख्येच्या प्रमाणात

अनुसूचित जाती व जमाती यांना राजकीय आरक्षण घटनात्मक प्राप्त झाले आहे. कलम ३३५ नुसार संघराज्यातील सर्व सेवा व पदावर हक्क सांगण्याचा अधिकार अनुसूचित जाती-जमातींना प्राप्त झाला आहे. तर कलम ३३८ व ३३९ नुसार अनुसूचित जाती-जमातीसाठी राष्ट्रीय आयोग स्थापण्याची जबाबदारी राष्ट्रपतींना दिलेली आहे व ३४० कलमानुसार हा आयोग भारताच्या राज्यक्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गाच्या स्थितीच्या अन्वेषनाचे कार्य करेल व आपला अहवाल राष्ट्रपतींना सादर करेल. राष्ट्रपती तो संसदेच्या दोन्ही सभागृहास समोर ठेवण्याची व्यवस्था करेल.

## ३.२.४ पहिली घटना दुरुस्ती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गीयांना आरक्षण

भारतीय संविधानाच्या लिखित उद्देशिकेत स्पष्ट केले आहे की, ''आम्ही भारतीय लोक सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार अभिव्यक्ती व उपासना याचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता प्रस्थापित करण्यासाठी वचनबध्द आहेत.'' याचा ते संधीची समानता, व्यावसायिक गतिशीलता व सामाजिक बंधूता इत्यादी बाबींना घटनात्मक संरक्षण देण्याची आम्ही हमी दिली आहे. विषमतेने बरबटलेल्या समाजात संधीची समानता ही संकल्पना भीषण विषमता ठरू शकते याची जाणीव घटनाकर्त्यांना होती म्हणून घटनेत अनुच्छेद ३४०, ३४१ व ३४२ यांचा समावेश करण्यात आला.

भारत सरकारने स्वीकारलेल्या समाजवादी धोरणामुळे शासकीय नोकऱ्यात व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशामध्ये आरक्षण सुरू केल्यामुळे या निर्णयाविरुध्द सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केल्या यामध्ये श्रीमती चंपाक्कम दोरैईराजन व व्यंकटरमन यांच्या आरक्षणविरोधी याचिकांच्या खटल्यामुळे भारतीय संविधानामध्ये घटनादुरुस्ती करणे अपरिहार्य बनले.

मद्रास सरकारने इंजिनिअरिंग व वैद्यकीय शिक्षणासाठी मागासवर्गीय हिंदू व हरिजन यांना राखीव जागा जाहीर केल्या होत्या त्या विरोधात ७ जून १९५० रोजी श्रीमती चंपाक्कम दोरैईराजन यांनी मद्रास उच्च न्यायालयात खटला दाखल केला होता आणि मद्रास उच्च न्यायालयाने घटनेच्या कलम १५ व २९(२) मधील समानतेच्या मुलभूत अधिकारांचा आधार घेत आरक्षण घटनाबाह्य ठरवले होते. वास्तविक कलम २९(२) मधील तरतूद अशी की, कोणाही नागरिकास धर्माच्या, वंशांच्या, जातीच्या अथवा भाषेच्या आधारे दुजाभाव केला जाणार नाही परंतु हीच तरतूद सामाजिक न्याय करताना तांत्रिक स्वरूपात आडवी येते. मद्रास सरकारच्या राखीव जागा देणाऱ्या कम्युनल ऑर्डर विरोधात मद्रास राज्याने केलेले अपील देखील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळले. या निर्णयामुळे वंचित पीडित दलितांना राखीव जागा देण्यात मोठी अडचण निर्माण झाली होती. त्यामुळे घटनादुरुस्तीची गरज निर्माण झाली होती.

भारतीय राज्यघटनेत पहिली घटना दुरुस्ती १९५१ मध्ये करण्यात आली. या घटनादुरुस्तीने अनेक कलमात बदल करण्यात आले. भारतीय संविधानाच्या १५ व १९ व्या कलमात करण्यात आलेला बदल तसेच संविधानात ३१अ व ३१ब आणि ९ वे परिशिष्ट जोडण्यात आले. जे न्यायालयीन पुनर्विलोकनापासून संरक्षित केले होते. संविधान निर्माण झाल्यावर १५ महिन्यातच घटनादुरुस्तीचा विषय समोर आल्यामुळे त्यावर खूप चर्चा झाली. ज्या संविधान सभेने घटनानिर्मिती केली होती, तिलाच घटनादुरुस्तीचा मसूदा तयार करणेस सांगितले. डॉ. आंबेडकरांनी मसुदा तयार केला ही घटना दुरुस्ती सामाजिक न्यायासाठी अतिशय महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन डॉ. आंबेडकरांनी केले.

भारतातील उच्च व सर्वोच्च न्यायालयानी केंद्र व राज्य सरकारच्या जमीनदारी निर्मूलन, आरक्षण, पुनर्वसन या सामाजिक न्यायाच्या धोरणाविरोधात निर्णय दिले होते. राज्यघटना लागू झालेवर सरकारने देशातील जनतेच्याबाबत घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांच्या विरोधात न्यायालयाने तांत्रिकतेच्या जोरावर सरकारला नामोहरण केले होते. देशातील न्यायालये ही अशी सामाजिक न्यायाच्या विरोधातील निर्णय होत असल्याचे पाहून पं. नेहरू, डॉ. आंबेडकर व सेटलवाड अस्वस्थ झाले. सामाजिक व आर्थिक समतेच्या दिशेने घेतलेल्या सरकारच्या धोरणास रोखू पाहणाऱ्या न्यायालयांना अशा लोककल्याणकारी धोरणाबाबत निर्णय देण्याच्या कक्षेबाहेर ठेवण्याची तरतूद कलम ३१अ, ३१ब मध्ये करून तिचा समावेश ९व्या परिशिष्टात केला गेला जो पहिल्या घटनादुरुस्तीचा उद्देश होता.

न्यायालयांनी जनतेच्या इच्छा-आकांक्षा जाणून घ्याव्यात आणि धोरणाविषयी संसदेने घेतलेला निर्णय मान्य करावा हीच प्रमुख भूमिका पहिल्या घटनादुरुस्तीच्या वेळी नेहरू-आंबेडकर यांची होती. पहिल्या घटना दुरुस्तीने १५व्या कलमात फेरफार करून असे ठरवले की, जर राज्याने समाजाचा दुर्बल घटकांच्या व अनुसूचित जाती-जमातींच्या विकासासाठी विशेष सवलतींची व्यवस्था केल्यास राज्याचे ते वर्तन भेदभावकारक समजले जाणार नाही.

भारतीय संविधानात अनुच्छेद ३४० अन्वये राष्ट्रपतींना आयोग नेमता येतात. या आयोगाने सामाजिकदृष्ट्या व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग कोणते आहेत व त्यांच्या प्रगतीसाठी कोणते उपाय योजावेत हे सुचवावे असे नमूद केलेले आहे. परंतु या शिफारशी कोणत्या अनुच्छेदानुसार प्रत्यक्षात अंमलात आणायच्या हा खरा प्रश्न होता. कारण अनुसूचित जाती-जमातीसाठी १६(४) हा अनुच्छेद अस्तित्वात होता. इतर मागासवर्गीयांसाठी असा कोणताच अनुच्छेद नव्हता तर फक्त आयोग नेमण्याची तरतूद होती. म्हणून संविधान दुरुस्तीमुळे १५(४) अनुच्छेद अस्तित्वात आला. संविधान दुरुस्तीमुळे समाजातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील नागरिकांना अनुसूचित जाती-जमातींतील नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या सोयी सवलती उपलब्ध करून देण्याचा शासनाला अधिकार मिळाला.

## ३.३ सारांश

राखीव जागांबाबतच्या प्रश्नांचा विचार स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच अस्तित्वात होता. मोर्ले-मिटो करार, पुणे करार, १९३५ च्या कायद्यामुळे यांचा सविस्तर विचारही करण्यात आला होता. मात्र राज्यघटना तयार करण्याचे काम घटना समितीला सोपविण्याचे निश्चित करण्याबराबेर भारतीय शेड्यूल्ड फास्ट फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाचे मागासवर्गीयांच्या हक्काबाबतचे निवेदन तयार करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर सोपविण्यात आले होते ते निवेदन पुढे 'स्टेट अॅन्ड मायनॉरिटीझ' या नावाने परिचित झाले. या निवेदनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आरक्षणाचा सविस्तर आणि अत्यंत तांत्रिक पध्दतीने विचार केला होता. त्याचाच प्रभाव राज्यघटनेतील तरतूदींवर पडलेला दिसून येतो.

भारतीय समाजाचे जातीच्या आधारे विभाजन झालेले आहे. तसे झाले नसते तर जातीच्या आधारे आरक्षण देण्याचा प्रश्नच उद्‌भवला नसता. भारतातील सर्व सामाजिक, राजकीय आणि आर्थिक व्यवस्थांचा विकास हा जातीच्या आधारे झालेला आहे. त्यामुळे शिक्षण, संरक्षण, प्रशासन, व्यापार व राजकारणात इतर मागासवर्गीयांना संधीच नव्हती. यातून समाजात अज्ञान, दारिद्र्य, विषमता आणि शोषणावर आधारलेली चिरेबंद समाजव्यवस्था निर्माण झाली. या व्यवस्थेला बदलण्यासाठी इतर मागासवर्गीयांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे. अशा सहभागासाठी जातीच्या आधारे आरक्षण देणे आवश्यक आहे. संविधानामध्ये शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण हा शब्दप्रयोग आर्थिक निकष वगळून केलेला आहे. समाजातील कोणत्याही घटकास आर्थिक निकषाच्या आधारे आरक्षण देता येत नाही. अशी संविधानात स्पष्ट तरतूद आहे. जगात भेदभावात एका बाबतीत समानता आहे. ती बाब म्हणजे यश किंवा जात, भेदभाव, आर्थिक आधारावर केला जात नाही. म्हणून भारतीय संविधानामध्ये आरक्षणाची तरतूद फक्त सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्यांच्या विकासासाठी आहे. काका कालेलकर आयोगाने देखील असे म्हटले आहे की, आमची इच्छा आर्थिक निकषाच्या आधारे आरक्षण द्यावे अशी शिफारस करावयाची होती परंतु सामाजिक वास्तव लक्षात घेता 'जात' हा घटक आरक्षणासाठी आवश्यक व उचित आहे. मंडल आयोगाने अथक प्रयत्न करून जातीनिहाय आरक्षण देणे कसे आवश्यक व समर्थनीय आहे ते स्पष्ट केलेले आहे.

जगातील कोणत्याही देशामध्ये जातीच्या आधारावर भेदभाव केला जात नाही, मात्र अनेक देशामध्ये वंशभेद आहे. गोऱ्या लोकांनी काळ्या लोकांविरुध्द वंशभेदाचे हत्यार वापरून त्यांना शिक्षण व ज्ञान घेण्यापासून वंचित ठेवले. त्यामुळे उच्च-नीच गटातील संघर्षाला चालना मिळते आणि देशाच्या विकासामध्ये अडथळा निर्माण होतो. म्हणून अनेक देशांनी वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना करून त्या-त्या देशातील विविध गटातील भेदभावाचे उच्चाटन करण्याचा मार्ग स्वीकारला. अनेक

देशात मागासवर्गीय लोकांना दिलेले आरक्षण आर्थिक निकषावर नसून वंशावर किंवा जातीच्या आधारावर आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **आरक्षण :** समाजातील दुर्लक्षित घटकांना समाज पातळीवर आणण्यासाठी त्यांना दिलेली विशेष संधी म्हणजे आरक्षण होय.

२. **मागासवर्ग :** सामाजिक, राजकीय आणि आर्थिक विकासात वंचित राहिलेला समान घटक.

३. **घटना दुरुस्ती :** राज्यघटनेमध्ये काळानुरूप व गरजेनुसार केला जाणारा बदल जो विशिष्ठ प्रक्रियेनुसार केला जातो.

४. **अनुच्छेद** : राज्यघटनेतील कलम ज्यामध्ये विशिष्ठ तरतूद केलेली असते.

## ३.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१. भारतीय संविधान निर्मितीवेळी आरक्षणाबाबत झालेली चर्चा विशद करा?

२. भारतीय संविधानातील सामाजिक व शैक्षणिक आरक्षणाचा तरतूदी स्पष्ट करा?

३. भारतीय संविधानातील अनुसूचित जाती व जमातीबाबत आरक्षणाचे धोरण सांगा?

४. पहिल्या घटना दुरुस्तीतील आरक्षणाच्या तरतूदीवर भाष्य करा?

५. पंचायत राज व्यवस्थेतील आरक्षणावर भाष्य करा?

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

१. भारतीय संविधान निर्मिती व आरक्षणाचे धोरण यावर चर्चा करा?

२. भारतीय संविधानातील मूलभूत अधिकार व आरक्षण यावर चर्चा करा?

३. मार्गदर्शक तत्त्वे व आरक्षण सहसंबंध स्पष्ट करा?

४. राजकीय पदे व शासकीय सेवेतील आरक्षणावर चर्चा करा?

५. शैक्षणिक आरक्षण मागासवर्गीयांच्या विकासाचे एक साधन यावर भाष्य करा?

## ३.७ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


१. **डॉ. रविंद्र भणगे** : *'आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण'*, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१६.

२. **डॉ. जगन कराडे** : *'आरक्षण धोरण आणि वास्तव'*, सुगावा प्रकाशन, पुणे.

३. **कांबळे नारायण, बलांडे व्यंकट, शिंदे संजय (संपा.)** : *'आरक्षण : सत्य आणि विपर्यास'*, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, २००८.

४. *'भारतीय संविधान'*, विधी व न्याय मंत्रालय, भारत सरकार प्रकाशित, २०१६.

५. **शामसुंदर मिरजकर** : *'समतावादी आरक्षण'*, नागनालंदा प्रकाशन, इस्लामपूर, २०१६.


○○○

सत्र–४ : घटक–४

# आरक्षण आणि इतर मागासवर्गीयांसंबंधी धोरणे

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ आरक्षण म्हणजे काय? आणि त्याची गरज

४.२.२ आरक्षणाच्या मागणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

४.२.३ मागासवर्गीयांसंबंधी कालेलकर आयोगाचा अहवाल

४.२.४ मंडल आयोगाच्या शिफारशी आणि त्याची अंमलबजावणी

४.२.५ इतर मागासवर्गीयांकरिता राज्य पातळीवरील आरक्षणाचे धोरण (महाराष्ट्र आणि कर्नाटक)

४.३ सारांश

४.४ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

४.५ सरावासाठी स्वाध्याय

४.६ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. आरक्षण म्हणजे काय? या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करता येईल.

२. भारतातील आरक्षण धोरणाचा अभ्यास करता येईल.

३. भारतातील मागासजातींना आरक्षणाची आवश्यकता का आहे? याची कारणमीमांसा करता येईल.

४. भारतातील आणि महाराष्ट्रातील आरक्षणाच्या मागणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी समजून येईल.

५. पहिला मागासवर्गीय कालेलकर आयोगाचा अभ्यास करता येईल.

६. दुसरा मागासवर्गीय मंडल आयोगाच्या शिफारशी आणि अंमलबजावणीचा सखोल अभ्यास करता येईल.

७. इतर मागासवर्गीयांच्या बाबतीत महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांच्या असलेल्या धोरणांचा अभ्यास करता येईल.

## ४.१ प्रास्ताविक

भारत हा अनेक जाती, धर्म, भाषा, प्रांतांचा मिळून बनलेला देश आहे. अशा सर्व बाबतीत भिन्नता असली तरी राष्ट्रीयत्वाच्या बाबतीत मात्र सर्व भारतीयांच्या मनात एकजिनसीपणा दिसून येतो. भारतीय समाजरचनेची अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यातील एक म्हणजे 'जातीव्यवस्था' होय. हे भारतीय समाजाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. जगाच्या पाठीवर कुठेही नसतील एवढ्या जाती आणि पोटजाती आणि त्यानुसार त्यांचे सणवार, उत्सव भारतात असल्याचे दिसून येतात. या जातीव्यवस्थांचे आणखी एक वेगळेपण म्हणजे, त्यामध्ये असलेली उच्चनीचता होय. भारतीय समाज हा पहिल्यापासूनच असंघटित आणि विखुरलेला असल्यानेच अनेक परकीयांनी भारतावर आक्रमणे आणि राज्य केले.

भारतीय समाज हजारो वर्षापासून चार वर्णात विभागलेला आहे. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि क्षुद्र हे ते चार वर्ण आणि त्यातही अनेक जाती आणि पोटजाती व त्यानुसार त्यांची सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक अशी मजबूत तटबंदी आणि त्या अनुषंगाने निर्माण झालेल्या विषमतेत हा समाज संकुचित आणि बंदिस्त झालेला आहे. परिणामी जातीव्यवस्था आणि त्यातून निर्माण झालेली सामाजिक विषमता आणि याच जातीव्यवस्थेतून झालेली देशाची पिछेहाट हे आज भारताच्या समाजव्यवस्थेतून निर्माण झालेले दाहक वास्तव आहे. समाजातील ही विषमता नष्ट करून, समाजाची सर्वांगीण प्रगती करायची असल्यास, मागास जातीसमूहांना, त्यांच्या प्रगतीकरिता सर्व क्षेत्रांमध्ये विशेष संधी, वाव किंवा सवलती देणे अपरिहार्य ठरते. याच विचारमंथनातून भारतात 'आरक्षण' या संकल्पनेचा जन्म झाला.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धापासून आज २१ व्या शतकापर्यंत ज्या विषयाने संपूर्ण भारतीय राजकीय आणि सामाजिक विश्व ढवळून निघाले आहे, तो विषय म्हणजे 'आरक्षण' होय. या आरक्षण मागणीची वाटचाल प्रदीर्घ स्वरूपाची आहे. म. जोतिराव फुले, राजर्षि छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, इंग्रज राजवटीतील सुधारणा, कायदे, भारतीय राज्यघटनेतील तरतूदी, पहिला मागासवर्गीय कालेलकर आयोग, त्यानंतरचा मंडल आयोग, घटनेतील ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती आणि भारतातील घटकराज्यांनी स्वीकारलेली धोरणे अशा दीर्घ प्रक्रियेतून भारतातील आरक्षण धोरणाची वाटचाल सुरू आहे.

अलीकडील काळात भारतातील अनेक जातिसमूहांना आपल्या मागासलेपणाची जाणीव झाल्याने आरक्षणाचे लढे पहावयास मिळतात. मराठा, मुस्लिम, धनगर, जाट, पाटीदार, गुज्जर अशा अनेक समुदायांनी आरक्षण मागणीचे लढे, आंदोलने उभी केलेली आहेत व त्यामाध्यमातून आपल्या हितसंबंधी जातिसमूहांच्या हितसंवर्धनासाठी ते प्रयत्नशील असल्याचे दिसते. या समुदायांनी राजकीय क्षेत्रातसुध्दा परिणामकारकता आणि प्रभाव सिध्द केल्यामुळे जमातवादाचे स्वरूप राजकारणाला प्रभावित करताना दिसते.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ आरक्षण म्हणजे काय? आणि त्याची गरज

भारतीय समाजामध्ये जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेली पराकोटीची विषमता नष्ट करून समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचे अभिवचन भारतीय संविधान उद्देशपत्रिकेच्या माध्यमातून नागरिकांना देते. भारतात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, प्रादेशिक, स्त्री-पुरुष अशा अनेक पातळ्यांवर असलेली विषमता नष्ट करून भारत एक प्रगत समाज म्हणून विकसित करावयाचा असल्यास, समाजातील या मागास समूहांना प्रगतीच्या प्रवाहात आणण्याकरिता त्यांचे अंगभूत असलेले ज्ञान, क्षमता, प्रतिभा वृध्दींगत करण्यासाठी त्यांना विकसित आणि प्रतिष्ठित बनविण्यासाठी सर्वच क्षेत्रामध्ये ज्या विशेष सवलती, संधी, सोयी उपलब्ध कराव्या लागतात, त्याला सर्वसामान्य भाषेत 'आरक्षण' म्हणता येईल.

Reservation या इंग्रजी शब्दाला पर्यायी मराठी शब्द म्हणजे 'आरक्षण' होय. आरक्षण या शब्दाला अनेक देशांमध्ये वेगवेगळ्या शब्दांमध्ये परिभाषित केलेले आहे. प्रोटेक्टीव डिस्क्रिमीनेशन (Protective discrimination) म्हणजे 'संरक्षणात्मक विभेदीकरण' किंवा 'रक्षात्मक भेदभाव' असा त्याचा अर्थ होतो. **Affermative Action म्हणजे सकारात्मक कृती कार्यक्रम तसेच काळ्या लोकांसाठी असलेल्या आरक्षणाला Revers Discrimination म्हणजे पूर्वीच्या पारंपारिक विषमतेच्या उलट दिशेने जाणिवपूर्वक केलेला पक्षपात किंवा भेदभाव होय.** भारतातील आरक्षण मात्र Compensatory Privilages (कॉपेनसेटरी प्रिव्हीलेजेस) म्हणजे भरपाईदखल दिलेला विशेषाधिकार होय. वरील सर्व संकल्पनांचा परामर्श घेतला असता एक बाब ठळकपणे जाणवते ती म्हणजे या सर्व उपाययोजना, कृती कार्यक्रम करण्यापूर्वी इथे जी पूर्वीची भेदभावाची व्यवस्था होती, ती संपवून या व्यवस्थेमध्ये ज्या समाजघटकांना सर्वच क्षेत्रामध्ये विषमतेमुळे मोठ्या प्रमाणात हानी पोहोचली, ज्या समाज घटकांची पिछेहाट झाली ती भरून काढण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था केलेली आहे. परंतु या नव्याने केलेल्या आरक्षणाच्या कृतीमुळे पुन्हा नवीन विषमता किंवा भेदभाव निर्माण झाल्याची समजूत

काहींना होण्याची शक्यता आहे, त्यामुळे हा नवीन पक्षपात किंवा भेदभाव असला तरी तो जाणिवपूर्वक, मुद्दाम, भरपाईदाखल काही विशिष्ठ किंवा मर्यादित कालावधीसाठी केलेली व्यवस्था असते असे 'आरक्षण' संकल्पनेविषयी आपणांस म्हणता येईल.

## ❑ आरक्षणाची गरज

समाजातील विषमता नष्ट करण्यासाठी केलेल्या अनेक उपायांपैकी एक उपाय म्हणजे 'आरक्षण' होय. आरक्षण हे मागास समूहांना विकसित करण्याचे क्रांतीकारी शस्त्र आहे. तरीसुध्दा ते शस्त्र परिणामकारकरित्या वापरण्याची जबाबदारी शासनाची आहे. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३४० मध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समूहांचा अभ्यास करण्यासाठी आणि उपाययोजना सुचविण्यासाठी भारताच्या राष्ट्रपतींना आयोग नेमण्याचा अधिकार दिला आहे. तसेच १९५१ च्या घटनादुरुस्तीनुसार १५व्या कलमात ४ हा अनुच्छेद खंड समाविष्ठ करण्यात आला व त्यानुसार देशातील इतर मागासवर्गीयातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या जातिसमूहांचा अभ्यास करून अनुसूचित जाती-जमातींना विशेष सोयी-सवलती, संधी उपलब्ध आहेत. तशा संधी इतर मागासवर्गीयांना देखील उपलब्ध करून देण्याचा अधिकार शासनाला मिळाला.

समताधिष्ठित समाज, कायद्यापुढील समानता आणि कायद्याचे समान संरक्षण अशी अलौकिक मूल्ये भारतीय संविधानाने उराशी बाळगली आहेत आणि त्यांच्या प्रतिपूर्तीकरिता घटनेत अनेक कलमे समाविष्ठ केली आहेत. कलम नं. १५ (४), १६ (४), ४६, १६४, २४३, ३३५, ३४०, ३४१, ३४२ अशी अनेक कलमे समाजातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या कमजोर, क्षीण, दुर्बल असलेल्या जातिसमूहांना बळ देण्यासाठी घटनेत समाविष्ट केलेली आहेत. तसेच ही कलमे केवळ समाविष्ट करून घटना थांबत नाही तर त्यास भक्कम घटनात्मक आणि न्यायालयीन संरक्षण देताना दिसते. या सर्व घटनात्मक तरतूदींचा दृश्य परिणाम म्हणजे केंद्र शासनाने नेमलेला पहिला मागासवर्गीय कालेलकर आयोग व दुसरा मंडल आयोग होय. तसेच याच तरतूदींच्या आधारे महाराष्ट्रात बापट आयोग, राणे आयोग, गायकवाड आयोग असे प्रादेशिक पातळीवर काही अभ्यासगट व आयोग नेमले आहेत.

प्रगत आणि पुढारलेल्या समाजाची गती सर्वच क्षेत्रात अधिक असते. त्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांची उपलब्धता आणि प्रतिष्ठा त्यांच्याजवळ असल्यामुळे त्यांची विकासाची गती अधिक असते. उलट मागासलेल्या जातीसमूहांकडे या सर्व गोष्टींचा अभाव, वानवा असल्याने स्वाभाविकपणे त्यांची विकासाची गती अत्यल्प असते. यातूनच विषमतेचा जन्म होतो. या गतीमान समाजाची गती मागास समूहांना प्राप्त होण्यासाठी त्यांना जाणिवपूर्वक मुद्दाम, काही सोयी-सवलती, संधी, सूट, वाव, परिप्रेक्ष, अर्थात अवकाश किंवा वातावरण उपलब्ध करून द्यावे लागते. याच सर्व कृतींचा दृश्य परिणाम म्हणजे आरक्षण होय. यामध्ये वय, पैसा, साधने, संधी, राखीव जागा, गुण इ.चा समावेश होतो.

आरक्षणाच्या या घटनात्मक तरतुदीनुसार सध्या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, तसेच अलिकडील २०१८ च्या कायद्यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग म्हणजेच एस. इ. बी. सी. इत्यादीचा समावेश होतो. अनुसूचित जातींमध्ये पूर्वास्पृश्य जातींचा समावेश येतो. तर अनुसूचित जमातीत आदिवासी, भटक्या समूहांचा समावेश होतो. तर इतर मागासवर्ग आणि एस. ई. बी. सी. मध्ये मागासवर्ग आयोगांनी ज्या समुहांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास ठरवले आहे, त्यांचा समावेश होतो. इतर मागासवर्गीयांना आरक्षण देताना नॉनक्रिमेलियरची अट टाकली आहे.

### ❑ नॉन क्रिमीलेयर म्हणजे काय?

नॉन क्रिमीलेअर ला मराठी पर्यायी शब्द म्हणजे 'उन्नत व प्रगत गटात मोडत नसणे' होय. भारतात केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याकरिता केंद्रीय प्रवर्गातील इतर मागासवर्गीय तसेच महाराष्ट्र शासनाने विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग हे राज्य मागास प्रवर्ग घोषित केले आहेत. या प्रवर्गातील जाती-जमातींच्या व्यक्तीना ठरवून दिलेल्या आर्थिक निकषात बसत असल्यास म्हणजेच उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास आरक्षणाचे फायदे व सवलती मिळण्यास पात्र असतात. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना हे तत्त्व लागू नाही.

## ४.२.२ आरक्षणाच्या मागणीची ऐतिहासिक पार्श्वभूमी

भारतातील आरक्षण मागणीचा इतिहास हा भारतीय स्वातंत्र्य लढ्यासारखाच अत्यंत दीर्घ स्वरूपाचा आहे. विशेष म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढा आणि आरक्षणाच्या मागणीचा लढा भारतीय समाजात समांतर पध्दतीने चालू होता. आरक्षणमागणीचा इतिहास संकलित स्वरूपात इथे मांडलेला आहे, त्यातील प्रमुख घटनांचा उल्लेख इथे उचित ठरेल. भारतीय मागास जाती समूहांना, वर्गांना मिळालेले आरक्षण हे एका प्रदीर्घ लढ्याच्या परिणाम स्वरूप आहे. त्यामुळे भारतीय समाज आणि राजकीय प्रक्रियेवर तो व्यापक परिणामकारक ठरला. त्यातील प्रमुख घटना पुढीलप्रमाणे :-

### १. हंटर कमिशन आणि म. फुले :-

हंटर कमिशनलाच भारतीय शिक्षण आयोग असे म्हणतात. तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड रिपन यांनी १८८२ साली विल्यम हंटर यांचे अध्यक्षतेखाली भारतीय शिक्षण आयोग नेमला. यालाच हंटर कमिशन म्हणतात. तत्पूर्वीचे गव्हर्नर लॉर्ड मेकॉले यांनी वरिष्ठ पातळीवरून कनिष्ठ जातीसमूहांकडे ज्ञान झिरपत जाईल या संकल्पनेचा पुरस्कार केला. परंतु म. फुल्यांना मात्र हे मान्य नव्हते. त्यामुळे हंटर कमिशन समोर साक्ष देताना म. फुल्यांनी 'झिरपणारे ज्ञान' या संकल्पनेला विरोध केला आणि प्रशासनात आरक्षणाची मागणी केली. हीच घटना देशातील आरक्षण मागणीची पहिली पायरी ठरली.

## २. राजर्षि शाहू महाराज आणि आरक्षण :-

आरक्षणाच्या मागणीच्या इतिहासामध्ये सोनेरी अक्षरांनी लिहावे अशी घटना कोल्हापूरच्या संस्थानात १९०२ रोजी घडली. १९०१ साली शिरगणती (जनगणना) झालेली होती, त्यानुसार प्रशासनामध्ये एकही ब्राम्हणेत्तर व्यक्ती नव्हती ही बाब राजर्षि शाहू महाराजांच्या लक्षात आली. या गोष्टीचा खोलवर परिणाम राजर्षि शाहू महाराजांच्या मनावर झाला, त्यांनी प्रशासनामध्ये मागास जातीसमूहांना आरक्षण देण्यासाठी २६ जुलै, १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानच्या गॅझेटमध्ये आरक्षण धोरण जाहीर केले. त्यानुसार प्रशासनात ५०% जागा मागासलेल्या जातीसमूहांना द्याव्यात असा निर्णय जाहीर केला. ही घटना आरक्षणाच्या मागणीच्या प्रवासातील मैलाचा दगड ठरली.

## ३. मॉंटेग्यु-चेम्सफोर्ड, लॉर्ड साऊथ ब्युरो, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-

ही घटना १९१९ ची आहे, त्यावेळी भारताचे व्हॉइसरॉय लॉर्ड चेम्सफोर्ड होते. त्या दरम्यान भारताचा राजकीय विकास कसा करावा व प्रतिनिधीत्वाच्या संदर्भात धोरण ठरविण्यासाठी मॉंटेग्यु हे भारतात आले होते. त्यांनी भारतभर फिरून लोकांची भूमिका अभ्यासली व इंग्लंडला निघून गेले. त्यानंतर पार्लमेंटने लॉर्ड साऊथ ब्युरो यांच्या नेतृत्वाखाली कमिटी नेमून अहवाल मागवला. या साऊथब्युरो कमिटीपुढे साक्ष देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य आणि मागास जातीसमूहांना आरक्षणाची अत्यंतिक गरज असल्याचे पटवून दिले. त्यांचीही साक्ष आरक्षणाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना ठरली. या सर्व परिप्रेक्षा मध्येच १९१९ साली मॉंटेग्यु-चेम्सफोर्ड सुधारणा कायदा आस्तित्वात आला.

## ४. गोलमेज परिषदा :-

आरक्षण मागणीच्या कालपरिक्रमेमधील नंतरची घटना म्हणजे १९३० ते १९३२ दरम्यान लंडन येथे तत्कालीन पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या तीन गोलमेज परिषदा होय. या गोलमेज परिषदांना भारत आणि इंग्लंडमधील सर्व राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना निमंत्रित केले होते. पहिल्या गोलमेज परिषदेला कॉंग्रेस पक्षाचे कोणीही हजर नव्हते. कारण त्या काळात कॉंग्रेसचे म. गांधींसह सर्व नेते तुरुंगात होते. परंतु या तीनही गोलमेज परिषदांना डॉ. आंबेडकर उपस्थित राहून भारतीय जातीव्यवस्था आणि मागास, अस्पृश्यांना राजकीय व सामाजिक क्षेत्रात आरक्षण मिळावे म्हणून पराकोटीचे प्रयत्न करीत होते. या सर्व गोलमेज परिषदांचा एकत्रित परिणाम म्हणून पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी 'जातीय निवाडा' प्रसिध्द केला. त्यामध्ये मागासजातींना आरक्षणाची तरतूद होती. ही घटना भारताच्या आरक्षण इतिहासातील उल्लेखनीय बाब ठरली.

## ५. पुणे करार :-

१९३० ते १९३२ दरम्यान पार पडलेल्या तीनही गोलमेज परिषदांमध्ये आरक्षित आणि खुल्या जागांवर तोडगा निघाला नाही. परिणामी पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी १७ ऑगस्ट १९३२ साली आपला निर्णय जाहीर केला. यालाच 'जातीय निवाडा' असे म्हणतात. त्यानुसार अस्पृश्यांना राखीव मतदार संघ मिळणार होते. तसेच अस्पृश्यांना दुहेरी मतदानाची तरतूद होती. म. गांधींना हा जातीय निवाडा मान्य नव्हता. त्याविरोधात त्यांनी पुणे येथील येरवडा कारागृहात आमरण उपोषण सुरू केले. परिणामी म. गांधी आणि डॉ. आंबेडकर यांच्यामध्ये २५ सप्टेंबर १९३२ मध्ये जो करार घडून आला त्यास 'पुणे करार' असे संबोधतात. पुणे करारानुसार अस्पृश्यांच्या जागा वाढल्या व त्या १४८ एवढ्या झाल्या. आरक्षणाच्या इतिहासातील हा महत्त्वाचा टप्पा समजला जातो.

## ६. सायमन कमिशन, स्टार्ट कमिटी आणि डॉ. आंबेडकर :-

डॉ. आंबेडकरांनी सुरवातीपासूनच मागास समूहांना, जाती-जमातींना इतरांच्या बरोबरीने सत्तेत वाटा मिळावा यासाठी प्रयत्न चालू केले होते. त्यांनी मे १९२८ मध्ये सायमन कमिशनपुढे साक्ष देताना अस्पृश्यांकरिता स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली होती. तसेच स्टार्ट कमिटीपुढेदेखील अस्पृश्य, आदिवासींना प्रशासनामध्ये आरक्षण असावे अशी मागणी केली होती. परिणामी, १९३० ला स्टार्ट कमिटीचा अहवाल सादर केला, त्यामध्ये स्टार्ट कमिशनने आरक्षणाच्या मागण्यांची शिफारस केली होती. ही देखील भारताच्या आरक्षणाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना म्हणावी लागेल.

## ७. १९३५ चा भारत सरकारचा कायदा :-

१९३५ साली अंमलात आलेला भारत सरकारचा कायदा म्हणजे ती एक राज्यघटनाच होती. हा १९३५ चा कायदा निर्माण होण्यासाठी उपरोक्त सर्व घटना कारणीभूत ठरल्या. हंटर कमिशन, माँटेग्यु-चेम्सफोर्ड कायदा, सायमन कमिशन, स्टार्ट कमिटीचा अहवाल, गोलमेज परिषदा आणि रॅम्से मॅकडोनाल्ड यांचा जातीय निवाडा या सर्व घटना, घडामोडींचा दृश्य परिणाम १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्याच्या रूपाने झाला. या कायद्यानुसार केंद्रीय कायदे मंडळाची रचना द्विगृही करण्यात आली. वरिष्ठ आणि कनिष्ठ सभागृह निर्माण करण्यात आले. या कायद्यामुळे अनुसूचित जाती, महिला व अल्पसंख्यांकांना प्रतिनिधीत्व मिळाले. अल्पसंख्यांकांना ५०% जागा राखीव ठेवण्यात आल्या. १९१९ च्या कायद्यानुसार जेवढ्या सवलती मागास समूहांना मिळत होत्या, त्यापेक्षा अधिक सवलती१९३५ च्या कायद्यानुसार मिळविण्यात भारतीय मागास जातीसमूहांना यश मिळाले.

## ८. राज्य घटनेतील कलम ३४० :-

घटना परिषदेचे कामकाज चालू असताना डॉ. आंबेडकरांनी मागासवर्गीयांसाठी आरक्षणाची तरतूद

करणारा मसुदा तयार केला. त्यातील कलम ३०१ नुसार घटना अंमलात आल्यानंतर प्रत्येक दहा वर्षानंतर मागास जातीचा अभ्यास करण्यासाठी एक कमिशन नेमण्याची तरतूद करण्यात आली. त्यानुसार भारताच्या राष्ट्रपतीना प्रत्येक दहा वर्षांनी सामाजिक व शैक्षणिक बाबतीत मागासलेल्या जाती-जमातींचा अभ्यास करून मागासलेपणाची कारणे आणि उपाय सुचविण्यासाठी एक कमिशन नेमण्याचा अधिकार मिळाला. संविधानाला अंतिम स्वरूप देत असताना कलम ३०१ ला कलम ३४० मध्ये रूपांतरित करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर भारतामध्ये जेवढे मागासवर्गीय आयोग, अभ्यास गट स्थापन करण्यात आले, ते सर्व याच ३४० व्या कलमानुसार नेमण्यात आले. आरक्षणाच्या मागणीला मिळालेले हे प्रचंड यश होते. या कलमानुसार पहिला मागासवर्गीय आयोग काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आला.

## ४.२.३ मागासवर्गीयांसंबंधी कालेलकर आयोगाचा अहवाल

भारतीय संविधानाच्या ३४० व्या कलमान्वये आणि राष्ट्रपतींच्याआदेशाने भारतातील पहिला मागासवर्गीय आयोग ज्येष्ठ गांधीवादी अभ्यासक, विचारवंत काका कालेलकर (दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर) यांच्या नेतृत्तवाखाली नेमण्यात आला. स्वातंत्र्यानंतरचा हा पहिलाच मागासवर्गीय आयोग यादृष्टीने या आयोगाच्या शिफारशी भारतीय समाज आणि राजकीय प्रक्रियेमध्ये उल्लेखनीय ठरल्या. भारतीय संसदेचे सदस्य असलेल्या काका कालेलकर यांच्या नेतृत्वाखाली २९ जानेवारी १९५३ रोजी पहिला मागासवर्गीय आयोग स्थापन झाला.

११ सदस्यीय कालेलकर आयोगामध्ये त्यांच्याबरोबर अरुणाक्षू डी. नारायण काजोरकर, भिक्का भाई, शिवदयाल चौरसिया, राजेश्वर पटेल, अब्दुल अन्सारी, टी. मरिअप्पा, लाला जगन्नाथ, आत्मासिंग नामधारी, एन.आर.एम.स्वामी असे लोकसभा, राज्यसभेतील विद्वान सदस्य होते. त्यांनी संपूर्ण भारताचा दौरा करून १८२ प्रश्नांची प्रश्नावली तयार करून माहितीचे संकलन केले व अहवाल, निष्कर्ष तयार केले.

कालेलकर आयोगाने २३९९ जाती मागास ठरविल्या. त्यातील ८३७ जाती अतिमागास ठरविल्या. या सर्व जातीतील एकूण लोकसंख्या ७०% होत होती. तसेच सर्व स्त्रियांचा समावेश मागासवर्गात केला. कालेलकर आयोगाने मागासवर्गीयांची नेमकी ओळख होण्याच्यादृष्टीने अतिशय अभ्यासपूर्ण आणि शास्त्रीय स्वरूपाच्या कसोट्या तयार केल्या. मागासवर्गीयांची सामाजिक स्थिती, शिक्षणाचे प्रमाण, नोकरीतील प्रतिनिधित्व, व्यापार, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधित्व, राहणीमान, आरोग्य अशा अत्यंत शास्त्रोक्त आणि प्रमाणशीर कसोट्यांचा वापर करून त्यांनी निष्कर्ष काढले आणि महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या त्या पुढीलप्रमाणे :-

- **काका कालेलकर आयोगाच्या शिफारशी :–**

१) १९६१ च्या जनगणनेमध्ये जातिविषयक नोंदीची गणना करावी.

२) पारंपरिक जातिव्यवस्थेच्या उतरंडीचा सामाजिक मागासलेपणा व जातीला देण्यात आलेले खालचे स्थान यांचा संबंध आहे.

३) सर्व स्त्रियांना 'मागासवर्गीय' वर्गात टाकण्यात यावे.

४) मागास जातीतील योग्य उमेदवारासाठी तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणसंस्थांमध्ये ७०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

५) सरकारी सेवेमध्ये पुढील वर्ग रचनेनुसार मागासवर्गीयांसाठी आरक्षण असावे, प्रथम श्रेणीत २५% दुसऱ्या श्रेणीत ३३.५% आणि तिसऱ्या व चौथ्या श्रेणीत ४०% आरक्षण असावे.

वरीलप्रमाणे काका कालेलकर आयोगाने आरक्षणाच्या बाबतीत शिफारशी केल्या, त्याचबरोबर आयोगाने मागासवर्गीयांकरिता आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातदेखील प्रयत्न करण्याचे प्रांजळ मत मांडले. ग्रामीण अर्थव्यवस्था, शेती आणि शेतीपूरक व्यवसायांना बळ देवून ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करावी. त्यांचे राहणीमान, जीवनमान व आरोग्याच्या बाबींकडे लक्ष द्यावे असे व्यापक विचार अहवालाच्या अनुषंगाने मांडले.

कालेलकर आयोगाने १९५५ साली आपला अहवाल सादर केला. ३ सप्टेंबर १९५६ साली संसदेच्या पटलावर हा अहवाल ठेवण्यात आला. परंतु या अहवालावर अनेक आक्षेप, त्रूटी असल्याचे सांगून हा कालेलकर आयोगाचा अहवाल संसदेत फेटाळण्यात आला.

## ४.२.४ मंडल आयोगाच्या शिफारशी आणि त्याची अंमलबजावणी

मंडल आयोग हा भारताच्या सामाजिक आणि राजकीय व्यवस्थेवर चिरस्थायी परिणाम घडवून आणणारा ठरला. पहिला मागासवर्गीय कालेलकर आयोगाचा अहवाल रद्दबातल ठरविल्यामुळे इतर मागासवर्गीय समाज समूहांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. ओ.बी.सी.ंच्या हक्कांसाठी संपूर्ण देशभर लढे उभे राहिले होते. प्रा. श्रावण देवरे, पेरियार रामस्वामी नायकार, श्री. शब्बीर अन्सारी इत्यादींनी मोठ्या प्रमाणात लढे उभे केले. जनजागृती केली. त्याचा परिणाम म्हणून २० डिसेंबर १९७८ साली ज्या बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली दुसरा मागासवर्गीय आयोग स्थापन करण्यात आला त्यालाच 'मंडल आयोग' असे म्हणतात.

घटनेचा कलम ३४०(१) नुसार राष्ट्रपतींनी हा आयोग इतर मागासवर्गीयांचा म्हणजे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मागासलेल्या समाजाचा अभ्यास करण्यासाठी नेमला. या बहुसदस्यीय आयोगामध्ये न्या.

मंडल यांचेबरोबर न्या. आर. आर. भोळे, दिवाण मोहनलाल, एल. आर. नाईक, के. सुब्रम्हण्यम, एस.एस.गिल असे नामवंत, अभ्यासू सदस्य होते. या आयोगाकडे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या कारणे शोधून त्यांच्या उन्नतीसाठी उपाय सुचविणे, केंद्र व राज्य सरकारच्या नोकऱ्यात उचित आरक्षणाची तरतूद करणे इ. कामे सोपवलेली होती.

मंडल आयोगाने आपला अहवाल तयार करण्यासाठी अतिशय व्यापक असा अभ्यास, संशोधन, अन्वेषण केले. ८१ प्रश्नांची प्रश्नावली बनवली. ती प्रश्नावली १ लाख ११ हजार ८७२ लोकांनी भरून पाठवली. केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषदा, शहरे, खेडी इ.कडून माहिती संकलित करण्यात आली. देशातील ४०५ जिल्ह्यातील दोन खेडे व एक शहर निवडून १००% नमुना पाहणी केली. आयोगाच्या १७१ औपचारिक बैठकी झाल्या. २६३८ समाजसेवी संस्थांची निवेदने स्विकारली. टाटा समाज विज्ञान संस्था, भारतीय मानव विज्ञान संस्था, भारतीय समाजविज्ञान व संशोधन परिषद, श्रम ब्युरो, राष्ट्रीय श्रम संस्था, आर्थिक विकास संस्था, दिल्ली विद्यापीठ यांच्या अथक प्रयत्नाने मंडल आयोगाचा अहवाल तयार करण्यात आला.

मंडल आयोगाने वस्तुनिष्ठ अभ्यास व्हावा म्हणून तीन प्रकारचे निकष किंवा कसोट्या ठरविल्या. सामाजिक निकष, शैक्षणिक निकष, आर्थिक निकष. या कसोट्यांच्या माध्यमातून अत्यंत सूक्ष्म आणि अभ्यासपूर्ण अहवाल तयार केला व इतर मागासवर्गीयांकरिता पुढीलप्रमाणे शिफारशी केल्या.

### १. सरकारी व अनुदानित सेवांमध्ये आरक्षण :-

शासकीय, निमशासकीय व सरकारकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत, अनुदान घेणाऱ्या सेवांमध्ये इतर मागासवर्गीयांना आरक्षण द्यावे. बिगर हिंदूसह अन्य मागासवर्गीयांचे लोकसंख्येतील प्रमाण ५२% आहे. वरील सर्व क्षेत्रांमध्ये या समाजाला २७% आरक्षण द्यावे.

### २. शैक्षणिक क्षेत्राविषयी शिफारस :-

शासकीय, निमशासकीय नोकऱ्यांबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा इतर मागासवर्गीयांना आरक्षण द्यावे. शैक्षणिक पात्रता मिळवूनसुध्दा काहीवेळा नोकरी मिळत नाही. तेव्हा या विद्यार्थ्यांना व्यावसायिक, तांत्रिक व कारागिरांचे शिक्षणसुध्दा द्यावे. त्यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये २७% आरक्षण ठेवावे.

### ३. राजकीय क्षेत्राविषयी शिफारशी :-

राजकीय क्षेत्र हे मंडल आयोगाचे अभ्यास क्षेत्र नव्हते; परंतु आयोगाच्या अभ्यासाला वर्ज्य देखील नव्हते. सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्र अंतर्गत गुंतागुंतीचे असते. मागास समाजाला राजकीय अस्तित्व, अस्मिता मिळाल्यास त्यांचा राजकीय सहभाग वाढतो. राजकीय क्षेत्रातसुध्दा प्रतिष्ठा मिळते.

त्यांच्यातील अस्वस्थता, नैराश्य, औदासीन्य नष्ट होवून ते राष्ट्राच्या मुख्य प्रवाहात येतात. त्यांना राजकीय आरक्षण नसल्यामुळे त्यांचे प्रतिनिधीत्व अत्यल्प आहे. त्यासाठी मंडल आयोगाने राखीव मतदारसंघाची शिफारस केली आहे.

## ४. इतर क्षेत्राविषयी शिफारशी :-

मंडल आयोगाच्या अभ्यासाची व्याप्ती प्रचंड होती. आयोगाने फक्त संघटित क्षेत्रापुरत्याच शिफारशी केल्या नाहीत तर असंघटित क्षेत्रासाठी देखील शिफारशी केल्या. मागासवर्गीय विकास महामंडळाची स्थापना करावी, त्यांच्यासाठी स्वतंत्र खाते निर्माण करावे, केंद्र व राज्याने त्यांच्या विकासासाठी विविध योजना तयार करून त्यांना पुरेसा निधी द्यावा, सहकारी गृह निर्माण संस्था स्थापन करण्यासाठी भूखंड आणि अल्पव्याज दराने कर्जे द्यावीत, नगरपालिका व इतर संस्थांनी बांधलेल्या शॉपींग सेंटरमध्ये अन्य मागासवर्गीयांसाठी जागा राखून ठेवाव्यात, त्यांचा सामाजिक स्तर, प्रतिष्ठा, त्यांचे राहणीमान, जीवनमान, आरोग्य, त्यांचे स्थैर्य या बाबतीत देखील मंडळ आयोगाने शिफारशी केल्या.

अशा प्रकारे मंडल आयोगाने अत्यंत व्यापक प्रमाणात शिफारशी केल्या. त्या सर्व इथे संकलित स्वरूपात मांडलेल्या आहेत.

## ❑ मंडल आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी :-

केंद्र सरकारने जरी मंडल आयोगाच्या शिफारशी स्विकारल्या तरी त्याची संपूर्णपणे अंमलबजावणी करणे अत्यंत क्लिष्ट आणि गुंतागुंतीचे होते. परंतु तरीसुध्दा पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांनी आयोगाने शिफारस केलेल्या सर्वच क्षेत्रात तातडीने २७% आरक्षण घोषित केले व त्याची अंमलबजावणी त्वरित चालू केली. या व्यतिरिक्त इतर ज्या शिफारशी केल्या होत्या, त्यांची अंमलबजावणी हळूहळू केंद्र आणि राज्य सरकारे करताना दिसत आहेत. त्यातील महत्त्वाचा निर्णय म्हणजे ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती होय. या दोन्ही घटना दुरुस्ती एकाचवेळी झाल्या आहेत. २२ डिसेंबर १९९२ रोजी लोकसभेने व २३ डिसेंबर १९९२ रोजी राज्यसभेने त्यास मंजूरी दिली व २० एप्रिल १९९३ रोजी राष्ट्रपतींनी विधेयकाला मान्यता दिली आणि २४ एप्रिल १९९३ पासून त्यांची अंमलबजावणी सुरू झाली. ७३ व्या घटना दुरुस्तीने ग्रामीण भागातील व ७४ व्या घटना दुरुस्तीने शहरी भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असलेल्या आरक्षणात आमूलाग्र बदल घडवून आणला. या घटना दुरुस्तीमुळे घटनेत नव्याने अकरावे व बारावे परिशिष्ट जोडण्यात आले. घटनेच्या नवव्या भागामध्ये कलम २४३ (घ) व २४३ (न) नुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच महिलांसाठी सार्वत्रिक स्वरूपाचे आरक्षण प्राप्त झाले. या दोन्ही घटनादुरुस्त्या या भारताच्या आरक्षण धोरणाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना आहेत.

## ४.२.५ इतर मागासवर्गीयांकरिता राज्य पातळीवरील आरक्षणाचे धोरण (महाराष्ट्र व कर्नाटक) :-

### १. महाराष्ट्रातील ओबीसी आरक्षणाचे धोरण :-

सन १९९३ पासून ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार इतर मागासवर्गीयांना (ओ.बी.सी.) आरक्षण स्विकारणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांनी पूर्ण अभ्यासाअंती दूरदृष्टीने काळाची पावले ओळखून महाराष्ट्रामध्ये ओ.बी.सी. आरक्षणाची अंमलबजावणी सुरू केली. १९७८ पासून १९९३ पर्यंतचा कालापव्यय, अनेक अडचणी, राजकारण, न्यायालयीन लढे पार पाडत हे आरक्षण सर्वप्रथम महाराष्ट्रात लागू झाले. महाराष्ट्र सरकारने उदार अंतकरणाने, व्यापक दृष्टीने राज्यातील इतर मागासवर्गीयांकरिता केलेल्या मंडल आयोगाच्या शिफारशी स्विकारल्या. तसेच या समाजाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अनेक योजना, सवलती उपलब्ध करून दिल्या आहेत, परंतु महाराष्ट्रातील तसेच संपूर्ण देशातील ओ.बी.सी. आरक्षणाच्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाने आणि जून २०२१ मध्ये सुप्रीम कोर्टानेसुध्दा राजकीय क्षेत्रातील ओ.बी.सी.चे आरक्षण स्थगित केले आहे. जर महाराष्ट्र सरकारने आणि केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला अपेक्षित माहिती आणि सांख्यिकी माहिती पुरवली तर हे ओ.बी.सी. आरक्षण पूर्वीसारखेच सातत्याने राहू शकते.

आरक्षण मागणीच्या इतिहासाची पुनर्रावृत्ती अजून संपलेली नाही. सध्या भारतात अनेक जातीसमूह नव्याने आरक्षणाची मागणी करताना दिसत आहेत. धनगर, मराठा, जाट, गुर्जर, मुस्लिम, पाटीदार हे त्यापैकी काही घटक आहेत. महाराष्ट्रामध्ये राज्य सरकारने महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ अनुसार ३० नोव्हेंबर २०१८ च्या कायद्यान्वये राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मराठा समाजाला नव्याने १६% आरक्षण दिले. त्यामुळे राज्यातील आरक्षणाचे प्रमाण आता ६८% पर्यंत पोहोचले. तसेच केंद्र सरकारने १०३ वी घटनादुरुस्ती कायदा २०१९ मध्ये पारीत केला आहे. त्याद्वारे घटवनेच्या कलम १५ व १६ मध्ये सुधारणा करून अनुच्छेद १५ मध्ये खंड (६) चा समावेश करून खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांसाठी १०% आरक्षण लागू केले आहे. महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील आरक्षण उच्च न्यायालयाने रद्द केल्यानंतर राज्य सरकारने त्याविरुध्द सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु सर्वोच्च न्यायालयानेदेखील उच्च न्यायालयाच्या निर्णयावर शिक्कामोर्तब करून महाराष्ट्र सरकारने दिलेले हे आरक्षण रद्दबातल ठरविले. कारण इंद्रा सहानी खटल्यानुसार ५० टक्क्यांची मर्यादा घालण्यात आली आहे. १९९२ साली पंतप्रधान व्ही.पी.सिंग यांनी इतर मागासवर्गीयांसाठी २७ टक्के आरक्षणाची घोषणा केली. त्यावेळी अल्पजातीतील गरीब लोकांमध्ये नाराजी निर्माण झाली आणि त्यांनी आम्हालाही आरक्षणाची गरज आहे अशी भूमिका मांडली, त्यामुळे पंतप्रधान नरसिंहराव यांनी उच्च जातीतील गरीबांसाठी १० टक्के आरक्षणाची घोषणा केली, त्यामुळे एकूण आरक्षण ६०

टक्क्यांपर्यंत गेले, त्याला अनेकजण विरोध करीत होते. त्या विरोधात मोर्चेही निघाले. या सर्व गोष्टींचा विचार करून दिली. ॲड. इंद्रा सहानीनी सर्वोच्च न्यायालयामध्ये एक याचिका दाखल केली. ती म्हणजे प्रसिध्द इंद्रा साहनी विरुध्द भारत सरकार चा खटला होय. या खटल्याचा निकाल ९ न्यायाधिशांच्या खंडपीठाने ६ विरुध्द ३ अशाप्रकारे निकाल दिला, त्यामध्ये असे नमूद करण्यात आले की, आरक्षणाचा एकूण प्रमाण ५० टक्क्यांच्या वर जाता कामा नये, अतिविशिष्ट परिस्थितीमध्येच ते ५० टक्क्यांवर आरक्षण जाऊ शकेल. केवळ गरीब आहे म्हणून आरक्षण मिळू शकत नाही व सामाजिक आणि शैक्षणिक आधारावरच आरक्षण मिळू शकेल. म्हणून गरीबासाठी दिलेले १० टक्क्यांचे आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले. त्याचाच आधार घेऊन मराठा आरक्षण रद्द केले आणि ४० टक्के आरक्षणाची मर्यादा घालण्यात आली.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचा दूरगामी परिणाम महाराष्ट्राच्या सामाजिक व राजकीय व्यवस्थेवर पडला आहे. जर मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिक मागास म्हणून जर आरक्षण मिळत नसेल तर मराठ्यांना ओ.बी.सी. प्रवर्गातून आरक्षण मिळावे अशी मागणी जोर धरू लागली. मराठा समाजातील अनेक संघटना व काही राजकीय नेतेदेखील ही मागणी करू लागले आहेत. मराठा आरक्षणाच्या मागणीकरिता विनायक मेटे, छ. संभाजीराजे, प्रकाश आंबेडकर यासारखे अनेक नेते मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी सरसावले आहेत. तर महाराष्ट्रातील ओ.बी.सी. समाजातील छगन भुजबळ, पंकजाताई मुंडे, श्रावण देवरे यांनी मात्र मराठ्यांना ओ.बी.सी. म्हणून आरक्षण देण्यास किंवा ओ.बी.सींच्या आरक्षित प्रवर्गात मराठ्यांचा समावेश करण्यास विरोध केला आहे.

वरील सर्व घटना-घडामोडींचा ऐतिहासिक मागोवा घेतला असता तसेच सध्या नव्याने होत असलेल्या आरक्षणाच्या मागण्या. यातून एक गोष्ट ठसठशीतपणे दिसते ती म्हणजे प्रत्येक अल्पसंख्यांक व मागास जाती समूहांना आपल्या सर्वांगीण प्रगतीचे रहस्य आरक्षणातच दडलेले आहे असे वाटते. काही अंशी ते बरोबर असले तरी या आरक्षणाच्या मागण्यांमुळे समाजतळ ढवळून निघाला आहे. अल्पसंख्यांक, जातीसमूहांचा राजकारणावर प्रभाव पाडण्याच्या क्षमता वाढल्यामुळे राज्य सरकार यांना सकारात्मक प्रतिसाद देताना दिसते. त्यामुळे आरक्षणाच्या परिघाबाहेर राहिलेल्या जातीसमूहांमध्ये दिवसेंदिवस अस्वस्थता आणि असुरक्षितता वाढीस लागलेली आहे. महाराष्ट्रातील ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळ, पंकजा मुंडे, विजय वडेट्टीवार इत्यादी नेत्यांनी मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने प्रतिक्रिया देताना मराठा समाजास आरक्षण मिळावे, परंतु ओबीसी समाजाच्या आरक्षणास धोका होऊ नये, अशी भूमिका मांडताना दिसत आहेत. एकूणच महाराष्ट्रातील ओबीसी समाजातील माधव हे आज राजकारणात सक्रीय होताना दिसतात. माधव म्हणजे माळी, धनगर व वंजारी होय. या समाजाचे अनेक नेते कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील ओबीसी समाजाला अनेक नेतृत्व लाभली असून त्यामध्ये प्रामुख्याने माजी केंद्रीय मंत्री गोपीनाथ मुंडे हे

महत्त्वाचे नेते होते. त्यानंतर प्रितम मुंडे, पंकजा मुंडे, अण्णासाहेब डांगे, छगन भुजबळ, नाना पटोले, विजय वड्डेटीवार इत्यादी नेते सक्रीय राजकारणात सहभाग घेताना दिसतात.

अशाप्रकारे भारताच्या आणि महाराष्ट्राच्या आजअखेर ओ.बी.सी. आरक्षण मागणीच्या इतिहासाचा संकिर्ण आणि संकलित स्वरूपात अभ्यास करता येईल.

**भारतातील केंद्र सरकारच्या आरक्षणाचा आकृतीबंध**

| **क्र.** | **जाती, जमाती, प्रवर्ग, वर्गाचे वर्णन** | **आरक्षणाचे प्रमाण %** |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | १५.० % |
| २. | अनुसूचित जमाती | ७.५ % |
| ३. | इतर मागास वर्ग | २७.० % |
| ४. | खुल्या वर्गातील आर्थिक दुर्बल | १०.० % |
| | **एकूण** | **५९.५ %** |
| | **खुला वर्ग** | **४०.५ %** |

**महाराष्ट्रातील आरक्षण धोरणाची टक्केवारी**

| **अ.क्र.** | **जाती, जमाती, प्रवर्ग, वर्गाचे वर्णन** | **आरक्षणाचे प्रमाण %** |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | १३.० % |
| २. | अनुसूचित जमाती | ७.० % |
| ३. | निरधिसूचित जमाती (अ) | ३.० % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | २.० % |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | २.० % |
| ८. | इतर मागास वर्ग | १९.० % |
| ९. | सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले | १६.० % |
| | **महाराष्ट्रातील एकूण आरक्षण** | **६८.० %** |

## ❑ कर्नाटक राज्यातील ओ.बी.सी. आरक्षणाचे धोरण

भारतातील प्रत्येक राज्यामध्ये विविध जाती-जमाती, वर्ग आणि प्रवर्गाच्या लोकसंख्येचे प्रमाण कमी-अधिक आहे. त्यामुळे तेथील आरक्षणाचे धोरण देखील भिन्न-भिन्न स्वरूपाचे आहे. कर्नाटकात अनुसूचित जमातींची लोकसंख्या महाराष्ट्राच्या तुलनेत कमी असली तरी ओ.बी.सीं.ची संख्या लक्षणीय आहे. त्यामुळे कर्नाटकात ओ.बी.सी. आरक्षणाची टक्केवारी महाराष्ट्राच्या तुलनेत अधिक आहे. कर्नाटक सरकारने नागनगौडा कमीशन व हावनूर कमिशन नेमले होते. या कमीशनने ओ.बी.सीं.मध्ये अतिमागास, मध्यम मागास व मागास असे तीन प्रवर्ग निर्माण केले आहेत व त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात त्यांना आरक्षण प्रदान केले. १९९४ च्या कायद्यानुसार कर्नाटकमध्ये अनुसूचित जातींना १८% आरक्षण आहे तर अनुसूचित जमातींना ५% आरक्षण आहे. तर इतर मागासवर्गीयांना सर्व प्रवर्ग मिळून ५०% आरक्षण आहे. कर्नाटकात एकूण आरक्षणाचे प्रमाण ७३% वर पोहोचले आहे.

कर्नाटकातील ओ.बी.सी. आरक्षणाचा इतिहास अभ्यासताना त्याची पाळेमुळे महाराष्ट्रात दिसून येतात. १९०२ साली राजर्षि शाहू महाराजांनी ५०% आरक्षणाचा निर्णय घेतल्यानंतर १९१८ साली कर्नाटकमध्ये प्रशासनातील ब्राह्मणेतर समाजाच्या प्रमाणाची चौकशी करण्यासाठी मिल्लर समिती स्थापन करण्यात आली. मिल्लर समितीने पहिल्यांदा ब्राम्हणेतर मागासवर्गीयांची वर्गवारी केली. परंतु या समितीच्या अहवालाला विरोध झाल्यामुळे या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी नीट झाली नाही. यानंतर स्वातंत्र्योत्तर काळात आर. नागनगौडा यांचे अध्यक्षतेखाली मागासवर्गीय समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने आपला अभ्यासपूर्ण अहवाल १९६१ मध्ये सादर केला. या अहवालाचे वैशिष्ट्य म्हणजे लिंगायत समाजाला मागासवर्गीयांच्या यादीतून हटविण्यात आले. त्यामुळे स्वाभाविकच लिंगायत समाजाने त्याला जोरदार विरोध केला.

१९७२ साली कर्नाटकचे तत्कालीन मुख्यमंत्री देवराज अर्स यांनी एल.जी.हावनूर यांच्या अध्यक्षतेखाली कर्नाटक मागासवर्गीय आयोग नेमला, यालाच हावनूर आयोग म्हणतात. हावनूर आयोगाने आपला अहवाल १९७५ साली सादर केला, परंतु १९७७ पर्यंत देवराज अर्स यांनी तो जाहीर केला नाही. हावनूर कमीशनने देखील लिंगायत समाजाला मागासवर्गीयांच्या यादीतून वगळले होते. या आयोगाने ओ.बी.सी. समाजाचे तीन गटात वर्गीकरण केले. १) मागासवर्गीय समुदाय (समाज), २) मागासवर्गीय जाती, ३) मागासवर्गीय जमाती आणि त्यांच्या आरक्षणासाठीचे प्रमाण क्रमश: १६%, १०% आणि ६% असे ठेवण्याबाबत शिफारस केली. १९७७ साली कर्नाटक सरकारने तसा आदेश पारित केला. आयोगाच्या शिफारशींमध्ये सुधारणा करून मुस्लिम समाजाचा मागासवर्गीय समाजामध्ये समावेश करण्यात आला. तसेच एक नवीन विशेष गट मागासवर्गीयांच्या यादीमध्ये समाविष्ठ करण्यात आला की जो जातीवर आधारलेला नव्हता तर तो व्यवसाय आणि उत्पन्नावर आधारलेला होता. या संदर्भात लिंगायत समाजाचा

वाढता विरोध आणि उच्च व सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांना गांभीर्याने घेत मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांच्या सरकारने टी.वेंकटस्वामी यांच्या अध्यक्षतेखाली मागासवर्गीय आयोग-२ स्थापन केला. या आयोगाने आपला अहवाल सप्टेंबर १९८६ मध्ये सादर केला. या आयोगाने ओ.बी.सी. समाजाचे दोन गटात वर्गीकरण केले. अ) १५ मागास समाज ब) २० मागास समाज व या समुदायांना अनुक्रमे १४% व १३% आरक्षणाची शिफारस केली. परंतु सर्वात महत्त्वाचे म्हणजे या आयोगाने लिंगायत आणि ओक्कलिया या दोन्ही समाजांना आरक्षणातून वगळण्यात आले. या आयोगाच्या शिफारशींना साहजिकच मोठ्या प्रमाणात विरोध झाला, तीव्र आंदोलने झाली. लोकांमधील रोष आणि अराजक ओळखून हेगडे सरकारने ८ ऑक्टोबर १९८६ रोजी तातडीने आयोगाच्या शिफारशी रद्दबातल ठरविल्या आणि मागासवर्गीयांची तात्पुरती यादी जाहीर केली. यानुसार हावनूर समितीने सांगितलेल्या ६२ मागासवर्गीय जमातीमध्ये अजून काही जमाती समाविष्ठ करण्यात आल्या. इडीगांच्या समावेशाबरोबरच १२७ मागास जातींचा समावेश करण्यात आला. मागास समाजामध्ये मुस्लिम आणि ओक्कलिंगाचा समावेश करण्यात आला. तसेच लिंगायत समाजासह काही नवीन मागास समुदायांचा विशेष गट तयार करण्यात आला. त्यामुळे कर्नाटकातील मोठ्या प्रमाणात समाज आरक्षणाच्या कक्षेत आला.

**कर्नाटकातील आरक्षण धोरणाची टक्केवारी**

| अ.क्र. | वर्ग | आरक्षणाचे प्रमाण (%) |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | १५ % |
| २. | अनुसूचित जमाती | ३ % |
| ३. | वर्ग-१ | ४ % |
| ४. | वर्ग-२ (A) | १५ % |
| ५. | वर्ग-२ (B) | ४ % |
| ६. | वर्ग-३ (A) | ४ % |
| ७. | वर्ग-३ (B) | ५ % |
| | **एकूण** | **५० %** |

कर्नाटकमधील आरक्षणाच्या धोरणांचा अभ्यास करून कर्नाटक सरकारने १९९४ साली नव्याने आरक्षण जाहीर केले. कर्नाटक सरकारने ज्या ओ.चिन्नाप्पा रेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तिसऱ्या मागासवर्गीय आयोगाच्या शिफारशींवरून सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गीयांना आरक्षण देताना सर्वोच्च न्यायालयाने वासंतीकुमार खटला, तसेच इंद्रा सहानी विरुध्द केंद्र सरकार या खटल्यातील

निवाड्याप्रमाणे कर्नाटक सरकारने २० एप्रिल १९९४ रोजी नवीन आरक्षण धोरण स्वीकारले आणि या आरक्षणाचा लाभ शैक्षणिक संस्था आणि राज्य सरकारच्या नोकऱ्यांमध्ये ओबीसींसह अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींनादेखील मिळेल अशी घोषणा केली. त्या कायद्यानुसार एस.सी. १८%, एस.टी.५%, ओबीसी ५०% आरक्षण देण्याची शिफारस करण्यात आली परंतु अंमलबजावणी करताना मात्र त्यात कमी करण्यात आले आहेत. आज कर्नाटकातील लिंगायत समाजही आरक्षणाची मागणी करीत आहेत.

## ४.३ सारांश

भारतातील आरक्षण व्यवस्था प्रचंड क्लिष्ट आणि गुंतागुंतीची आहे. जगातील बहुधा कोणत्याही देशात एवढी जटिल आरक्षण व्यवस्था नसेल. आरक्षण मागणीच्या इतिहासाची सुरवात जर आपण हंटर कमीशन १८८२ पासून केली तर आज या लढ्याला १२५ वर्षे उलटून गेल्याची दिसतात, तरीसुध्दा अजूनही काही समाज घटक आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्ष करीत आहेत. म्हणजे आज अखेरपर्यंत सुध्दा सरकारने केलेल्या आरक्षणाच्या आकृतीबंधावर समाजातील काही घटक असंतुष्ट असल्याचे दिसून येते. तरीसुध्दा आरक्षणाचा इतिहास अभ्यासताना भारतीय मागास समाजाने व त्यांच्या नेतृत्त्वाने जो चिवट आणि सातत्याने लढा दिला त्याचे फलस्वरूप म्हणून त्यांना या आरक्षणाचे लाभ मिळत आहे. स्वातंत्र्यपूर्व असो किंवा स्वातंत्र्योत्तर काळ असो हा लढा त्यानी चिवटपणे, सातत्याने लढला. याच काळात नेमलेले गेलेले अनेक आयोग, कमिट्या, अभ्यासगटांनी देखील आपल्या अहवालांमध्ये मागासलेपणाचे वस्तुनिष्ट चित्रण केल्यामुळेच आरक्षणाचा हा लढा इथंपर्यंत पोहोचला आहे.

आरक्षणाची सुरूवात स्वातंत्र्यपूर्व काळात झाली आणि आजही आरक्षण देताना दिसतात. या पाठीमागे राजकारण नसून सकारात्मक भेदभावाचे तत्त्वज्ञान आहे.

## ४.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

### ❑ योग्य जागी शब्द लिहा.

१. ............ यांनी हंटर कमिशन पुढे साक्ष दिली.

२. गोलमेज परिषदा ............... येथे पार पडल्या.

३. १९०२ साली .............. यांनी कोल्हापूर संस्थानात आरक्षणाची सुरवात केली.

४. माँटेग्यु-चेम्सफोर्ड कायदा .............. साली अंमलात आला.

५. पहिला मागासवर्गीय आयोग .............. यांचे अध्यक्षतेखाली स्थापन झाला.

६. दुसऱ्या मागासवर्गीय आयोग ............ यांचे अध्यक्षतेखाली स्थापन झाला.

७. महाराष्ट्रामध्ये २०१८ साली सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मागासलेल्यांना ............ एवढे आरक्षण दिले गेले.

❑ **उत्तरे :–**

१. *महात्मा फुले.*

२. *लंडन.*

३. *राजर्षि शाहू महाराज.*

४. *१९१९.*

५. *काका कालेलकर.*

६. *न्या. बी. पी. मंडल.*

७. *१६%.*

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय

❑ **लघुत्तरी प्रश्न सोडवा.**

१. आरक्षण म्हणजे काय?

२. आरक्षणाची आवश्यकता स्पष्ट करा.

३. नॉन क्रिमीलेअर म्हणजे काय?

४. ७३ वी व ७४ वी घटना दुरुस्ती.

❑ **दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा.**

१. आरक्षण म्हणजे काय? ते सांगून आरक्षणाची गरज स्पष्ट करा.

२. भारतातील आरक्षण मागणीच्या इतिहासाची माहिती द्या.

३. काका कालेलकर आयोग अहवाल स्पष्ट करा.

४. महाराष्ट्रातील आरक्षणाचा आकृतीबंध स्पष्ट करा.

५. मंडल आयोगाच्या शिफारशी स्पष्ट करा.

## ४.६ अधिक अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


१. **वाणी, प्रकाश ज.** (२०१३) : *''नॉन क्रिमीलेअर : सामाजिक कृती संस्था''*, जळगांव.

२. **डॉ. भणगे, र.पां.** (२०१६) : *''आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण''*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

३. **डॉ. संदे झेड. एच.** (२०१५) : *''पीएच.डी.प्रबंध : दक्षिण महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये उदयास आलेल्या मुस्लिम नेतृत्वाचा अभ्यास''*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

४. **मुरसल हुमायून** (२०१६) : *''कोंडी आरक्षणाची आणि मुस्लिमांची''*, सोसायटी फॉर मुस्लिम्स सोशियल चेंज, कोल्हापूर.

५. **Prasad Anirudha** (1991) : *"Reservation Policy its relevance in modrn India, A means to an End"*, New Delhi.

६. **Samujh Ram** (2005) : *"Reservation Policy its relevance in modrn India"*, Samrudha Bharat Publication, Mumbai.


❍❍❍